पित्र्येचांत्येचैवकुर्यात्कदाचिन्नैवस्नानंरोगमुक्तस्यजंतोः ॥ १ ॥

टी०—सोमवार, शुक्रवार, आणि ध्रुव नक्षत्रें, रोहिणी, तिन्हीउत्तरा आणि आश्लेषा, पुनर्वसू, स्वाती, हीं शूभ होत. आणि मघा, रेवती यांवर रोगमुक्त मनुष्यांनीं स्नान करूं नये.

## रोगमुक्तस्नानास लग्न पाहणें.

लग्नेचरेसूर्यकुजेज्यवारेरिक्तातिथौचंद्रबलेनहीने ॥
केंद्रत्रिकोणार्थगतेचपापेस्नानंहितंरोगविमुक्तिकानाम् ॥ १ ॥

टी०—चरलग्नें ( मेष, कर्क, तूळ, मकर ) हीं लग्नें रवि, भौम, गुरु हे वार आणि रिक्तातिथि, ( चतुर्थी, नवमी, चतुर्दशी ) असाव्या आणि चंद्रबळ नसावें लग्नीं केंद्रस्थानीं, तृतीयस्थानीं पापग्रह असावे. अशी लग्नशुद्धि पाहून स्नान करावें आरोग्यदायक होय.

## लता, औषधि व वृक्षलावण्यास नक्ष०

सावित्रतिष्याश्विनवारुणानिमूलंविशाखाचमृदुध्रुवाणि ॥
लतौषधीपादपरोपरेषुशुभानिभानिप्रतिपादितानि ॥ १ ॥

टी०—हस्त, पुष्य, अश्विनी, शततारका, मूळ, विशाखा, आणि मृदु, ध्रुव, हीं नक्षत्रें कोष्टकांत लिहिलीं आहेत तीं घ्यावीं आणि वेली व औषधी व वृक्ष लावावे शुभ होय.

Scanned by CamScanner

टी—चित्रा, तिन्ही उत्तरा, श्रवण, रोहिणी, चतुर्दशी, अमावास्येस, दिवा, [अ]ष्टमी यांचेठायीं पशूंस बाहेर गांवास पाठवूं नये व आणूंही नये.

## गाय घेणें व विकणें यांस वर्ज्य.

शक्रवासवकरेषुविशाखापुष्यवारुणपुनर्वसुभेषु ॥
अश्विपूषभयुतेषुविधेयोविक्रयक्रयविधिः सुरभीणाम् ॥ १ ॥

टी०—ज्येष्ठा, धनिष्ठा, हस्त, विशाखा, पुष्य, शततारका, पुनर्वसु, अश्विनी, रेवती या नक्षत्रांचेठायीं गायींचा क्रय विक्रय करूं नये.

## तृणकाष्ठादि संग्रह करणें.

वासवोत्तरदलादिपंचकेयाम्यदिग्गमनगेहगोपनम् ॥
प्रेतदाहतृणकाष्ठसंग्रहः शय्यकावितरणंचवर्जयेत् ॥ १ ॥

टी०—धनिष्ठांचे उत्तरार्धापासून नक्षत्रें पांच यांचेठायीं दक्षिणेस जाणें आणि गृह नीट करणें व प्रेतदाह, तृणकाष्ठ संग्रह, बाजा, पलंग आदिकरून विणणें हीं सकल कार्यें वर्जावीं.

## नांगर धरण्यास नक्षत्रें.

मृदुध्रुवाक्षिप्रचरेषुमूलेमघाविशाखासहितेषुभेषु ॥
हलप्रवाहंप्रथमंविदध्यान्नीरोगमुष्कान्वितसौरभेयैः ॥ १ ॥

टी०—मृदु, ध्रुव, क्षिप्र, चर या संज्ञा कोष्टकांतील घ्यावया आणि मूल, मघा, विशाखा सहित नक्षत्रें यांजवर बैलांस मुष्कीं घालून प्रथम नांगर धरावा.

## बीज पेरण्यास नक्षत्रें.

हस्ताश्विपुष्योत्तररोहिणीषुचित्रानुराधामृगरेवतीषु ॥
स्वातौधनिष्ठासुमघासुमूलेबीजोप्तिरुत्कृष्टफलप्रतिष्ठा ॥ १ ॥

टी०—हस्त, अश्विनी, पुष्य, तिन्ही उत्तरा, रोहिणी, चित्रा, अनुराधा, मृग, रेवती, स्वाती, धनिष्ठा, मघा, मूळ या नक्षत्रांवर बीजें पेरावीं उक्त होत.

## सर्पदंशास वर्ज्य.

यःकृत्तिकामूलमघाविशाखासार्पांतकार्द्रासुभुजंगदष्टः ॥
सवैनतेयेनसुरक्षितोऽपिप्राप्नोतिमृत्योर्वदनंमनुष्यः ॥ १ ॥

टी०—कृत्तिका, मूळ, मघा, विशाखा, आश्लेषा, रेवती, आर्द्रा या नक्षत्रांवर सर्पदंश झाला असतां गरुड संरक्षण करीत असतांही मृत्यु येईल.

## नृत्य शिकण्यास.

हस्तस्तिष्योवासवंचानुराधाज्येष्ठापौष्णंवारुणंचोत्तराच ॥
पूर्वाचार्यैः कीर्तितश्चंद्रवर्तीनृत्यारंभेशोभनोऋक्षवर्गः ॥ १ ॥

टी०—हस्त, पुष्य, धनिष्ठा, अनुराधा, जेष्ठा, रेवती, शततारका, तिन्ही उत्तरा, आणि चंद्र अनुकूळ पाहून नृत्य शिकण्यास आरंभ करावा. असें मुनिवाक्य आहे.

## राज्याभिषेकास नक्षत्रें.

मैत्रशाक्रकरपुष्यरोहिणीवैष्णवेषुतिसृषूत्तरासुच ॥
रेवतीमृगशिराश्विनीषुचक्ष्माभृतांसमभिषेकइष्यते ॥ १ ॥

टी०—अनुराधा, ज्येष्ठा, हस्त, पुष्य, रोहिणी, श्रवण, तिन्ही उत्तरा, रेवती, मृग, अश्विनी या नक्षत्रांवर राजांस प्रथम अभिषेक करावा.

## राजदर्शनास नक्षत्रें.

सौम्याश्वितिष्यश्रवणश्रविष्ठाहस्तध्रुवत्वाष्ट्रभपूषभानि ॥
मैत्रेणयुक्तानिनरेश्वराणांविलोकनेभानिशुभप्रदानि ॥ १ ॥

टी०—मृग, अश्विनी, पुष्य, श्रवण, धनिष्ठा, हस्त, ध्रुव, चित्रा, रेवती, अनुराधा या नक्षत्रांवर राजांचें दर्शन घ्यावें शुभप्रद होय.

## द्वितीयेस चंद्रोदय होतो त्याची फलश्रुति.

रौद्राहियाम्यानिलवारुणेंद्रान्याहुर्जघन्यानितथाबृहंति ॥
ध्रुवद्विदैवादितिभानिनूनंसमानिशेषाणिपुनर्मुनींद्रैः ॥ १ ॥
बृहत्सुधान्यंकुरुतेसमर्घंजघन्यधिष्ण्येभ्युदितोमहर्घः ॥
समेषुधिष्ण्येषुसमंहिमांशुर्वदंतिसंदिग्धमिदंमहांतः ॥

टी०—आर्द्रा, आश्लेशा, भरणी, स्वाती, शततारका, ज्येष्ठा हीं नक्षत्रें जघन्य होत यांवर मासाचे आदीं चंद्रोदय जाहला असतां धन्याची महर्घता होईल. ध्रुव म्हणजे तिन्ही उत्तरा, रोहिणी, आणि विशाखा, पुनर्वसु हीं नक्षत्रें बृहत् होत, यांवर चंद्रोदय झाला तर धान्य स्वस्त होईल. शेषनक्षत्रें सम जाणावीं. त्यांजवर चंद्रोदय झाला तर सम धारण असेल.

Scanned by CamScanner

## राशिपरत्वें चंद्रोदयाचें फळ.

मीनेमेषोदितश्चंद्रःसततंदक्षिणोन्नता ॥ शेषोन्नताउत्तरा
यांसमतावृषकुंभयोः ॥ १ ॥ विड्वरंतुसमेचन्द्रेदुर्भिक्षंदक्षि
णोन्नता ॥ सुभिक्षंक्षेममारोग्यमुत्तराश्रित्यचंद्रमाः ॥ २ ॥

टी०—मीन अथवा मेष या राशींवर शुक्ल द्वितीयेचा चंद्रोदय झाला तर चंद्राची दक्षिणेस उन्नता असेल आणि दुर्भिक्ष होईल. मिथुनादिक मकरराशीपर्यंत चंद्रोदय झाला असतां उत्तरेस चंद्राची उन्नता असेल.तेणेंकरून सुभिक्ष आणि क्षेम आरोग्य असेल. वृषभ आणि कुंभ यांजवर चंद्रोदय झाला तर समत्व चंद्राचें असेल. राजांचा कलह विड्वरता होईल.

## पुष्यनक्षत्राचे गुणदोष.

परकृतमखिलंनिहंतिपुष्योनखलुनिहंतिपरस्तुपुष्यदोषम् ॥
ध्रुवममृतकरेष्टमेतिपुष्येविहितमुपैतिसदैवकर्मसिद्धिम् ॥ १ ॥

टी०—पुष्य, दुसरे दोष आणि अष्टमस्थानीं चंद्र असला तरी दोष दूर करून कार्यसिद्धि करितात. परंतु त्यानक्षत्राचे दोष आहेत ते दुसऱ्याच्यानें दूर होत नाहीं.

सिंहोयथासर्वचतुष्पदानांतथैवपुष्योबलवानुडूनाम् ॥
चंद्रेविरुद्धेप्यथगोचरेऽपिसिद्ध्यंतिकार्याणिकृतानिपुष्ये ॥ १ ॥

टी०—जसा चतुष्पदां मध्यें सिंह बलवान् तसेच नक्षत्रांमध्यें पुष्य बलवान् होत. गोचरींचा चंद्र कनिष्ठ, चवथा, आठवा, बारावा असला तथापि पुष्य कार्यसिद्धि करिताहेत.

ग्रहेणविद्धोप्यशुभान्वितोऽपिविरुद्धतारोऽपिविलोमगोऽपि ॥
करोत्यवश्यंसकलार्थसिद्धिंविहायपाणिग्रहणंतुपुष्यः॥ ९ ॥

टी०—पुष्यगृहेंकरून विद्ध अथवा अशुभ ग्रहयुक्त किंवा विरुद्ध विलोम तारा असे प्रतिकूल असतांही सकल कार्यसिद्धि होत्ये; परंतु विवाहातें वर्जून करितात.

## योगप्रकरण.

## प्रतिदिवसाचा योग पहाण्याची पद्धति.

वाक्पतेरर्कनक्षत्रंश्रवणाच्चांद्रमेवच ॥
गणयेत्तद्युतिंकुर्याद्योगःस्याद्दक्षशेषतः १ ॥

टी०—पुष्यापासून चालते सूर्य नक्षत्रा पावेतों, आणि श्रवणापासून दिवस नक्षत्रा पावेतों मोजावीं; दोन्ही संख्या एकत्र कराव्या, आणि२७नीं भागावें शेष राहील तो योग जणावा.

## योगांचीं नावें.

विष्कंभप्रीतिरायुष्मान्सौभाग्यः शोभनस्तथा ॥ अतिगंडः सुकर्माचधृतिः शूलस्तथैवच ॥ १ ॥ गंडोवृद्धिर्ध्रुवश्चैवव्याघातो हर्षणस्तथा ॥ वज्रं सिद्धिर्व्यतीपातोवर्याणः परिघः शिवः ॥ २ ॥ सिद्धःसाध्यःशुभःशुक्लोब्रह्मेंद्रोवैधृतिः क्रमात् ॥ सप्ततिंशतियोगास्तुकुर्युर्नामसमंफलम् ॥ ६

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विष्कंभ | ५ | शोभन | ९ | शूल | १३ | व्याघात | १७ | व्यतिपा. | २१ | सिद्ध | २५ | ब्रह्मा |
| २ | प्रीति | ६ | अतिगंड | १० | गंड | १४ | हर्षण | १८ | वर्याण | २२ | साध्य | २६ | ऐंद्र |
| ३ | आयुष्मान् | ७ | सुकर्मा | ११ | वृद्धि | १५ | वज्र | १९ | परिघ | २३ | शुभ | २७ | वैधृ. |
| ४ | सौभाग्य | ८ | धृति | १२ | ध्रुव | १६ | सिद्धि | २० | शिव | २४ | शुक्ल | ० | ० |

## योग वर्ज्य घटिका.

विरुद्धसंज्ञाइहयेचयोगास्तेषामनिष्टः खलुपादआद्यः ॥ सर्वे धृतिस्तुव्यतिपातनामासर्वोप्यनिष्टः परिघस्यचार्धम्॥१॥तिस्रस्तुयोगेप्रथमेचवज्रेव्याघातसंज्ञेनवपंचशूले ॥ गंडेतिगंडेचषडेवनाड्यःशुभेषुकार्येषुविवर्जनीयाः ॥५॥

टी०—ह्या सत्तावीस योगांचें नावाप्रमाणें फळ जाणावें, त्यांमध्यें वाईट नावाचे योग आहेत त्यांचे आद्यपाद टाकावे आणि व्यतीपात, वैधृति हे सकळ वर्जावे. परिघाचें पूर्वार्द्ध टाकावें, परंतु विष्कंभ ३ घटिका, वज्र ९ घ०, व्याघात ५ घ०, गंड ६ घ०, अतिगंड ६ घ०, शूल १५ घ० ह्या वर्ज करून शुभकार्यें करावीं.

## करणेः—करण पहाण्याची रीति.

गततिथ्योद्विनिघ्नाश्चशुक्लप्रतिपदादितः ॥
एकोनाः सप्तहृच्छेषःकरणंस्याद्ववादिकम् ॥ १ ॥

टी०—शुक्ल प्रतिपदेपासून ज्या तिथींचीं करणें पाहिजेत त्यांची दुप्पट करावी त्यांत एक कमी करावा आणि सातांनीं भागावें शेष उरेल तें त्या तिथीचें करण जाणावें. प्रतितिथीस २ भोगतात.

Scanned by CamScanner

## नांवें.

बवाह्वयंबालवकौलवाख्यंततोभवेत्तैतिलनामधेयम् ॥ गराभिधा नंवणिजंचविष्टिरित्याहुरार्याः करणानिसप्त ॥ १ ॥ अंतेकृष्ण चतुर्दश्यांशकुनीदर्शभागयोः ॥ ज्ञेयंचतुष्पदंनागंकिंस्तुघ्नंप्र तिपद्दले ॥ ५ ॥ ॥ स्वामी ॥ ॥ इंद्रोब्रह्मामित्रनामार्यमाभूः श्रीःकीनाशश्चेतितिथ्यर्धनाथाः ॥ कल्युक्षाख्यौसर्पवायूतथैवये चत्वारस्तेस्थिराणांचतुर्णाम् ॥ ३ ॥ ॥ कृत्यें ॥ ॥ पौष्टिकस्थि रशुभानिबवाख्येबालवेद्विजहितान्यपिकुर्यात् ॥ कौलवेप्रमद मित्रविधानंतैतिलेशुभगताश्रयकर्म ॥ ४ ॥ गरेचबीजाश्रयकर्ष णानिवाणिज्यकेस्थैर्यवणिक्क्रियाश्च ॥ नसिद्धिमायातिकृतंच विष्ट्यांविषारिघातादिषुतत्रसिद्धिः ॥५॥ मंत्रौषधानिशकुनौतु सपौष्टिकानिगोविप्रराज्यपितृकर्मचतुष्पदेपि ॥ सौभाग्यदारु णधृतिध्रुवकर्मनागेकिंस्तुघ्ननाम्निनिखिलंशुभकर्मकार्यम् ॥३॥

## (टीका) कोष्टक.

| शुक्लतिथि ६० | | | | कृष्णतिथि. ६० | | | | नावें. | स्वामी | कृत्यें. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्वदळ | | उत्तरद० | | पूर्वदळ | | उत्तरद० | | | | |
| १ | स्थिर | | | ० | ० | ० | ० | किंस्तुघ्न | वायु | शुभकार्यें करावीं. |
| ५ | ८ | १ | १५ | ४ | ११ | ७ | ० | बव | इंद्र | व्रतें, उत्साह करावे, देवळें, तळीं बां. |
| २ | १२ ९ | ५ | १२ | १ | ८ | ४ | ११ | बालव | ब्रह्मा | ब्राह्मणाचें हित करावें. |
| ६ | १३ | २ | ९ | ५ | १२ | १ | ८ | कौलव | मित्र | उन्माद आणि मित्रत्व करावें. |
| ३ | १० | ६ | १३ | २ | ९ | ५ | १२ | तैतिल | सूर्य | विवाहादि मंगल कार्यें करावीं. |
| ७ | १४ | ३ | १० | ६ | १३ | २ | ९ | गर | भूमि | बीज पेरणें नांगर धरणें. |
| ४ | ११ | ७ | १४ | ३ | १० | ६ | १३ | वणिज | लक्ष्मी | देवप्रतिष्ठा गृह बांधणें दुकान घालणें. |
| ८ | १५ | ४ | ११ | ७ | १४ | ३ | १० | विष्टि | यम | सफल कर्में वर्ज्य परंतु विष अरि-घात अशीं क्रूर कर्में करावीं. |
| स्थिर | | ० | ० | ० | ० | ० | १४ | शकुनि | कलि | मंत्रोपदेश औषध ग्रहपूजा करावी. |
| स्थिर | | ० | ० | ३० | ० | ० | ० | चतुष्प. | बैल | गायी म्हैशी घेणें व देणें राज्याभिषेक आणि मित्र कार्यें हीं करावीं. |
| स्थिर | | ० | ० | ० | ० | ० | ३० | नाग | सर्प | सौभाग्य कर्में लढाईंत जाणें, धैर्य धरणें विद्याभ्यास करणें. |

# कल्याणी.

तिथिमान ॥ ॥ कृष्णेग्निदिशयोरूर्ध्वंसप्तमीभूतयोरधः ॥ शुक्लेवेदेशयोरूर्ध्वंभद्राप्राग्वसुपूर्णयोः ॥ १ ॥ मनुवसुमुनितिथि युगदशशिवगुणसंख्यासुतिथिषुपूर्वात्याः॥ आयातिविष्टिरेषा पृष्ठेशुभदापुरस्त्वशुभा ॥ २ ॥ ॥ शास्त्रार्थ ॥ दिवासर्पमुखी भद्रारात्रौभद्राचवृश्चिकी ॥सर्पस्यचमुखंत्याज्यंरात्रौपुच्छंपरित्यजेत् ॥ ३ ॥ रात्रिभद्रायदाह्निस्याद्दिवाभद्रायदानिशि ॥ नतत्रभद्रादोषःस्यात्सर्वकार्याणिसाधयेत् ॥४॥शारीरभाग ॥ नाड्यस्तुपंचवदनेथगलेतथैकावक्षोदशैकसहितानियतंचतस्रः॥ नाभ्यांकटौषडथपुच्छलताचतिस्रोविष्टेर्बुधैरभिहितोंगविभाग एषः ॥ ५ ॥ स्थानफल॥ ॥ मुखेकार्यध्वस्तिर्भवतिमरणंचाथगलकेधनाहानिर्वक्षस्यथकटितटेबुद्धिविलयः ॥ कलिर्नाभौदेशेविजयमथपुच्छेचजगदुः शरीरभद्रायाः पृथगितिफलंपूर्वमुनयः ॥ ६ ॥ ॥ चंद्र॥ ॥ मीनेमेषालिकर्केशशिनिनिवसतिस्वर्गसंस्थापिविष्टिः कन्यायांतौलिसंस्थेधनमिथुनगतेना

| तिथि | | शास्त्रार्थ | सं० | स्थानें | फळ | चंद्र. स्थानें | फळ | वार | नावें. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३ | ह्या तिथींची ३० घटिका | ३ | पुच्छ | विजय | मीन | | | |
| कृष्ण | | उतरार्धाची भद्रा तिचें ना- | | | | मेष | स्वर्गी | सौख्य | सौम | कल्या० |
| | १० | व वृश्चिकी ही दिवसास | ६ | कटि | बुद्धि | वृश्चि. | | | शुक्र | |
| | ४ | आलीतर ३ घटिका पु- | | | नाश | कर्क | | | | |
| शुक्ल | | च्छ वर्जावें मुख शुभ होय. | ४ | नाभी | कलह | कन्या | | | शनि | वृश्चिकी |
| | ११ | उत्तरार्द्ध ह्मणजे रात्र ३० | ११ | हृदय | धन | तूळ | पाता | धनप्रा० | | पुण्यव० |
| | ७ | घटिका पूर्वार्द्धाची भद्रा | | | नाश | धन | ळीं | | गुरु | |
| कृष्ण | | नाव सर्पिणी ही रात्रीं | १ | गळा | मरण | मिथु. | | | | |
| | १४ | आली तर ५ घटिका | | | | कुंभ | | | रवि | |
| | ८ | मुख वर्जावें. विध्वंसक | ५ | मुख | कार्य | सिंह | मृत्यु | | | |
| शुक्ल | | पुढें पुच्छ शुभ होय. | | | विध्वंस | वृषभ | लो | अशुभ | बुध | भद्रा |
| | १५ | पूर्वार्द्ध ह्मणजे दिवस होय. | ३० | एकुण | | मकर | कीं | | भौम | |

## वार व नक्षत्रपरत्वें, संक्रांति पहाण्याचें कोष्टक.

| वार. | नक्षत्रें. | नावें. | फळ श्रुति चांगली | काळ. | फळश्रुति वाईट | दिशागमन |
|---|---|---|---|---|---|---|
| रवि | उग्र | घोरा | शूद्रांस सुख | पूर्वाह्ण | विप्र व राजांस | पूर्वेस |
| सोम | क्षिप्र | ध्वांक्षी | वैशांस सुख | मध्याह्न | वैश्यांस वाईट | पश्चिमेस |
| भौम | चर | महोदरी | चोरांस साह्य | अपराह्ण | शूद्रांस वाईट | दक्षिणेस |
| बुध | मैत्र | मंदाकिनी | राजांस साह्य | प्रदोष | पिशाचांस | दक्षिणेस |
| गुरु | ध्रुव | नंदा | द्विजगणक | मध्यरात्रि | राक्षसांस वाईट | उत्तरेस |
| शुक्र | मिश्र | मिश्रा | पशूंस चांगलें | अपरात्रि | नटांस वाईट | पूर्वेस |
| शनि | दारुण | राक्षसी | चांडाळांस सुख | पहांट सू.उ. | गोवारीयासर्वां. | पश्चिमेस |

## करणपरत्वें संक्रांति.

स्थिति ॥ चतुष्पदेतैतिलनागयोश्चसुप्तोरविःसंक्रमणंकरोति ॥
विद्याद्ववाख्येचगराह्वयेचसबालवाख्येस्थितएवविष्टौ ॥७॥
॥ फळ ॥ ॥ किंस्तुघ्ननाम्निशकुनेवणिकौलवाख्येचोर्ध्वं
स्थितस्यखलुसंक्रमणंरवेःस्यात् ॥ धान्यार्घवृष्टिषुभवेत्क्रम
शस्त्वनिष्टोमध्येष्टतेतिमुनयःप्रवदंतिपूर्वे ॥८॥ ॥ वाहनें ॥
सिंहोव्याघ्रोवराहश्चगर्दभःकुंजरस्तथा ॥ महिषीघोटकःश्वाच
छागोवृषभकुक्कुटौ ॥ ९ ॥ गजोवाजिर्वृषोमेषःखरोष्ट्रौकेसरी
क्रमात् ॥ शार्दूलमहिषीव्याघ्रावानराश्चबवादितः ॥ १० ॥
फळें ॥ गजेलक्ष्मीर्वृषेस्थैर्यंघोटकेवाहनेतथा ॥ सिंहेव्याघ्रेभयं
प्रोक्तंसुभिक्षंगर्दभेशुनौ ॥ ॥११॥ वराहेमहतीपीडाजायतेमे
षवाहने ॥ महिष्यांचभवेत्क्लेशःकुक्कुटे मृत्युरेवच ॥१२॥ वस्त्रें ॥
श्वेतपीतहरितंचपांडुररक्तशाममसितंबहुवर्णम् ॥ कंबलोविवस
नंघनवर्णान्यंशुकानिचबवादितःक्रमात् ॥ १६ ॥ आयुधें ॥
भुशुंडीचगदाखड्गदंडकोदंडतोमरान् ॥ कुंतपाशांकुशास्त्रंचबाण
श्चैवायुधंबवात् ॥ १४॥ ॥ भोजनपात्रें ॥ सौवर्णराजतंताम्रं
कांस्यलोहंचखर्परम् ॥ पत्रंवस्त्रंकरोभूमीःकाष्ठपात्रंबवादितः ॥
॥१५॥ ॥ भक्ष्यपदार्थ ॥ अन्नंचपायसंभक्ष्यंपक्वान्नंचपयो

दधि ॥ चित्रान्नंगुडमध्वाज्यंशर्करातुबवादितः॥१६॥ गंधें ॥
कस्तुरीकुंकुमंचैवचंदनंमृत्तिकातथा॥ गोरोचनमलक्तश्चहरिद्रा
चतथांजनम्॥सिंदूरमगुरुश्चैवकर्पूरश्चबवादितः॥१७॥ ॥जाति॥
देवभूताहिविहगपशवोमृगएवच ॥ ब्रह्मक्षत्रियविट्शूद्रमिश्रजा
तिर्बवादितः॥ १८ ॥ ॥ पुष्पें ॥ पुन्नागजातीबकुलश्चकेतकी
बिल्वस्तथार्कःकमलंचदूर्वा॥मल्लीतथापाटलिकाजपाचबवादि
पुष्पाणिचयोजयेत्तु ॥ १९ ॥ ॥ भूषणें ॥ ॥ नूपुरंकंकणंमु
क्ताविद्रुमंमुकुटंमणिम्॥ गुंजावराटकंनीलंगरुत्मंरुक्मकंबवात्॥
॥२०॥ ॥ कंचुकी ॥ ॥ विचित्रपर्णाशुकभूर्जपत्रिकासीता
तथापाटलनीलवर्णा ॥ कृष्णाजिनंचर्मचवल्कपाडुराबवादित
श्चैवतुकंचुकीस्यात् ॥ २१ ॥ ॥ वयें ॥ ॥ शिशूकुमारीच
गतालकायुवाप्रौढाप्रगल्भाथततश्चवृद्धा ॥ वंध्यातिवंध्याचसु
तार्थिनीचप्रव्राजकाचैवफलंशुभंबवात् ॥ २२ ॥

| करणें | बव | बालव | कौलव | तैतील | गर | वणिज | विष्टि | शकुनी | चतुष्पा. | नाग | किंस्तु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थिति | बसली | बसली | उभी | निजली | बसली | उभी | बसली | उभी | निजली | निजली | उभी |
| फळें | मध्यम | मध्यम | महर्घता | सवंग | मध्यम | महर्घता | मध्यम | महर्घता | सवंग | सवंग | महर्घता |
| वाहनें | सिंह | व्याघ्र | डुकर | गाढव | हत्ती | महिषी | कुत्रा | घोडा | मेंढा | बैल | कोंबडा |
| उपवाह. | गज | अश्व | बैल | मेंढा | गाढव | उंट | सिंह | शार्दूल | म्हैस | व्याघ्र | वानर |
| फळें | भीति | भीति | पीडा | सुभिक्ष | लक्ष्मी | क्लेश | सुभिक्ष | स्थैर्य | पीडा | स्थैर्य | अपमृ. |
| वस्त्रें | पांढरें | पिवळें | हिरवें | पांडुरकें | तांबडें | शाम | काळें | चित्रक | कांबळें | घनवर्ण | पोपटी |
| आयुधें | भुशुंडी | गदा | खड्ग | दंड | धनुष्य | तोमर | कुंत | पाश | अंकुश | तलवार | तीर |
| पात्रें | सुवर्ण | रुपें | ताम्र | कांसें | लोह | खापर | पत्र | वस्त्र | कर | भूमि | काष्ठ |
| भक्षणें | अन्न | पायास | भक्ष्य | पक्वान | पय | दहीं | चित्रा. | गुळ | मध | तूप | साकर |
| लेपनें | कस्तुरी | कुंकुं | चंदन | माती | गोरोचन | मल | हळद | काजळ | शेंदूर | अगरु | कापूर |
| वर्ण | देव | भूत | सर्प | पशु | मृग | विप्र | क्षत्री | वैश्य | शूद्र | मिश्र | अंत्यज |
| पुष्पें | पुन्नाग | जाई | बकुळ | केवडा | बेल | रुई | कमळ | दूर्वा | मोगरा | पाटली | जास्वंद |
| भूषणें | विरोद्या | कांकण | मोती | पोवळें | मुकुट | मणी | गुंजा | कवड्या | नीळ | पाच | सुवर्ण |
| कंचु. | विचित्र | पर्ण | हिरवी | भूर्जपत्र | सीत | पांढरी | नील | कृष्ण | चर्म | वल्कल | पांडुर |
| वयें | बाल | कुमा. | गताल | युवा | प्रौढा | प्रगल्भा | वृद्धा | वंध्या | अतिवं० | पुत्रव० | सं०वी. |

## फलश्रुति.

वाहनादिबुधैर्ज्ञेयमथोक्रांतिविशेषतः ॥
वाहनादिकवस्तूनांसंक्रमात्तुविनाशता ॥ १ ॥

टी०—ज्या वाहनावर बसेल आणि ज्या वस्तू धारण करील त्यांचा नाश आहे.

## मुहूर्त संक्रांति कितीमुहूर्तीं होते त्यांचीं नक्षत्रें व फळें वेगवेगळालीं सांगतों.

संक्रांतौमूर्तिभेदाहरपवनयमेवारुणेसार्पऐंद्रेएषापंचेंदुसंज्ञागुरुकर पितृभेचाग्निदस्रेचसौम्ये ॥ त्वाष्ट्रेमैत्रेचमूलेश्रुतिवसुवपुषात्रीणिपूर्वाखरामैर्नाह्येदित्येद्विदेवभवतिशरकृतादुत्तरात्रीणिऋक्षम् ॥ १ ॥

बाणवेदैःसमर्घस्यान्मध्यस्थंव्योमरामयोः ॥
मूर्तौपंचदशेयातेदुर्भिक्षंचप्रजायते ॥ २ ॥

टी०-१५मुहूर्त ह्मणजे आर्द्रा, स्वाती, भरणी, शततारका, आश्लेषा, ज्येष्ठा या नक्षत्रीं जाहली तर दुर्भिक्षता प्रजेस जाणावी. आणि ३० मुहूर्त ह्मणजे पुष्य, हस्त, मघा, कृत्तिका, अश्विनी, मृग, चित्रा, अनुराधा, मूळ, श्रवण, धनिष्ठा, रेवती, तीन पूर्वा या नक्षत्रांवर जाहली असतां धारण मध्यम जाणावी. ४५ मुहूर्त ह्मणजे रोहिणी, पुनर्वसू, विशाखा, ३ उत्तरा या नक्षत्रीं जाहली तर स्वस्थता असावी.

## दुसरा प्रकार.

पूर्वसंक्रांतिनक्षत्रात्परसंक्रांतिऋक्षकम् ॥
द्वित्रिसंख्यामहर्घस्याच्चतुःपंचमहर्घता ॥ १ ॥

टी०—गतमास, दिनक्रांति, नक्षत्र आणि प्राप्तसंक्रांति दिननक्षत्र यांचे अंतर २ अथवा ३ आलें असतां स्वस्थता, आणि ४ अथवा ५ नक्षत्रांचें अंतर आलें असतां महर्घता.

## धान्य घेण्याचें.

संक्रांतिनाडयातिथिवारऋक्षधान्याक्षरंवह्निहरेत्तुभागम् ॥
संक्रांतिनाडीनवमिश्रिताचसप्ताहतापावकभाजिताच ॥
एकेसमर्घंद्वितयेचसौम्यंशून्यंमहर्घंमुनयोवदंति ॥ १ ॥

टी०-संक्रांतीच्या घटिका आणि गततिथि, वार, नक्षत्रें व धान्यांचीं अक्षरें मोजून एकत्र करून ३ नीं भागावें असें एक मत. दुसऱ्या मतानें संक्रांति नाडी मोजून त्यांत ९ मिळवावे आणि सातानीं गुणावें मग ३ नीं भागावें शेष उरेल त्याचें फळ—१शेष स्वस्थता धान्याची असेल, २शेष मध्यम असेल, ०शेष महर्घता जाणावी.

## नक्षत्रपरत्वें संक्रांतीची पीडा.

संक्रांत्यधरनक्षत्राद्गणयेज्जन्मभावधि ॥ त्रिकंषट्कंत्रिकंषट्कं त्रिकंषट्कंपुनःपुनः ॥ पंथाभोगोऽव्यथावस्त्रंहानिश्चविपुलंधनम् ॥ १ ॥

टी०—संक्रांतीचे अधर नक्षत्रापासून जन्मनक्षत्रा पावेतों मोजावयाची रीती. प्रथम ३ पंथा, ६ भोग, ३ व्यथा, ६ वस्त्र, ३ हानि, व ६ धनप्राप्ति या रीतीनें.

## जन्मर्क्षाचें फळ.

यस्यजन्मर्क्षमासाद्यतिथौसंक्रमणंभवेत् ॥
तन्मासाभ्यंतरेतस्यवैरंक्लेशंधनक्षयः ॥ १ ॥

टी०—ज्याचे जन्मनक्षत्रीं संक्रांति जाहली तर वैर पडेल. मासांत जाहली ह्मणजे क्लेश. तिथीवर जाहली असतां धनाचा क्षय जाणावा.

## संक्रांतीचें स्वरूप.

षष्टियोजनविस्तीर्णासंक्रांतिःपुरुषाकृतिः ॥ एकवक्त्रानवभुजा लंबोष्ठीदीर्घनासिका ॥ १ ॥ पृष्ठालोकाभ्रमंत्येवगृहीत्वाखर्परंकरे ॥ एवंसंक्रमणेयस्याःफलंप्रोक्तंमनीषिभिः ॥ २ ॥

टी०—शरीर साठ योजनें लांब, आणि रुंद, पुरुषाची आकृति, एक तोंड, ९ भुजा, ओठ लांब, नासिक लांब, आणि लक्षणें, पुढें पाहते, मागें चालते, हातांत खापर आणि भ्रमण करिते असें जाणावें.

## हातांत फळ कसें त्याविषयीं.

मेषालिकर्कैचतथैवरक्तंचापेचमीनेचतुलेचपीतम् ॥
श्वेतंवृषेस्त्रीमिथुनेचचन्द्रेकृष्णंनचक्रेथघटेचसिंहे ॥ १ ॥
रक्तेफलंभवेद्दुःखंश्वेतेचैवसुखंशुभम् ॥ पीतेश्रीस्तुतथा
प्रोक्ताश्यामेमृत्युर्नसंशयः ॥ २ ॥

टी०—मेष, वृश्चिक, कर्क या राशींचा चंद्र असतां संक्रांतीचा प्रवेश जाहला तर तिचे हातांत आरक्त वर्णाचें फळ आहे तेणेंकरून दुःखप्राप्ति; आणि धनु, मीन तुळा, पिंवळे वर्णाचें फळ, लक्ष्मीप्राप्ति; वृषभ, कन्या, मिथुन, शुभ्रवर्णाचें, सुख, शुभप्राप्ति; मकर, कुंभ आणि सिंह, कृष्ण वर्णाचें फळ, मृत्युप्राप्ति. हीं फळें राशिपरत्वें जनानीं घ्यावीं.

## राशिपरत्वें चंद्र.

याद्दशेनहिमरश्मिमालिनासंक्रमोभवतितिग्मरोचिषा ॥
ताद्दशंफलमवाप्नुयान्नरःसाध्वसाध्वपिवशेनशीतगोः ॥ १ ॥

टी०—जसा चन्द्र अष्टम स्थानीं अथवा उत्तम स्थानीं असतां फळ देतो, तसेंच चंद्रपरत्वें संक्रांतीचें शुभाशुभ फळ घ्यावें.

## पुण्यकाळ.

पूर्वतोपिहिरविसंक्रमात्पुण्यकालघटिकास्तुषोडश ॥
अर्धरात्रिसमयादनंतरंसंक्रमोपरदिनंहिपुण्यदम् ॥ १ ॥

टी०—सोळा घटिका पुण्यकाळ संक्रांत दिवसास जाहली तर, आणि मध्यरात्रीस जाहली तर दुसरे दिवशीं पुण्यकाळ.

## ग्रहण प्रकरण. चंद्रग्रहणाची प्रवृत्ति.

भानोःपंचदशेऋक्षेचंद्रमायदितिष्ठति ॥
पौर्णमास्यानिशाशेषेचंद्रग्रहणमादिशेत् ॥ १ ॥

टी०—सूर्यनक्षत्रापासून पंधरावें चंद्र नक्षत्र आणि पौर्णिमा सरून रात्रि शेष राहिली तर चंद्रग्रहण त्यारात्रीस येईल.

## सूर्यग्रहण.

मघोनंग्रस्तनक्षत्रात्षोडशंयदिसूर्यभम् ॥
अमावास्यादिवाशेषेसूर्यग्रहणमादिशेत् ॥ १ ॥

टी०—सर्व महिन्याचे अमावास्येस एक राशीस सूर्य आणि चंद्र येतात, परंतु ग्रहणकाळीं एके नक्षत्रीं दिवसास येऊन अमावास्या सरून दिवस शेष राहिला असतां

सूर्यग्रहण संधि होत्ये. त्यादिवशीं चंद्रनक्षत्रापासून सूर्य नक्षत्रा पावेतों मोजून आंतून अकरा काढून शेष सोळावें सूर्यनक्षत्र आलें ह्मणजे सूर्यग्रहण होतें.

## राशिपरत्वें शुभाशुभ फळें.

त्रिषट्दशायोपगतंनराणांशुभप्रदंस्याद्ग्रहणंरवींदोः ॥
द्विसप्तनंदेषुचमध्यमंस्याच्छेषेष्वनिष्टंमुनयोवदंति ॥ १ ॥

टी०—सूर्य अथवा चंद्रग्रहण आपले राशीपासून ज्या राशीस होईल त्या राशी ३, ६, १० ह्या शुभ होत. आणि २, ७, ९ ह्या मध्यम. आणि एक, चार, पांच, आठ, अकरा, बारा ह्या राशी नष्ट होत.

## दुसरा पक्ष.

ग्रासात्तृतीयोष्टमगश्चतुर्थस्तथायसंस्थः शुभदःस्वराशिः ॥
ग्रासाद्रविःपंचनवतुर्मध्यस्ततोधमोक्ताश्चबुधैश्चशेषाः ॥ १ ॥

टी०—ज्या राशींस सूर्यग्रहण होईल त्या राशीपासून आपले राशी पावेतों ३, ८, ४, ११ हे उत्तम होत. आणि ५, ९, ६, हे मध्यम होत. आणि १, २, ७, १०, १२ कनिष्ठ. ज्या राशींत येईल त्याप्रमाणें फळ होय.

## प्रयोग.

## ऋतुप्रकरण, शुभाशुभ फळें.

तिथिरेकागुणाप्रोक्तानक्षत्रंचचतुर्गुणम् ॥
वारःषष्ठगुणोज्ञेयोमासश्चाष्टगुणःस्मृतः ॥ १ ॥
वस्त्रंशतगुणंविद्याद्दर्शनंचततोधिकम् ॥ २ ॥

टी०—तिथीचा गुण एक, नक्षत्राचे गुण ४, वाराचे ६, मासाचे ८, वस्त्राचे १०० आणि जी विटाळ पाहते तिचे गुण सर्वांहून अधिक, परंतु चांगला दिवस असला वर चांगले गुण आणि दुष्ट असला वर वाईट गुण जाणावे.

## मासफळ.

आर्तवेप्रथमेचैत्रेवैधव्यंजायतेध्रुवम् ॥ वैशाखेधनवृद्धिःस्याज्ज्येष्ठेरोगान्विताभवेत् ॥ ३ ॥ आषाढेमृतवत्साचश्रावणेधनसंयुता ॥ भाद्रपद्दुर्भगानारी आश्विनेधनधान्यभाक् ॥४॥ कार्तिकेनिर्धनाप्रोक्तामार्गशीर्षेबहुप्रजा॥ पौषेचपुंश्चलीनारी माघेपुत्रवतीभवेत् ॥ फाल्गुनेपुत्रसंपन्नाज्ञेयंमासफलंबुधैः ॥ ५ ॥

टी०—चैत्र मासांत ऋतु प्राप्त झाला असतां वैधव्य, वैशाखमासीं धनवृद्धि, ज्येष्ठमासीं रोगप्राप्ति, आषाढ मासीं मृतप्रजा, श्रावण लक्ष्मीदायक, भाद्रपद मासीं दरिद्री, आश्विन मासीं धनधान्ययुक्त, कार्तिक मासीं निर्धन, मार्गशीर्ष मासीं बहुप्रजा, पौष मासीं जारकर्मी, माघ मासीं पुत्रवती, फाल्गुन मासीं पुत्रसंपन्ना असें जाणावें.

## तिथिफळ.

शुचिर्नारीप्रतिपदिद्वितीयायांतुदुःखिनी ॥ तृतीयायांपुत्रवती चतुर्थ्यांविधवाभवेत् ॥ ६ ॥ पंचम्यांचैवसौभाग्यंषष्ठ्यांकार्यविनाशिनी ॥ सप्तम्यांसुप्रजानारीचाष्टम्यांराक्षसीतथा ॥७॥ नवम्यांविधवानारीदशम्यांसौख्यभोगीनि ॥ एकादश्यांशुचिर्नारीद्वादश्यांमरणंध्रुवम् ॥८॥ त्रयोदश्यांशुभाप्रोक्ताचतुर्दश्यांपरान्विता॥पौर्णमास्याममावास्यांशुभंचाशुभमेवच ॥९॥

टी०—प्रतिपदेस ऋतु प्राप्त झाला असतां शुचि, द्वितीया दुःखदायक, तृतीया पुत्रवती, चतुर्थी विधवा, पंचमी सौभाग्यवती, षष्ठी कार्यनाशिनी, सप्तमी सुप्रजाप्रसूति, अष्टमी राक्षसी, नवमी विधवा, दशमी सौख्यभोगिनी, एकादशी शुचि, द्वादशी मरण, त्रयोदशी शुभा, चतुर्दशी जारिणी, पौर्णिमा शुभ, अमावास्या अशुभ असें जाणावें.

## ग्रहण आणि संक्रांति यांचें फल.

संक्रांत्यांग्रहणेचैव वैरिणीचगताळका ॥

टी०—संक्रांतीवर प्रथम ऋतु प्राप्त झाला असतां वैरिणी, ग्रहणावर झाली असतां विधवा असें जाणावें.

## वारफल.

आदित्येविधवानारीसोमेचैवमृतप्रजा ॥ मंगलेआत्मघातीस्याद्बुधेकन्याप्रसूःस्मृता ॥ १० ॥ गुरुवारेसुतप्राप्तिःकन्यापुत्रयुता भृगौ ॥ मंदेचपुंश्चलीनारीज्ञेयंवारफलंशुभम् ॥ ११ ॥

टी०—रविवारीं ऋतु प्राप्त झाला असतां विधवा, सोमवारीं मृतप्रजा, भौमवारीं आत्मघातकी, बुधवारीं कन्याप्रसूती होईल, गुरुवारीं पुत्रप्रसूति, भृगुवारीं कन्या पुत्रप्रसूति, शनिवारीं जारकर्मी असें जाणावें.

Scanned by CamScanner

## नक्षत्रफल.

अश्विन्यांसुभगानारीभरण्यांविधवाभवेत् ॥ कृत्तिकायांचवं
ध्यास्याद्रोहिण्यांचारुभाषिणी ॥१२॥ मृगेदारिद्र्ययुक्तोक्ता
चार्द्रायांक्रोधकारिणी ॥ पुनर्वसौपुत्रवतीपुष्येपुत्रधनेश्वरी १३
आश्लेषायांभवेद्वंध्यामघायांचार्थसंयुता ॥ पूर्वायांचार्थयुक्ता
हिचोत्तरायांसतीतथा ॥ १४ ॥ हस्तेपुत्रधनैर्युक्ताचित्रायाम
नुचारिणी ॥ स्वात्यान्यगर्भावयवाविशाखायांतुनिष्ठुरा ॥१५॥
मैत्रेचदुर्भगानारीज्येष्ठायांविधवाभवेत् ॥ मूलेपतिव्रतासाध्वी
पूर्वा सौभाग्यभोगिनी ॥ १६ ॥ उत्तरार्थवतीप्रोक्ताश्रवेसौभा
ग्यसंपदा ॥ धनिष्ठायांशुभानारीशतेभद्रान्विताबुधैः ॥ १७ ॥
पुंभेचोक्ताकामिनीतुउभेलक्ष्मीयुताशुभा ॥ रेवत्यांपतिरिक्तातु
ज्ञेयंभानांफलंबुधैः ॥ १८ ॥

टी०—अश्विनी नक्षत्रीं ऋतु प्राप्त झाला असतां शुभ, आणि भरणीवर विधवा, कृत्तिकांवर वंध्या, रोहिणीवर प्रियभाषिणी, मृगावर दरिद्री, आर्द्रांवर क्रोधी, पुनर्वसूवर पुत्रप्राप्ति, पुष्यांवर पुत्रधनवती, आश्लेषांवर वांझ, मघांवर अर्थप्राप्ति, पूर्वांवर अर्थयुक्त, उत्तरांवर सती, हस्तावर पुत्र धनप्राप्ति, चित्रांवर मनायोग्य चालणारी, स्वातीवर अन्यगर्भा, विशाखांवर निष्ठुर, अनुराधांवर दुर्भगा, ज्येष्ठांवर विधवा, मूळावर पतिव्रता, पूर्वाषाढांवर सौभाग्य, उत्तराषाढांवर लक्ष्मीदायक, श्रवणावर सौभाग्य, धनिष्ठांवर शुभा, शततारकांवर शुभा, पूर्वाभाद्रपदांवर उत्तम भोग, उत्तराभाद्रपदांवर लक्ष्मीप्राप्ति, रेवतीवर पतीवांचून असेल, असें जाणावें.

## योगफल.

आद्यतौविधवानारीविष्कंभेचरजस्वला॥स्नेहःप्रीत्यांतुदंपत्योरा
युष्मांस्तुधनप्रदः ॥ १९ ॥ सौभाग्येपुत्रयुक्तातुशोभनेमंगला
न्विता ॥ अतिगंडेतुविधवासुकर्मणितुशोभना ॥ २० ॥ धृतौ
संपत्तियुक्ताचशूलेरोगयुताभवेत् ॥ गंडेदुःखान्वितानारीवृद्धौ
पुत्रान्विताभवेत् ॥ २१ ॥ ध्रुवेतुशोभनानारीव्याघातेभर्तृघात
की ॥ हर्षणेहर्षयुक्तातुवज्रेचैवानपत्यता ॥ २२ ॥ सिद्धौपुत्रा

न्वितानारीव्यतीपातेविभर्तृका ॥ मृतवत्साचवर्याणेपरिघेचा
ल्पजीविनी ॥२३॥ शिवेपुत्रवतीनारीसिद्धेशीघ्रफलान्विता ॥
साध्येधर्मपरानारीशुभेशुभगुणान्विता ॥२४॥ शुक्लेशुभकराना
रीब्रह्मणिस्वपतौरता ॥ ऐंद्रेतुदेवरक्ताचवैधव्यंवैधृतौस्मृतम् ॥२५॥

टी०—विष्कंभ योगावर ऋतु प्राप्त झाला असतां विधवा, प्रीतियोगावर स्नेह, आयुष्मानावर धनप्राप्ति, सौभाग्यावर पुत्रवती, शोभनावर मंगल, अतिगंडावर विधवा, सुकर्मावर शुभ, धृतीवर संपत्ति, शूलावर भोगी, गंडावर दुःखान्विता, वृद्धीवर पुत्रप्राप्ति, ध्रुवावर शुभा, व्याघातावर पतिघातकी, हर्षणावर हर्षयुक्त, वज्रयोगावर वंध्या, सिद्धीवर पुत्रान्विता, व्यतीपातावर पतिवांचून असेल, वर्याणयोगावर मृतप्रजा, परिघावर अल्पजीवी, शिवयोगावर पुत्रवती, सिद्धयोगावर शीघ्रफलप्राप्ति, साध्ययोगावर अधर्मी, शुभयोगावर गुणयुक्त, शुक्लयोगावर शुभकर्मी, ब्रह्मयोगावर स्वपतिरत, ऐंद्रावर दिराशीं रत, वैधृतीवर विधवा, असें जाणावें.

## करणफल.

बवेप्रोक्तातुवंध्यास्त्रीबालवेपुत्रसंपदः ॥ कौलवेपुंश्चलीनारीतै
तिलेचारुभाषिणी ॥ २६ ॥ गरेचगुणसंपन्नावणिजेपुत्रिणी
स्मृता ॥ विष्ट्यांचमृतवत्साचशकुनेकामपीडिता ॥ २७ ॥
चतुष्पदेशुभानारीनागेपुत्रवतीभवेत् ॥ किंस्तुघ्नेव्यभिचारीतुक
रणानांशुभंफलम् ॥ २८ ॥

टी०—बव करणार ऋतु प्राप्त झाला असतां वंध्या, बालवावर पुत्रप्राप्ति, कौलवावर वेश्या, तैतिलावर प्रियभाषणी, गरावर गुणसंपन्ना, वणिजावर पुत्रिणी, विष्टीवर मृतवत्सा, शकुनीवर कामातुरा, चतुष्पदावर शुभा, नागावर पुत्रवती, किंस्तुघ्नावर जारिणी जाणावी.

## राशिफल.

व्यभिचारीतुमेषेस्याद्वृषभेसुखभोगिनी ॥मिथुनेधनयुक्तोक्ताकर्कटेदुः
खिताबुधैः ॥ २९ ॥ सिंहेपुत्रवतीनारीकन्यायांमालिनीशुभा ॥
तुलेविचक्षणानारीवृश्चिकेव्यभिचारिणी ॥ ३० ॥ धनेपतिव्रताज्ञेया
मांसहीनाचनक्रके ॥ कुंभेधनवतीज्ञेयामीनेचचपलाबुधैः ॥ ३१ ॥

Scanned by CamScanner

टी०—मेषराशीवर ऋतु प्राप्त झाला असतां जारिणी, वृषभावर सुखभोगिनी, मिथुनावर धनयुक्त, कर्कावर दुःखी, सिंहावर पुत्रवती, कन्यावर अभिमानी, तूळावर विचक्षणा, वृश्चिकावर जारिणी, धनावर पतिव्रता, मकरावर कृशा, कुंभावर धनवती, मीनावर चपला असें जाणावें.

## होराफल.

सूर्येचव्याधिसंयुक्ताचांद्रेहोरेपतिव्रता ॥ कुजेहोरेतुदौर्भाग्यंबु
धेहोरेतुपुत्रिणी ॥ ३२ ॥ जीवेसर्वसमृद्धिःस्याद्भृगौसौभाग्य
मेवच ॥ शनौसर्वविनाशायहोरकस्यफलंबुधैः ॥ ३३ ॥

| होरा | फळ | होरा | फळ |
|---|---|---|---|
| रवीचा होरा | व्याधि | गुरूचा होरा | सर्वसमृद्धि |
| सोमाचा होरा | पतिव्रता | शुक्राचा होरा | सौभाग्य |
| भौमाचा होरा | दुर्भगा | शनिचा होरा | सर्व विनाशिनी |
| बुधाचा होरा | पुत्रिका | | |

## लग्नफल.

मेषलग्नेदरिद्राचवृषभेधनसंयुता ॥ कामिनीमिथुनेलग्नेकर्कटेप
तिनाशिका ॥ ३४ ॥ सिंहेपुत्रप्रसूताचपतियुक्तास्त्रिलग्नके ॥
तुलेचैवांधतादायीवृश्चिकेदद्रुदुःखिनी ॥ ३५ ॥ धनुर्लग्नेधनैश्वर्यं
मकरेकर्कशाभवेत् ॥ कुंभेवंशक्षयश्चोचमीनेसर्वगुणान्विता ॥३६॥

टी०—प्रथम संक्रांति चालती असेल तेंच लग्न प्रथम जाणावें, आणि मेषलग्नीं ऋतु प्राप्त झाला असतां दरिद्रता. २ धनयुक्ता. ३ कामिनी. ४ पतिनाशकी. ५ पुत्रप्रसूता. ६ पतियुक्त. ७ अंधतादायीनी. ८ दद्रुदुःखिनी. ९ धनैश्वर्य. १० कर्कशा. ११ वंशक्षयनाशिनी. १२ गुणयुक्ता.

## ग्रहांचें फल.

लग्नेराहुश्चसौरिश्चरविचंद्रौतथैवतु ॥
तदासाविधवानारीसर्वसौभाग्यवर्जिता ॥ ३७ ॥

टी०—ज्यालग्नीं स्त्रियांस प्रथम ऋतु प्राप्त होईल त्या लग्नीं राहु अथवा शनि, रवि, चंद्र, या ४ ग्रहांतून एक ग्रह जरी असला तर त्या स्त्रीस विधवात्व प्राप्त होईल.

## रक्तफल.

शोणितंबिंदुमात्रेणस्वैरिणीचाल्पशोणिता ॥ रक्तेरक्तेभवेत्पुत्रः कृष्णेचैवमृतप्रजा ॥ ३८ ॥ पिच्छलीचभवेद्वंध्याकाकवंध्याच पांडुरे ॥ पीतेदुश्चारिणोज्ञेयासुभगागुंजसादृशे ॥ ३९ ॥ सिंदूर वर्णेरक्तेतुकन्यासंततिरेवच ॥

टी०—प्रथम ऋतु प्राप्त होतो त्या समयीं त्याचा अल्पवर्ण असला तर त्याचें फळ स्वैरिणी, तांबडा असल्यास पुत्रवती, काळ्यास मृतप्रजा, पिच्छलीस वांझ, पांढरा असल्यास काकवंध्या, पिंवळ्यास दुराचरणी, गुंजेसारिखा असल्यास त्याचें फळ सुभगा, सिंदुरवर्णास कन्या संतति या प्रकारें फळश्रुति जाणावी.

## काळफल.

पूर्वाह्णेसुभगाप्रोक्तामध्याह्नेचैवनिर्धना ॥ अपराह्णेशुभाचैव सायाह्नेसर्वभोगिनी ॥ ४० ॥ संध्ययोरुभयोर्वेश्यानिशीथेवि धवाभवेत् ॥ पूर्वरात्रेतथावंध्यादुर्भगासर्वसंधिषु ॥ ४१ ॥

टी०—प्रथम ऋतु प्रातःकाळीं झाला असला तर सुभगा, मध्यान्हीं झाल्यास निर्धना, तिसरे प्रहरींचें फळ शुभ, सायंकाळींचें फळ सर्व भोगी, उभयसंधीस वेश्या, मध्य रात्रीस विधवा, पूर्व रात्रीस वांझ, सर्व संधींस दुर्भगा अशीं फळें जाणावीं.

## नेसलेल्या वस्त्राचें फल.

सुभगाश्वेतवस्त्राचरोगिणीरक्तवस्त्रका ॥ नीलांबरधरानारीवि धवापुष्पवंतिका ॥ ४२ ॥ भोगिनीपीतवस्त्राचमिश्रवस्त्रावर प्रिया ॥ सूक्ष्मास्यात्सूक्ष्मवस्त्राचदृढवस्त्रापतिव्रता ॥ ४३ ॥ दुर्भगाजीर्णवस्त्राचसुभगामध्यवाससा ॥ धूतवस्त्राशुभानारी मलिनीमलिनाभवेत् ॥ ४४ ॥

टी०—प्रथम ऋतु प्राप्त पांढरे वस्त्रावर झाला तर सुभगा, तांबड्यावर रोगी, निळ्यावर विधवा, पुष्पवंतिका ह्मणजे ऋतुमती पिंवळ्यावर भोगी, मिश्र वर्णास पतिप्रिया, बारीक असल्यास शरीर कृश, मळकट वस्त्रावर पतिव्रता, जुन्या फाटक्यावर दुर्भगा, मध्यमावर सुभगा, धुतले वस्त्रावर शुभ, मळकट वस्त्र असल्यास मलीन फळ जणावें.

Scanned by CamScanner

## गर्भाधानास मुहूर्त.

ऋतौतुप्रथमेकार्यंपुन्नक्षत्रेशुभेदिने ॥
मघामूलांत्यपक्षांतंमुक्त्वाचन्द्रबलेसती ॥ ४५ ॥

टी०—प्रथम ऋतु प्राप्त झाल्यावर पुन्नक्षत्रीं शुभदिनीं, मघा, मूळ, रेवती, अमावास्या, पौर्णिमा वर्ज करून उक्त चंद्रबळ पाहून मुहूर्त योजावा.

## ऋतूच्या षोडशरात्रींचें शुभाशुभ.

ऋतुःस्वाभाविकःस्त्रीणांरात्रयःषोडशस्मृताः ॥ तासामाद्याश्चत स्रस्तुनिंदितैकादशीचया ॥४६॥ त्रयोदशीचशेषाःस्युःप्रशस्ता दशवासराः ॥ तस्मात्रिरात्रंचांडालींपुष्पितांपरिवर्जयेत् ॥४७॥

टी०—ऋतु प्राप्त झाल्यापासून स्वभावें करून स्त्रीचेठायीं सोळा रात्री असतो, त्या मध्यें प्रथम तीन रात्री चांडाळी पुष्पिता होय. आणि चौथी, अकरावी, तेरावी, ह्या निंदित वर्ज करून शेष दहा रात्री प्रशस्त होत.

रात्रौचतुर्थ्यांपुत्रःस्यादल्पायुर्धनवर्जितः॥ पंचम्यांपुत्रिणीनारी षष्ठ्यांपुत्रस्तुमध्यमः ॥४८॥ सप्तम्यामप्रजायोषिदष्टम्यामीश्वरः पुमान् ॥ नवम्यांसुभगानारीदशम्यांप्रवरःसुतः॥ ४९ ॥ एकाद श्यामधर्म्यास्त्रीद्वादश्यांपुरुषोत्तमः ॥ त्रयोदश्यांसुतापापावर्ण संकरकारिणी ॥ ५० ॥ धर्मज्ञश्चकृतज्ञश्चआत्मवेदीदृढव्रतः ॥ प्रजायतेचतुर्दश्यांपंचदश्यांपतिव्रता ॥ ५१ ॥ आश्रयः सर्वभूतानांषोडश्यांजायतेपुमान् ॥ ५२ ॥

टी०—४रात्रीस स्त्रीसंग केला असतां पुत्र अल्पायुषी धनवर्जित,५रात्रीस कन्या, ६ रा० मध्यम पुत्र,७ रा० मुलगे होणार नाहींत,८ रा० पुत्र ईश्वरभक्त,९ रात्रीस सौभाग्यवृद्धि,१० रा० गुणवान पुत्र, ११ रा० अधर्मी पुत्र, १२ रा० उत्तम पुरुष, १३ रा० पापकर्मी कन्या, १४ रा० धर्मकृतज्ञ आणि निश्चयात्मक व्रत करणारा पुत्र, १५ रा० पतिव्रता, १६ रा. सर्व भूतांस आश्रय देणारा पुत्र होईल.

## तिथि आणि वारमुहूर्त.

षष्ठ्यष्टमीपंचदशीचतुर्थीचतुर्दशीमप्युभयत्राहत्वा ॥
शेषाःशुभाःस्युस्तिथयोनिषेकेवाराःशशांकार्यसितेंदुजाश्च ॥५३॥

टी०—षष्ठी,अष्टमी,पौर्णिमा,अमावास्या, चतुर्थी,आणि चतुर्दशी ह्या तिथी वर्ज करून शेष तिथी शुभ. आणि सोमवार,गुरुवार शुक्रवार,बुधवार हे वार,शुभ जाणावे.

Scanned by CamScanner

## अन्यमत सीमंतोन्नयन आणि विष्णुबलि.

चतुर्थषष्ठाष्टममासभाजिसौरेणगर्भेप्रथमंविधेयम् ॥
सीमंतकर्मद्विजभामिनीनांमासेष्टमेविष्णुबलिंचकुर्यात् ॥

टी०—प्रथम गर्भ धारण झाल्यापासून चवथा, साहवा, आठवा असे सममास सौरमानें करून घ्यावें. सीमंतकर्म ब्राह्मणस्त्रियांस उक्त, आणि विष्णुबलि हा आठवे महिन्यांत उक्त आहे.

सीमंतेतिष्यहस्तादितिहरिशशिभृत्पौष्णविद्व्युत्तराख्यापक्षच्छि
द्राचरिक्तापितृतिथिमपहायापराःस्युःप्रशस्ताः ॥ ५८ ॥

टी०—सीमंतकर्मास नक्षत्रें पुष्य, हस्त पुनर्वसु, श्रवण, मृग, रेवती, रोहिणी, तिन्ही उत्तरा, शुभ होत. पक्षच्छिद्रा, आणि रिक्ता तिथि, पितृतिथि वर्ज्य करून शेष राहिल्या त्या शुभ जाणाव्या.

## पक्षच्छिद्रातिथि.

चतुर्दशीचतुर्थीचअष्टमीनवमीतथा ॥ षष्ठीचद्वादशीचैवपक्ष
च्छिद्राह्वयाःस्मृताः॥५९॥क्रमादेतासुतिथिषुवर्जनीयाश्चनाडि
काः॥ भूताष्टामनुतत्वांकदशशेषास्तुशोभनाः ॥ ६० ॥

टी०—१४,४,८,९,६,१२ या सहा तिथींस पक्षच्छिद्रा अशी संज्ञा आहे, आणि यातिथींच्या पूर्व घटिका क्रमेंकरून ह्मणजे चतुर्दशीच्या १४, चतुर्थीच्या ८, अष्ट मीच्या १४, नवमीच्या २४, षष्ठीच्या ९, द्वादशीच्या १०अशा वर्ज्य आहेत त्यांचा त्याग करावा, आणि शेष राहिल्या त्या शुभ,त्याचें ग्रहण करावें.

## गर्भिणी धर्म.

भूम्यांचैवोच्चनीचायामारोहणवरोहणे ॥ नदीप्रतरणंचैवशकटारो
हणंतथा ॥ ६१ ॥ उग्रौषधंतथाक्षारंमैथुनंभारवाहनम् ॥ कृते
पुंसवनेचैवगर्भिणीपरिवर्जयेत् ॥ ६२ ॥

टी०—पुंसवन झाल्यावर गर्भिणी स्त्रियांनीं उंच नीच भूमीवर चढणें, उतरणें फार चालणें, झाडावर चढणें, वाहत्या नदींत जाणें, गाड्यावर बसणें, तीक्ष्ण औषधी घेणें, खारट पदार्थ खाणें, मैथुन करणें; ओझें घेणें हीं वर्ज्य करावीं.

## गर्भिणी प्रश्न.

नामाक्षराणित्रिगुणीकृतानितुरंगदेशेतिथिमिश्रितानि ॥ अष्टौ
चभागंलभतेचशेषंसमेचकन्याविषमेचपुत्रः ॥ ६३ ॥

Scanned by CamScanner

टी०—गर्भिणीचीं नामाक्षरें त्रिगुणित करावीं त्यांत घोड्याचीं नामाक्षरें व देशाचीं अक्षरें एकत्र करून चालती तीथ आंत मिळवून आठानीं भागावें, शेष सम अंक उरेल तर कन्या, विषम उरेल तर पुत्र होईल.

## प्रसूतिस्थानीं प्रवेशास नक्षत्रें.

रोहिण्यैंदवपौष्णेषुस्वातीवारुणयोरपि ॥ पुनर्वसौपुष्यहस्तध निष्ठात्युत्तरासुच ॥ ६४ ॥ मैत्रत्वाष्ट्रेतथाश्विन्यांसूतिकागारवेशनम् ॥ प्रसूतिसंभवेकालेसद्यएवप्रवेशयेत् ॥ ६५ ॥

टी०—रोहिणी, मृग, रेवती, स्वाती, शततारका, पुनर्वसु, पुष्य, हस्त, धनिष्ठा, तिन्ही उत्तरा, अनुराधा, चित्रा, अश्विनी हीं नक्षत्रें प्रवेशास उक्त, प्रसूति संभव प्राप्त झाला ह्मणजे तत्काळींच प्रवेश करावा, नक्षत्रविचार करूं नये.

## प्रसूतिसमयीं खोलींतील पदार्थ सांगावयाचा प्रश्न.

मीनमेषेस्त्रियौद्वेचतस्रोवृषकुंभयोः ॥ तुळाकन्यकयोःसप्त बाणाख्याधनकर्कयोः ॥ १ ॥ अन्यलग्नेभवंस्तिस्रएवंज्ञेयं विचक्षणैः ॥ तथाराहुस्तथाशय्याभौमेखट्वांगभंगता ॥ रविस्थानेभवेद्दीपःशनिस्थानेतुनालकम् ॥ २ ॥

टी०—मीन अथवा मेष ह्या लग्नीं स्त्री प्रसूत झाली तर तिचे जवळ दोन स्त्रिया आहेत. वृषभ, कुंभ, असेल तर ४ स्त्रिया. तूळ, कन्या, लग्न असल्यास ७ स्त्रिया. धन, कर्क, असल्यास ५ स्त्रिया अन्य लग्नीं ३ स्त्रिया. जाणाव्या. लग्न कुंडली मांडून ज्या दिशेस राहु त्या स्थानीं शय्या; भौमलग्नीं असला तर खट्वा मोडकी, ज्या स्थानीं रवि असेल त्या स्थानीं दीप; ज्या स्थानीं शनि असेल त्या स्थानीं मुलाचें नाल असें जाणावें.

## तिथिगंडांत.

पूर्णानंदाख्ययोस्तिथ्योःसंधिनाडीद्वयंतथा ॥ गंडांतंमृत्युदंजन्मयात्रोद्वाहव्रतादिषु ॥ १ ॥

टी०—पौर्णिमेची अंत्य घटिका, आणि प्रतिपदेची आद्य घटिका अशी दोहोंची संधि, याच प्रमाणें पंचमीची अंत्य घटि व षष्ठीची आद्य घटि. तसेंच दशमीची अंत्य घटी व एकादशीची आद्य घटिका अशा संधीच्या घटिका दोन दोन वर्जाव्या त्यास तिथिगंडांत ह्मणतात हा योग जन्म, गमन, आणि विवाह, या कार्यांस वर्ज्य आहे.

Scanned by CamScanner

## लग्नगंडांत.

कुलीरसिंहयोःकीटचापयोर्मीनमेषयोः ॥
गंडांतमंतरालंस्याद्धटिकार्धंमृतिप्रदम् ॥ १ ॥

टी०—कर्क व सिंह या दोहोंलग्नाची संधि अर्ध अर्ध घटिका याच क्रमानें वृश्चिक आणि धन, तसेंच मीन व मेष, यांची एक घटिकात्मक संधि वर्ज्य करावी, ती मृत्युप्रद होय.

## नक्षत्रगंडांत.

पौष्णाश्विन्योःसार्पपित्र्यर्क्षयोश्चयच्चज्येष्ठामूलयोरंतरालम् ॥
तद्गंडांतंस्याच्चतुर्नाडिकंहियात्राजन्मोद्वाहकालेष्वनिष्टम्॥ १ ॥

टी०—रेवती, अश्विनी यांच्या दोन घटिका संधीच्या. याच क्रमानें आश्लेषा, मघा ज्येष्ठा, मूळ, अशा संधीच्या चार घटिका वर्जाव्या, असें हें त्रिविध गंडांत ह्मणजे तिथि, लग्न, नक्षत्र अशीं तीन प्रकरणें वर सांगितलीं आहेत तीं यात्रेस जाण्यास, जन्मकाळीं आणि विवाहास वर्जावीं.

## जातक.

## जन्मकाळाचीं शुभाशुभ फळें व गंडांत.

अश्विनीमघमूलानांपूर्वार्द्धेबाध्यतेपिता ॥ पूषादिशक्रपश्चार्द्धे जननीबाध्यतेशिशोः ॥१ ॥ सर्वेषांगंडजातानांपरित्यागोविधीयते ॥ वर्जयेद्दर्शनंशावंतच्चषाण्मासिकंभवेत् ॥ २॥

टी०—अश्विनी,मघा,मूळ या नक्षत्रांचे पूर्वार्धीं जन्म झालें तर बापास वाईट. आणि रेवती,ज्येष्ठा या दोन नक्षत्रांचे उत्तरार्धीं जन्म झाल्यावर मातेस वाईट आणि गंडांतांत जन्म झाल्यास मुलाचा त्याग करावा. अथवा सहा महिने तोंड पाहूं नये.

## कृष्णचतुर्दशीचें फळ.

कृष्णपक्षेचतुर्दश्यांप्रसूतेः षड्विधंफलम् ॥ चतुर्दशींचषड्भागांकुर्यादादौशुभंस्मृतम् ॥३॥ द्वितीयेपितरंहंतितृतीयेमातरंतथा ॥ चतुर्थेमातुलंहंतिपंचमेवंशनाशनम् ॥४॥ षष्ठेचधनहानिःस्यादात्मनोवंशनाशनम् ॥५॥

Scanned by CamScanner

टी०—कृष्णचतुर्दशीस जन्म झाल्यास तिथीचे सहा भाग करावे त्यांचीं फळें प्रथम भाग १० घटिकांचा शुभ, द्वितीय पित्यास वाईट, तृतीय मातेस, चतुर्थ मातुलास, पांचवा वंशास, सहावा धनहानी, आत्मवंशनाशक असें जाणावें.

## अमावास्येचें फळ.

सिनीवाल्यांप्रसूताश्वदासीभार्यापशुस्तथा ॥ गजाश्वमहिषीचैवशक्रस्यापिश्रियंहरेत्॥६॥कुहूप्रसूतिरत्यर्थंसर्वदोषकरीस्मृता॥ यस्यप्रसूतिरेतेषांतस्यायुर्धननाशनम् ॥ ७ ॥ सर्वगंडसमस्तत्रदोषस्तुप्रबलोभवेत् ॥

टी०—चतुर्दशीयुक्त अमावास्येस दासी, अथवा भार्या, गाय, हत्तीण, घोडी, म्हैस हीं प्रसूत झालीं असतां स्वामीची संपत्ति जाईल. अमावास्येस प्रसूत झाली असतां पुष्कळ दोष आणि स्वामीच्या आयुष्याचा नाश, धनाचा नाश आणि गंडांताचा प्रसूत काळीं बहुत दोष.

## दिनक्षयादि.

दिनक्षयेव्यतीपातेव्याघातेविष्टिवैधृतौ॥शूलेगंडेऽतिगंडेचपरिघेयमघंटके ॥ ८ ॥ कालगंडमृत्युयोगेदग्धयोगेसुदारुणे ॥ तस्मिन्गंडदिनेप्राप्तेप्रसूतिर्यदिजायते ॥ ९ ॥ अतिदोषकरी प्रोक्तातत्रपापयुतासती ॥

टी०—दिनक्षय, व्यतीपात, व्याघात, कल्याणी, वैधृति, शूल, गंड, अतिगंड, परिघार्ध, यमघंट, कालगंड, मृत्युयोग दग्धयोग, आणि दारुण योग यांजवर जन्म जाहलें तर मोठा दोष आणि ती स्त्री पापयुक्त असें जाणावें.

## ज्येष्ठा नक्षत्राचें फळ.

ज्येष्ठादौजननीमाताद्वितीयेजननीपिता॥ तृतीयेजननीभ्राता स्वयंमाताचतुर्थके ॥ १० ॥ आत्मानंपंचमेहंतीषष्ठेगोत्रक्षयो भवेत् ॥ सप्तमेचोभयकुलंज्येष्ठभ्रातरमष्टमे ॥ ११ ॥ नवमेश्वशुरंहंतिसर्वंहंतिदशांशके ॥ १२ ॥

Scanned by CamScanner

टी०—ज्येष्ठा नक्षत्रावर जन्म झालें असल्यास त्याचे भाग सहा घटिकाप्रमाणें दहा भाग करावे. त्यांचें फळ असें:-प्रथम भाग मातेचे आईस, दुसरा भाग आईचे बापास, तिसरा भाग मामास, ४ था भाग मातेस, ५ वा भाग मुलास, ६ वा भाग गोत्रजांस, ७ वा भाग आईचे कुळास,८ वा भाग वडील भावास, ९ वा भाग श्वशुरास, १० वा भाग सर्वांस वाईट असें जाणावें.

## मूलनक्षत्राचें फळ.

मूलंस्तंभंत्वक्चशाखापत्रंपुष्पंफलंशिखा ॥ वेदाश्चमुनयश्चैवदिशश्चवसवस्तथा ॥१३॥ नंदाबाणरसारुद्रामूलभेदाःप्रकीर्तिताः॥ मूलेमूलविनाशायस्तंभेहानिर्धनक्षयः ॥ १४ ॥ त्वचिभ्रातृविनाशायशाखामातुर्विनाशकृत् ॥ १५ ॥ पत्रेसपरिवारःस्यात्पुष्पेनृपवल्लभः॥फलेघुलभतेराज्यंशिखायामल्पजीवितम् ॥१६॥

टी०—मूळ नक्षत्रास मूळवृक्ष असें नाम आहे. त्याच्या घटी६० त्यांचीं स्थानें अशीं:-प्रथम ४ घटिका वृक्षाचें मूळ, त्यांत जन्म जाहलें असतां नाश; द्वितीय भाग ७ घ०स्तंभ, हानि आणि धनाचा नाश;तिसरा भाग १०घ०साल, भावास वाईट; चवथा भाग ८ घ० वृक्षाच्या खांद्या, मातेस वाईट; पांचवा भाग ९ घ० वृक्षपत्रें, परिवारास वाईट; सहावा भाग ५ घ० वृक्षपुष्पें, राजमंत्री; सातवा भाग ६ घ० वृक्षफल, राज्यप्राप्ति; आठवा भाग ११ घ० वृक्षाचे शेंड्यांत, जन्म जाहलें असतां अल्पायुषी असें साठी घटिकांचें मान जाणावें.

## जन्मकाळीं मूलनक्षत्र कोणते लोकीं आहे तें पहावयाचीं लग्नें.

वृक्षादिसिंहघटेचमूलंदिविस्थितंयुग्मतुलांगनांत्ये ॥ पातालगंमेषधनुःकुलीरनक्रेषुमर्त्येष्ववनिसंस्मरंति ॥ १७॥

टी०—वृषभ, वृश्चिक, सिंह, कुंभ या चोहोंतून एखादे लग्नीं जन्म जाहलें असतां त्या दिवशीं मूळ नक्षत्र स्वर्गीं आहे, त्याचें फळ राज्यप्राप्ति. आणि मिथुन, तूळ,कन्या,मीन या लग्नीं जन्म जाहलें असतां पाताळीं आहे,त्या लग्नाचें फळ धनप्राप्ति. आणि मेष, धन, कर्क, मकर या लग्नीं जन्म जाहलें तर मृत्युलोकीं आहे, त्याचें फळ सर्व कुटुंबास वाईट. असें १२ बारा लग्नांचें फळ वेगळें जाणावें.



Scanned by CamScanner

## आश्लेषानक्षत्राचा नराकार वृक्ष.

मुर्द्धास्यनेत्रगलकांसयुगंचबाहुहृज्जानुगुह्यपदमित्यहिदेहभागाः॥बाणाद्रिनेत्रहुतभुक्श्रुतिनागरुद्रषण्नंदपंचशिरसःक्रमशस्तुनाड्यः॥१८॥राज्यंपितृक्षयोमातृनाशःकामक्रियारतिः॥ पितृभक्तोबलीस्वघ्नस्त्यागीभोगीधनीक्रमात् ॥ १९ ॥

टी०—आश्लेषा नक्षत्राच्या घटिकांचीं नराकारस्थानें. प्रथम ५ घटिका मस्तक, त्याचें फळ राज्यप्राप्ति; द्वितीय ७ घ० मुख, हें बापास वाईट; तिसरा विभाग २ घ० नेत्र, हा मातेस वाईट; चवथा विभाग ३ घ० गळा, त्याचें फळ स्त्रीरत; पांचवा विभाग ४ घ० दोन्हीं खांदे, हा पितृभक्त; सहावा विभाग ८ घ० दोन्ही बाहू; फ० बळकट; सातवा विभाग ११ घ० हृदय, आत्मघाती; आठवा वि० ६ घ० दोन्ही ढोंपरें, त्यागी; नववा वि० ९ घ० गुह्य, भोगी; दहावा वि० ५ घ० दोन्ही पाय, धनवान्; ज्या भागांत जन्म होईल त्याचें फळ स्थानपरत्वें द्यावें.

## जन्मकाळीं ग्रह जसे पडतील त्यांचीं फळें.

तनुस्थान॥ ॥ लग्नस्थितोदिनकरःकुरुतेंगपीडांपृथ्वीसुतोवितनुतेरुधिरप्रकोपम्॥छायासुतःप्रकुरुतेबहुदुःखभाजंजीवेंदुभार्गवबुधाःसुखकांतिदाःस्युः॥१॥धनस्थान॥ दुःखावहाधनविनाशकराःप्रदिष्टावित्तेस्थितारविशनैश्चरभूमिपुत्राः॥ चंद्रोबुधःसुरगुरुर्भृगुनंदनोवानानाविधंधनचयंकुरुतेधनस्थः॥२॥ ॥ सहजस्थान॥ भानुःकरोतिविरुजंरजनीकरोपिकीर्त्यायुतंक्षितिसुतःप्रचुरप्रकोपम् ॥ ऋद्धिंबुधः सुधिषणंसुविनीतवेषंस्त्रीणांप्रियंगुरुकवीरविजस्तृतीये॥३॥ ॥ सुहृत्स्थान॥ ॥ आदित्यभौमशनयःसुखवर्जितांगंकुर्वंतिजन्मनिनरंसुचिरंचतुर्थे॥ सोमोबुधःसुरगुरुर्भृगुनंदनोवासौख्यान्वितंचनृपकर्मरतप्रधानम्॥४॥ ॥ सुतस्थान॥ ॥ पुत्ररविःप्रचुरकोपयुतंबुधश्चस्वल्पात्मजंशनिधरातनुजावपुत्रम्॥ ॥ शुक्रेंदुदेवगुरवःसुतधामसंस्थाःकुर्वंतिपुत्रबहुलंसुखिनंसुरूपम्॥५॥ ॥रिपुस्थान॥मार्तंडभूमितनुजौहतशत्रुपक्षंपंगुर्नरंरिपुगृहेष्वतिपूजनीयम् ॥ काव्येंदुजौमतिविहीनमनल्पमंजीवः करोतिविकलंमरणंशशांकः॥६॥ ॥जायास्थान॥

Scanned by CamScanner

तिग्मांशुभौमरविजाः किलसप्तमस्थाजायांकुकर्मनिरतांतनुसंततिं च ॥ जीवेंदुभार्गवबुधाबहुपुत्रयुक्तांरूपान्वितांजनमनोहररूपशीलाम् ॥ ७ ॥ ॥ मृत्युस्थान ॥ सर्वेग्रहा दिनकरप्रमुखानितांतंमृत्युस्थितावितनुतेकिलदुष्टबुद्धिम् ॥ शस्त्राभिघातपरिपीडितगात्रयष्टिंसौख्यैर्विहीनमतिरोगगणैरुपेतम् ॥ ८ ॥ ॥ धर्मस्थान ॥ ॥ धर्मस्थितारविशनैश्चरभूमिपुत्राः कुर्वंतिधर्मरहितंविमतिंकुशीलम् ॥ चंद्रोबुधोभृगुसुतःसुरराजमंत्रीधर्मक्रियासुनिरतंकुरुतेमनुष्यम् ॥९॥ ॥ कर्मस्थान ॥ ॥ आदित्यभौमशनयः किलकर्मसंस्थाः कुर्युर्नरं बहुकुकर्मरतंकुपुत्रम् ॥ चन्द्रःसुकीर्तिमुशनाबहुवित्तयुक्तं रूपान्वितं बुधगुरूशुभकर्मभाजम् ॥१०॥ ॥ लाभस्थान ॥ ॥ लाभस्थितोदिनकरोनृपलाभयुक्तंतारापतिर्बहुधनंक्षितिजः क्षितीशम् ॥ सौम्योविवेकसुभगंचधनायुषीज्यःशुक्रःकरोतिसुगुणंरविजःसुकीर्तिम् ॥११॥ ॥ व्ययस्थान ॥ ॥ सूर्यःकरोतिपुरुषंव्ययगोविशीलंकाणंशशीक्षितिसुतोबहुपापभाजम् ॥ चंद्रांगजोगतधनंधिषणःकृशांगंशुक्रोबहुव्ययकरंरविजःसुतीव्रम् ॥१२॥ राहुकेतुफलंसर्वंमंदवत्कथितंबुधैः ॥

## मुलांचे जन्मलग्नास मृत्युकारक ग्रह.

चन्द्राष्टमंचधरणीसुतसप्तमंचराहुर्नवंचशनिजन्मगुरुस्तृतीये ॥
अर्कस्तुपंचभृगुषष्ठबुधश्चतुर्थेजातोनजीवतिनरःप्रवदंतिसंतः ॥१॥

टी०—जन्मलग्नापासून चंद्र अष्टमस्थानीं, भौम ७ स्थानीं, राहु ९ स्थानीं, शनि जन्मलग्नीं, गुरु ३ स्थानीं, सूर्य ५ स्थानीं, शुक्र ६ स्थानीं, बुध ४ स्थानीं, असे ग्रह असले तर मूल वांचणार नाहीं.

## जन्मलग्नीं मुलाचे बायकोस मृत्युकारक.

षष्ठेचभुवनेभौमोराहुःसप्तमसंभवः ॥
अष्टमेचयदासौरिस्तस्यभार्यानजीवति ॥ १ ॥

टी०—जन्मलग्नापासून षष्ठस्थानीं भौम, राहु ७ स्थानीं, शनि ८ स्थानीं, असा योग ग्रहांचा असल्यास त्या मुलाची बायको वांचणार नाहीं.

## पुरुषजातककोष्टक.

जन्मलग्नीं तन्वादि द्वादशभावस्थानीं जे जे ग्रह येतील त्यांचीं शीं पृथक् पृथक्

Scanned by CamScanner

फळें जाणावयाचें कोष्टक. आणि राहु केतु यांचीं फळें शनिवत् आहेत.

| संख्या | स्थानें | रवि | चन्द्र | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि, राहु, केतु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तनु | अंगपीडा | कांति आणि सु० | रक्तकोप | कांति आणि सु० | कांति आणि सु० | कांति आणि सु० | अति दुःख दायक |
| २ | धन | अतिदुःख व धनाचा नाश | संपत्ति अत्यंत प्राप्ति | दुःख प्राप्ती धनाचा नाश | नानाप्रकारची संपत्तिप्राप्ति | नानाप्रकारची संपत्तिप्राप्ति | नानाप्रकारची संपत्ति प्राप्ति | अति दुःख प्राप्त धनाचा नाश |
| ३ | सहज | निरोगी असेल | कीर्ती मिळवील | कोपयुक्त असेल | समृद्धी | सुबुद्धिवान् | नाना वेष धारण करील | स्त्रियांस प्रियहोईल |
| ४ | सुहृत् | शरीरास पीडा बहुत होईल | सुख भोगील | शरीरास पीडा बहुत होइल | सुख भोगील | सुख भोगील | सुख भोगील | शरीरास पीडा बहुत होईल |
| ५ | सुत | मोठा रागीट होईल | बहुत पुत्र होतील | संतती होणार नाहीं | अल्प पुत्र संतती होईल | बहुत पुत्र प्राप्ती | बहुत पुत्र होतील | संततीच होणार नाहीं |
| ६ | रिपु | शत्रूचा नाश करील | मरण पावेल | शत्रूचा नाश करील | बुद्धिहीन, बहुत रोग असतील | शरीर विकलीत असेल. | बुद्धिहीन व रोगी बहुत असतील | शत्रूचे गृहीं पूज्य होईल |
| ७ | जाया | बालको दुष्टकर्मी संतती अल्प | स्त्रीरूपवान्वगुणवान्वपुत्रगुण | स्त्री दुष्टकर्मी व संतती अल्प | स्त्री रूपवान् व मन हरण करणारी व बहुत पुत्र होतील अशी चांगले स्वभावाची प्राप्त होईल. | | | स्त्री दुष्टकर्मी आणि संतती थोडी उत्प० |
| ८ | मृत्यु | सर्व ग्रहांचें फळ एकच आहे, दुष्टबुद्धि व शस्त्रघातेंकरून शरीरास पीडा होतील. सौख्यरहीत असेल आणि रोगी असेल. जो ग्रह ज्या स्थानीं असेल त्यांनीं घ्यावें. | | | | | | |
| ९ | धर्म | अधर्मी दुष्टमति दुष्टशील | धार्मीक होईल | अध० दुष्ट० दुष्टशील | धर्म निरंतर करील | | | अध० बु० ही० दु० बु० हो० |
| १० | कर्म | अत्यंतदुष्टकर्मी व कुष्ठवान् | अत्यंत कीर्तिवान् होईल | दुष्ट कर्म, व कुपुत्री | कांति चांगली | शुभ कर्मे करील | संपत्तिवान् | फार दुष्टकर्मी व कुपुत्र होईल |
| ११ | आय | राजाशीं समागम करील | धन पुष्कळ मिळवील | पृथ्वीचे राजापासून लाभ होईल | विवेकयुक्त सुंदर असेल | धन आणि आयुष्यवृद्धि | गुणवान् असेल | चांगली कीर्ति मिळवील |
| १२ | व्यय | दुष्टशील | काणा होईल | पापकर्म आचरेल | गतधनी असल | कृशांग असेल | व्याधिस्थ | तीव्रता असेल |

Scanned by CamScanner

## चांगले पराक्रमाचे ग्रह.

मूर्तौशुक्रबुधौयस्यकेंद्रेचैवबृहस्पतिः ॥
दशमोंगारकश्चैवसज्ञेयःकुलदीपकः ॥ १ ॥

टी०—जन्मलग्नीं शुक्र, बुध, आणि केंद्र ( ह्मणजे प्रथम, चतुर्थ, सप्तम, दशम यांस ह्मणतात. ) यास्थानीं बृहस्पति, दशमस्थानीं भौम, असल्यास तो मुलगा कुलदीपक असें जाणावें.

## पराक्रमी ग्रह.

नैवशुक्रोबुधोनैव नास्तिकेंद्रेबृहस्पतिः ॥
दशमोंगारकोनैव जातकं किंकरिष्यति ॥ १ ॥

टी०—लग्नीं शुक्र, बुध, अथवा केंद्रीं बृहस्पति, किंवा दशम स्थानीं अंगारक, यांतून कोणी ग्रह नसला तर जन्म होऊन व्यर्थ जाणावें.

## जातिभ्रंशकारक.

धनस्थानेयदासौरिःसैंहिकेयोधरात्मजः॥शुक्रोगुरुःसप्तमेचत्व
ष्टमेरविचंद्रको ॥१॥ ब्रह्मपुत्रपदेवापिवेश्यासुचसदारतिः ॥
प्राप्तेविंशतिमेवर्षेम्लेच्छोभवतिनान्यथा ॥ २ ॥

टी०—धनस्थानीं शनि, राहु, मंगळ, अथवा सप्तमस्थानीं शुक्र, गुरु, अष्टमस्थानीं रवि चंद्र असे ग्रह असतां ब्राह्मणजन्म असला तथापि वेश्येसीं रत असेल, आणि वीस वर्षांचा जाहला ह्मणजे म्लेच्छ होईल.

## मातापितरांस नाशक.

षष्ठेचद्वादशेराशौयदापापग्रहोभवेत् ॥
तदामातृभयंविंद्याच्चतुर्थेदशमेपितुः ॥ १ ॥

टी०—षष्ठस्थानीं अथवा द्वादशस्थानीं पापग्रह असला तर मातेस वाईट किंवा चतुर्थ, दशमस्थानीं असला तर पित्यास वाईट.

## नाशवंत ग्रह.

अर्कोराहुःकुजःसौरिर्लग्नेतिष्ठतिपंचमे ॥
पितरंमातरंहंतिभ्रातरंचशिशूनक्रमात् ॥ १ ॥

Scanned by CamScanner

टी०—जन्मलग्नापासून पंचमस्थानीं ग्रह आले तर त्यांचीं फळें:—रवि असल्यास पित्यास वाईट; राहु मातेस; भौम भ्रात्यास; शनि आल्यास मुलास मृत्युकारक असें क्रमेंकरून जाणावें.

लग्नस्थानेयदासौरिःषष्ठोभवतिचंद्रमाः ॥
कुजस्तुसप्तमस्थानेपितातस्यनजीवति ॥ १ ॥

टी०—जन्मलग्नीं शनि, षष्ठस्थानीं चंद्र, सप्तमस्थानीं मंगळ, असे असले तर पित्यास मृत्युकारक.

पातालस्थोयदाराहुश्चेंदुःषष्ठाष्टमेपिच ॥
पापदृष्टोपिशेषेणसद्यःप्राणहरःशिशोः ॥ १ ॥

टी०—जन्मलग्नापासून सप्तमस्थानीं राहु, षष्ठ अथवा अष्टमस्थानीं चन्द्र आणि शेष ग्रहांची पापदृष्टि असल्यास जन्म होतांच मृत्यु जाणावा.

जन्मलग्नेयदाराहुःषष्ठोभवतिचन्द्रमाः ॥
जातोमृत्युमवाप्नोतिकुदृष्टयात्वपमृत्युना ॥ १ ॥

टी०—जन्मलग्नीं राहु, षष्ठस्थानीं चंद्रमा, असे असल्यास जन्म होतांच मृत्यु आणि जन्मलग्नावर कुदृष्टि असली तर अपमृत्यु.

जन्मलग्नेयदाभौमश्चाष्टमेचबृहस्पतिः ॥
वर्षेचद्वादशेमृत्युर्यदिरक्षतिशंकरः ॥ १ ॥

टी०—जन्मलग्नीं मंगळ, अष्टमस्थानीं बृहस्पति असे असले तर बारावे वर्षी शंकर रक्षीत असला तथापि मृत्यु प्राप्त होतो.

शनिक्षेत्रेयदासूर्योभानुक्षेत्रेयदाशनिः॥
वर्षेचद्वादशेमृत्युर्देवोवैरक्षितायदि ॥ १ ॥

टी०—शनीचे गृहांत सूर्य, अथवा सूर्याचे गृहांत शनि, असे जन्मकाळीं असल्यास देव रक्षीत असतांही बारावे वर्षी मृत्यु होतो.

षष्ठोष्टमस्तथामूर्तौजन्मकालेयदाबुधः ॥
चतुर्थवर्षेमृत्युश्चयदिरक्षतिशंकरः ॥ १ ॥

टी०—षष्ठ, अष्टम, अथवा जन्मलग्नीं बुध, असला तर चवथे वर्षी शंकर रक्षीत असतांही मृत्यु होतो.

भौमक्षेत्रेयदाजीवः षष्ठाष्टासुचचंद्रमाः ॥
वर्षेष्टमेपिमृत्युर्वैईश्वरोरक्षितायदि ॥ १ ॥

Scanned by CamScanner

टी०—मंगळाचे गृहांत बृहस्पति, आणि षष्ठ अथवा अष्टमस्थानीं चंद्रमा असला तर ईश्वर रक्षीत असतां आठवे वर्षीं मृत्यु जाणावा.

दशमोयस्यवैराहुर्जन्मलग्नेयदाभवेत् ॥
वर्षेतुषोडशेज्ञेयोबुधैर्मृत्युर्नरस्यच ॥ १ ॥

टी०—जन्मलग्नापासून दशमस्थानीं अथवा जन्मलग्नीं राहु असला तरी सोळावे वर्षीं मृत्यु असें जाणावें.

## ग्रहांची दृष्टि.

पादैकदृष्टिर्दशमेतृतीयेद्विपाददृष्टिर्नवपंचमेवा ॥ त्रिपाददृष्टिश्च तुरष्टकेचसंपूर्णदृष्टिःसमसप्तकेच ॥ १ ॥ शनेस्त्वेकादशेपूर्णादृष्टिर्जीवस्यकोणके ॥ बुधैर्ज्ञेयापूर्णदृष्टिभौमस्यचतुरष्टके ॥ २ ॥

टी०—जन्मलग्नापासून दशमस्थानीं आणि तृतीयस्थानीं जे ग्रह असतील त्यांची एकपाद दृष्टि जन्मलग्नावर असते, याच क्रमानें नव, पंचमस्थानीं असतील त्यांची द्विपाद दृष्टि जाणावी; आणि चतुर्थस्थानीं, अष्टमस्थानीं जे ग्रह असतील त्यांची त्रिपाद दृष्टि; सप्तमस्थानीं असतील त्यांची पूर्ण सम दृष्टि जाणावी. जन्मलग्नापासून शनैश्वर एकादशस्थानीं अथवा तृतीयस्थानीं असतां पूर्ण दृष्टि, पंचम अथवा नवम गुरु असला तर, आणि चतुर्थ अष्टमस्थानीं भौम असला तर लग्नावर संपूर्ण दृष्टि असते.

## ग्रहांचें उच्चत्व नीचत्व.

रविर्मेषेतुलेनीचोवृषेचंद्रस्तुवृश्चिके ॥ भौमश्चनक्रेकर्केचत्रियां सौम्योझषेतथा ॥ १ ॥ गुरुःकर्केचनक्रेचमीनकन्येसितस्यच ॥ मंदस्तुलायांमेषेचकन्याराहुगृहस्यच ॥२॥ राहुर्युग्मेतुचापेचत मोवत्केतुजंफलम् ॥ प्रोक्तंग्रहाणामुच्चत्वंनीचत्वंचक्रमाद्बुधैः ॥३॥

टी०—रवि मेषींचा असल्यास उच्चत्व, तुळींचा असल्यास नीचत्व. चंद्र वृषभीं असल्यास उच्चत्व, वृश्चिकीं असला तर नीचत्व. भौम मकरीं असला तर उच्चत्व, कर्कींचा असला [illegible]र नीचत्व. बुध कन्याराशीस असला तर उच्चत्व, मकरींचा नीचत्व. गुरु कर्कींचा उच्चत्व, आणि मकरींचा नीचत्व. शुक्राचें मीन उच्चत्व, कन्या नीचत्व. शनि तुळींचा उच्चत्व, मेषींचा नीचत्व. राहूचें कन्यागृह, आणि मिथुनींचा उच्चत्व आणि धनींचा नीचत्व. आणि केतूचें शनैश्वराप्रमाणें जाणावें.

Scanned by CamScanner

## जन्मलग्नाचीं फळें.

मेषेदैन्यमुपैतिगर्वितवृषोनानामतिर्मन्मथेशूरः कर्कटकेधृतीचव नपेकन्याचमायान्विता ॥ सत्यंचैवतुलेत्वलौमलिनतापापा न्वितंवैधनुर्मूर्खोयंमकरेघटेचतुरतामीनेत्वधीरामतिः ॥ १ ॥

टी०—मेषलग्नीं जन्म जाहलें असतां दीनपणा, वृषभीं गर्वित, मिथुनीं नानाप्रकारची बुद्धि, कर्कीं मोठा शूर, सिंहलग्नीं स्थिर बुद्धी, कन्या अत्यंत मायावी, तुळीं सत्यवादी, वृश्चिकलग्नीं मलिनता, धनलग्नीं पापबुद्धि, मकरीं मूर्खपणा, कुंभीं चतुरता, मीनीं अल्पधीरता, अशीं जन्मलग्नाचीं फळें जाणावीं.

## स्त्रीजातक.

तनुस्थान ॥ ॥ मूर्तौकरोतिविधवांदिनकृत्कुजश्चराहुर्विनष्टत नयांरविजोदरिद्राम् ॥ शुक्रःशशांकतनयश्चगुरुश्चसाध्वीमायुःक्ष यंचकुरुतेत्रचशर्वरीशः ॥ १ ॥ धनस्थान ॥ ॥ कुर्वंतिभास्क रशनैश्चरराहुभौमादारिद्र्यदुःखमतुलंनियतंद्वितीये॥वित्तेश्वरी मविधवांगुरुशुक्रसौम्यानारींप्रभूततनयांकुरुतेशशांकः ॥ २ ॥ ॥ सहजस्थान ॥ ॥ सूर्येंदुभौमगुरुशुक्रबुधास्तृतीयेकुर्युःस्त्रि यंबहुसुतांधनभागिनींच ॥ सत्यंदिवाकरसुतःकुरुतेधनाढ्यांल क्ष्मींददातिनियतंकिलसैंहिकेयः ॥३॥ ॥ सुहृत्स्थान ॥ ॥ स्व ल्पंपयोभवतिसूर्यसुतेचतुर्थेदौर्भाग्यमुष्णकिरणःकुरुतेशशीच ॥ राहुर्विनष्टतनयांक्षितिजोल्पवीजांसौख्यान्वितांभृगुसुरेज्यबुधा श्चकुर्युः ॥ ४ ॥ ॥ सुतस्थान ॥ ॥ नष्टात्मजांरविकुजौखलुपंच मस्थौचंद्रात्मजोबहुसुतांगुरुभार्गवौच ॥ राहुर्ददातिमरणंरविज स्तुरोगंकन्याप्रसूतिनिरतांकुरुतेशशांकः ॥५॥ ॥ रिपुस्थान॥ ॥ षष्ठस्थिताशनिदिवाकरराहुभौमाजीवस्तथाबहुसुतांधनभागि नींच॥चंद्रःकरोतिविधवामुशनादरिद्रांवेश्यांशशांकतनयःकलह प्रियांच ॥६॥ ॥ जायास्थान ॥ ॥ सौरारजीवबुधराहुरवींदुशु क्रादद्युःप्रसह्यमरणंखलुसप्तमस्थाः ॥ वैधव्यबंधनभयंक्षयवित्त

नाशंव्याधिप्रवासमरणंनियतंक्रमेण ॥ ७ ॥ मृत्युस्थान ॥ स्थानेष्टमेगुरुबुधौनियतंवियोगंमृत्युंशशीभृगुसुतश्चतथैवराहुः ॥ सूर्यःकरोतिविधवांधनिनींकुजश्चसूर्यात्मजोबहुसुत।पतिवल्लभां च ॥ ८ ॥ धर्मस्थान ॥ ॥ धर्मस्थिताभृगुदिवाकरभूमिपुत्रजीवाःसुधर्मनिरतांशशिजःसुभोगां ॥ राहुश्चसूर्यतनयश्चकरोतिवंध्यांनारींप्रभूततनयांकुरुतेशशांकः ॥ ९ ॥ ॥ कर्मस्थान ॥ राहुर्नभस्तलगतोविधवांकरोतिपापेपरांदिनकरश्चशनैश्चरश्च ॥ मृत्युंकुजोर्थरहितांकुटिलांचचन्द्रःशेषाग्रहाधनवतींबहुवल्लभांच ॥ १० ॥ ॥ आयस्थान ॥ ॥ आयेरविर्बहुसुतांधनिनींशशांकः पुत्रान्वितांक्षितिसुतोरविजोधनाढ्यां ॥ आयुष्मतींसुरगुरुर्भृगुजःसुपुत्रींराहुःकरोतिसुभगांसुखिनींबुधश्च ॥ ११ ॥ ॥ व्ययस्थान ॥ ॥ अंत्येधनव्ययवतींदिनकृद्दरिद्रांवंध्यांकुजःपररतांकुटिलांचराहुः ॥ साध्वीसितेज्यशशिजाबहुपुत्रपौत्रयुक्तांविधुः प्रकुरुतेव्ययगोदिनांधां ॥ १२ ॥

## अष्टोत्तरीच्या महादशा.

| मकर | ७ | ० | ० | ७ | ० | ० | ७ | ० | ७ | ७ | ० | ७ |
| कुंभ | ७ | ७ | ० | ० | ७ | ० | ० | ७ | ० | ७ | ७ | ० |
| मीन | ० | ७ | ७ | ० | ० | ७ | ० | ० | ७ | ० | ७ | ७ |

नाडीफलमाह ॥ ॥ अग्रनाडीव्यधेद्भर्तांमध्यनाडीव्यधे
द्वयम् ॥ पृष्ठनाडीव्यधेत्कन्याम्रियतेनात्रसंशयः ॥ १ ॥

टी०—दोघांची आद्यनाडी भर्त्याला वाईट, मध्यनाडी दोघांस वाईट, अंत्यनाडी कन्येस मृत्युप्रद होय.

मध्यनाडी ॥ ॥ जठरेनिर्धनत्वंचगर्भेमरणमेवच ॥
पृष्ठेदौर्भाग्यमाप्नोतितस्मात्तांपरिवर्जयेत् ॥ १ ॥

टी०—दोघांची मध्यनाडी निर्धन, आणि गर्भ असतां मृत्यु, अंत्यनाडी दौर्भाग्यकारक ह्मणून त्या वर्जाव्या.

ज्योतिःप्रकाशेपार्श्वनाडी ॥ ॥ निधनंमध्यनाड्यांतुदंपत्योर्नैवपार्श्वयोः ॥ करग्रहेपृष्ठनाड्योर्नानिंद्येइतितद्वचः ॥ १ ॥

टी०—दोघांची मध्यनाडी निधन, तशीच पार्श्वनाडी. परंतु विवाहास पार्श्वनाडी निंदित नाहीं. अन्यमतें क्षत्रियादिकांस उक्त होय.

## असत्कूटाचें फल.

स्त्रीनक्षत्रापासून वरनक्षत्र जवळ असल्यास शुभ, आणि वरनक्षत्रापासून स्त्रीनक्षत्र दूर असलें तर शुभ, जर नक्षत्र एक अथवा स्वामी एक असल्यास शुभ.

वधुवरांचे गुण एकत्र पाहण्याचें कोष्टक.

Scanned by CamScanner

| | | रा. | मे. | मे. | मे. | वृ. | वृ. | वृ. | मि. | मि. | मि. | क. | क. | क. | सिं. | सिं. | सिं. | कं. | कं. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भा. | १ | १ | ·।· | ·।।।· | १ | ·।।· | ·।।· | १ | ·।।।· | ·।· | १ | १ | १ | १ | ·।· | ·।।।· | १ |
| राशि. | भाग | नक्ष. | अ. | भ. | कृ. | कृ. | रो. | मृ. | मृ. | आ. | पु. | पु. | पु. | आ. | म. | पू. | उ | उ | ह. |
| मेष | १ | अ. | ३६ | ३३ | ३२ | २४ | २१ | २२ | २७ | ३८ | १९ | २३॥ | ३१॥ | २८ | २७॥ | २१॥ | ३२ | ११ | १२ |
| मेष | १ | भ. | ३४ | ३५ | ३४ | ३१ | २२॥ | १४॥ | १९ | २६ | २७ | ३१॥ | ३३॥ | २१॥ | ३३॥ | ३४॥ | ३२॥ | २१॥ | ३० |
| मेष | ·।· | कृ. | ३३॥ | ३२ | ३६ | ३३ | १० | १६॥ | २०॥ | २२ | २१ | २५ | २३॥ | २३॥ | २३ | २६॥ | २६॥ | १५॥ | १५॥ |
| वृषभ | ·।।।· | कृ. | १८॥ | १८॥ | ३६ | ३६ | ३४ | ३३॥ | २५॥ | २५॥ | २९॥ | २२ | २४ | २० | १८ | ३१॥ | ३१॥ | २८ | २८ |
| वृषभ | १ | रो. | २३॥ | २४॥ | १३ | ३४ | ३६ | ३४॥ | ३५॥ | ३२ | २९ | २६॥ | २८ | १९ | १० | २४ | २७॥ | ३४ | ३४ |
| वृषभ | ·।।· | मृ. | २४ | ११ | ११॥ | ३२॥ | ३६ | ३६ | ३५ | ३३ | २९॥ | २६ | २० | २१ | १८ | १५ | २५ | ३१ | ३४ |
| मिथुन | ·।।· | मृ. | २८ | २९ | २३॥ | २७॥ | ३५ | ३६ | ३५ | ३४ | ३१ | २०॥ | १३॥ | १४॥ | २२॥ | १८ | २९॥ | ३१॥ | ३२॥ |
| मिथुन | १ | आ. | २० | १८ | २३ | ३३॥ | ३२॥ | ३४ | ३३ | ३४ | ३४ | ३३ | २३॥ | १५॥ | २३॥ | १९ | २१ | ३४ | ३४ |
| मिथुन | ·।।।· | पु. | ३० | २७ | २३ | २७॥ | ३०॥ | ३१॥ | ३०॥ | ३४ | ३४ | ३४ | २३ | १६॥ | २१॥ | २५॥ | २०॥ | २३ | ३४॥ |
| कर्क | ·।· | पु. | २३॥ | २९॥ | २५॥ | २२ | २५ | २६ | ३०॥ | १३ | ३३ | ३४ | ३४ | ३२॥ | २२ | १६ | २२ | १८॥ | १८॥ |
| कर्क | १ | पु. | ३०॥ | २४ | २७ | २४ | २१ | १९ | १३॥ | २४ | २३ | ३४ | ३६ | ३४ | २५ | २१ | ३० | १६॥ | २६॥ |
| कर्क | १ | आ. | २६ | २६ | २३॥ | १२ | १२ | २० | १४॥ | १५॥ | १५॥ | ३१ | ३४ | ३४ | २०॥ | २१ | १४ | २१॥ | २०॥ |
| सिंह | १ | म. | २२ | २८॥ | ३१ | १७ | १० | १८ | ३१॥ | २२॥ | २०॥ | २२ | २५ | २३॥ | ३६ | ३६ | ३२ | १८॥ | १५॥ |
| सिंह | १ | पू. | २६ | २४॥ | २२॥ | २० | २४ | १६ | १६॥ | २८ | २६॥ | २९ | ३३ | १९ | ३६ | ३६ | ३४ | ३० | २१॥ |
| सिंह | ·।· | उ. | १७ | ३२ | ३२ | २० | २६ | २५ | २८ | २०॥ | २०॥ | २३॥ | ३१ | ३१ | ३२ | ३४ | ३६ | ३३ | १५ |
| कन्या | ·।।।· | उ. | १३ | २२ | १६ | ३४ | ३४ | ३२॥ | ३१॥ | २३॥ | २३॥ | २० | २८ | २३॥ | २१॥ | ३१ | ३४ | ३५ | ३५ |
| कन्या | १ | ह. | १३ | २० | २७॥ | २८॥ | ३३ | ३४ | ३३ | २३॥ | २३॥ | २०॥ | २८॥ | २३॥ | २४॥ | २८॥ | २० | ३५ | ३६ |
| कन्या | ·।।· | चि. | १४ | ७ | २० | ३१ | २८ | २० | १९ | २६ | २४॥ | २१॥ | १३॥ | २७॥ | २१॥ | १५॥ | १४॥ | ३०॥ | ३३ |
| तूळ | ·।।· | चि. | २३॥ | १६ | १९॥ | २४॥ | २१ | १३ | २० | २७ | ३५॥ | २२ | १३ | २७ | ३५ | ११॥ | १७॥ | १८॥ | ३४ |
| तूळ | १ | स्वा. | ३०॥ | २९॥ | १७॥ | १२॥ | १५॥ | २७ | ३४ | ३३ | ३४॥ | २३॥ | २८ | १५ | १२॥ | २४॥ | २५॥ | २६॥ | ३४ |
| तूळ | ·।।।· | वि. | २३॥ | २४॥ | २१॥ | १६॥ | ११॥ | ९॥ | ३५ | २७॥ | २१ | २३॥ | २२॥ | १९॥ | १७॥ | १९॥ | १७॥ | १८॥ | २५॥ |
| वृश्चिक | ·।· | वि. | १७॥ | २५॥ | १५॥ | २० | १५ | २३ | १३ | १३॥ | १३॥ | २० | २० | ११॥ | ११॥ | २३॥ | ११॥ | १८॥ | १९ |
| वृश्चिक | १ | अ. | २४॥ | १९॥ | १९॥ | २४॥ | २८॥ | २१॥ | ११ | १६ | २०॥ | १७ | १९ | २१ | २४ | २० | १८ | २५ | १० |
| वृश्चिक | १ | ज्ये. | १२ | ११॥ | २४॥ | २९॥ | २३॥ | २३॥ | १३ | ३ | ५ | ११॥ | २१ | २६ | २३ | २०॥ | १५॥ | १२ | १२ |
| धन | १ | मू. | २८ | २८ | ३३ | २० | १४ | १४ | २१ | १३ | १३ | १०॥ | १९॥ | २६ | ३२॥ | २६॥ | १७ | १६॥ | १३ |
| धन | १ | पू. | ३४ | २६ | ३४॥ | १५ | २० | १२ | १९ | २७ | २७ | २४॥ | १६॥ | २८॥ | ३२॥ | ३४॥ | ३२ | ३२॥ | २० |
| धन | ·।· | उ. | ३२ | ३३ | ३४ | १६ | ११॥ | १८ | २४ | २७ | २७ | २४॥ | २४॥ | ११॥ | २३ | ३२॥ | ३२॥ | १२ | १८॥ |
| मकर | ·।।।· | उ. | २८ | २८॥ | १९॥ | २६ | २३ | २९॥ | २९॥ | १३॥ | २३॥ | २८ | २८ | १४ | १६ | २०॥ | २०॥ | २७ | २७ |
| मकर | १ | श्र. | २८ | २७ | २५ | २१ | २१ | ३४ | ३५ | ३२॥ | ३३॥ | २८ | २८ | १५ | १३ | १८ | १९॥ | २६ | २७ |
| मकर | ·।।· | ध. | २१ | १२ | २६ | ३१ | २८ | २० | ११ | १८ | १६॥ | २० | १२ | २६ | २६ | १५ | १२ | १८॥ | २० |
| कुंभ | ·।।· | ध. | २१ | १२ | २६ | ३१॥ | २८ | २० | १२ | १९ | २७॥ | १४ | १६ | २० | २५ | ११॥ | १८॥ | १४॥ | २९ |
| कुंभ | १ | श. | १६ | २२ | २८ | २३॥ | १६॥ | २८ | २० | १२ | १२ | ८॥ | १५ | २१ | २१॥ | १९॥ | ११॥ | ७॥ | १०॥ |
| कुंभ | ·।।।· | पू. | १९ | २६ | २० | ३४ | ३२॥ | ३२॥ | २४॥ | १७ | १७ | १३॥ | २१॥ | १४ | १९॥ | २५॥ | १६॥ | १२॥ | १५ |
| मीन | ·।· | पू. | २१॥ | २९॥ | २३॥ | ३३॥ | २७ | २७ | १७ | २७ | १८ | १७ | २६ | ७॥ | ३० | २३ | १४ | १८॥ | १८ |
| मीन | १ | उ. | ३१॥ | २३॥ | ३१॥ | ३१॥ | २७ | १९ | १९ | २७ | २८ | २६ | १९ | २० | ३० | १५॥ | २५ | १९ | २८ |
| मीन | १ | रे. | ३२ | ३० | १८॥ | १८॥ | १८ | २७ | ३५ | २६ | २६॥ | ३४॥ | ३३ | १३ | १८॥ | २२ | २३ | २६ | २७ |

Scanned by CamScanner

| कं. | तू. | तू. | तू. | वृ. | वृ. | वृ. | ध. | ध. | ध. | म. | म. | म. | कुं. | कुं. | कुं. | मी. | मी. | मी. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ·।।· | ·।।· | १ | ·।।।· | ·।· | १ | १ | १ | १ | ·।· | ·।।।· | १ | ·।।· | ·।।· | १ | ·।।।· | ·।· | १ | १ | |
| चि. | चि. | स्वा. | वि. | वि. | अ. | ज्ये. | मू. | पू. | उ. | उ. | श्र. | ध. | ध. | श. | पू. | पू. | उ. | रे. | |
| २४ | २३॥ | २९ | २३॥ | १९॥ | २४ | १५ | ११ | ३३ | ३१ | ३६ | २७ | २१ | २१ | १६ | १० | २२ | ३१ | ३४ | १ |
| ५ | १३॥ | १९॥ | २३॥ | १८॥ | १५॥ | १९॥ | ३४ | २६ | ३४ | २८॥ | २७॥ | ११ | ११ | २७ | २५ | ३०॥ | २४ | ३२ | २ |
| १९॥ | २७॥ | १५॥ | १९॥ | १६॥ | १८॥ | २५॥ | ३३॥ | २८॥ | २० | १४॥ | २४ | २५ | २६ | २७ | २० | २५॥ | २६॥ | १०॥ | ३ |
| २८ | २० | ७॥ | १२॥ | २०॥ | १६॥ | ३०॥ | २२ | २३॥ | ९॥ | १४ | २०॥ | ३१॥ | ३०॥ | ३१॥ | २४॥ | २१॥ | २३॥ | १४ | ४ |
| ३४ | १७ | १३॥ | ६॥ | १४ | २९॥ | ३४॥ | १५ | ३१ | १२॥ | १८ | २६ | ३४॥ | ३३ | ३१॥ | ३१ | २८ | २८ | ३० | ५ |
| २१ | १० | २३ | १५॥ | २३॥ | २१॥ | २५॥ | १६ | १२ | १८ | २३॥ | ३४ | २१ | २० | २८ | २०॥ | २७ | २९ | २८ | ६ |
| २१ | २१ | ३४ | ३४॥ | २४ | ११ | १५॥ | २२ | १९ | १८ | २१॥ | २६ | १३ | १४ | २९ | २४॥ | २७ | २९ | २८ | ७ |
| ३४ | ३४ | ३४ | ३४ | २१॥ | १७ | ४ | १४ | २८ | २८ | २४॥ | २९ | १९ | २० | १३ | ८ | २०॥ | २८ | २८ | ८ |
| २७॥ | २७॥ | ३४ | २९ | १६॥ | २१॥ | ७ | १५ | २७ | २७ | २३॥ | २४॥ | १८ | १९॥ | १४ | १० | १९ | २८ | २८ | ९ |
| २२॥ | २२ | २८ | २३ | २१ | २६ | ११॥ | १०॥ | २३॥ | २६ | २६ | २७ | २१ | १४ | ८॥ | ११॥ | २० | ३६ | २९ | १० |
| १२॥ | १२ | २७ | २२॥ | २१ | १८ | ११ | १९॥ | १४॥ | २२॥ | २६ | २७ | २३ | ६ | १५ | १०॥ | ८ | १८ | २७ | ११ |
| २७॥ | २७ | ६ | १० | १६॥ | २० | २६ | २५ | ११॥ | ९॥ | २३ | २३ | २६ | ९ | २० | १३ | २४ | ३१ | १३ | १२ |
| २८॥ | २४॥ | १० | १९ | ३२॥ | २४॥ | ३२ | ३२॥ | १६॥ | १७ | ४ | ४ | १९ | २४॥ | २४॥ | १८ | १८ | १८ | ११॥ | १३ |
| १४ | १६॥ | २४॥ | १८॥ | २४॥ | २२॥ | ३०॥ | ३२॥ | २४॥ | ३२॥ | १९॥ | १८ | ५ | ९॥ | १८॥ | २४॥ | २४ | १६ | १४ | १४ |
| १९॥ | १५॥ | २५॥ | १५ | २१॥ | ३०॥ | ३२॥ | २३ | ३२॥ | ३२॥ | १९॥ | १९ | १२ | १६॥ | १०॥ | १०॥ | १५ | २६ | २४ | १५ |
| ३० | २०॥ | ३०॥ | २२॥ | १८ | २७ | १३ | २४ | २२॥ | २१॥ | २६ | २६ | १८ | १६ | ९॥ | ११ | १८ | ३० | २८ | १६ |
| ३३ | २६ | ३२॥ | २४॥ | २० | २७ | १४ | १५ | २७ | २६॥ | २५ | २६ | २१ | १७ | १०॥ | १३ | १८ | ३० | २८ | १७ |
| ३४ | ३३ | २६ | ३०॥ | २७ | ११ | २५ | २६ | २२ | १२ | १८॥ | १९ | १८ | १९ | २३॥ | १७ | २० | १२ | २२ | १८ |
| ३४ | ३४ | ३२॥ | ३२॥ | ३२॥ | ७॥ | ११॥ | २१ | १२ | २२ | २६॥ | २६ | २४ | २४ | ३०॥ | २६ | २४ | ५ | ५ | १९ |
| २८ | ३३ | ३६ | ३३ | २३॥ | २०॥ | २७॥ | २३ | २७ | १८ | २३॥ | २४ | २७ | २७ | २८ | ३४ | २० | २१ | १२ | २० |
| ३२॥ | ३२॥ | ३३ | ३४ | २६ | २७॥ | २१॥ | २६ | २० | १४ | १८॥ | १६॥ | ३० | ३० | ३१ | २० | १५॥ | १४॥ | ७ | २१ |
| २६ | १९॥ | २६॥ | २६ | ३२ | ३३ | ३१॥ | २८॥ | २२ | १७॥ | १३ | १५॥ | २४॥ | २५॥ | २६॥ | ११॥ | २६ | ३५ | १३॥ | २२ |
| १२ | ८ | ३२ | १८ | ३३ | ३६ | ३६ | २४॥ | ३३॥ | ३० | २६ | ३१ | १६ | ११ | २१ | २४॥ | ३१ | २५ | ३४ | २३ |
| २५ | २१॥ | १६॥ | २१॥ | २१॥ | ३६ | ३६ | २२ | २५ | २५ | २१॥ | २५॥ | २९॥ | २४॥ | २६ | ११॥ | १६॥ | २८ | २८ | २४ |
| २७ | २७ | २६ | १७ | ३२॥ | १४॥ | २४ | ३४ | ३५ | ३२॥ | २२॥ | २६॥ | ३०॥ | २७ | २०॥ | १३॥ | १६ | २६ | २८ | २५ |
| १२ | १८ | १९ | २६ | ३१॥ | १४॥ | ३२॥ | ३४ | ३६ | ३४ | २४ | ३४ | १६॥ | १३॥ | २३॥ | २७ | ३०॥ | १७॥ | ३२॥ | २६ |
| २१ | २७ | १९ | १९ | २३॥ | ३२ | ३२॥ | ३२॥ | २४ | ३६ | ३५ | २६ | ३२॥ | ३३ | ३२॥ | १९॥ | ३२ | ३२ | २४ | २७ |
| १७ | ३१॥ | ३१॥ | २१॥ | १९॥ | २७॥ | २२ | २८॥ | २५ | ३२ | ३६ | ३४ | ३२ | ३१॥ | १८॥ | ३१॥ | ३० | ३० | ३२ | २८ |
| २० | २७ | २२ | १७॥ | १४ | २७ | २३ | १९॥ | १८ | २७ | ३४ | ३६ | ३३ | ३६ | १९॥ | २९॥ | २७ | २९॥ | ३२॥ | २९ |
| १७ | २४ | २९ | ३१॥ | २७ | १३ | २७ | २४॥ | ९॥ | १८ | ३२ | २७ | ३४ | ३३ | २५ | २५ | २४ | १४ | २३॥ | ३० |
| १७ | २५ | २७ | ३१॥ | २६ | १२ | २६ | २७॥ | १५ | २४॥ | २६॥ | १९ | ३१ | ३४ | ३३ | ३२॥ | १७॥ | ८ | १५॥ | ३१ |
| २५ | ३३ | २८ | २३ | २७ | २१ | १९ | १२॥ | २४ | २४ | २६ | १८॥ | २५ | ३३॥ | ३६ | ३२ | १८ | १०॥ | १७॥ | ३२ |
| १७॥ | ३१ | ३३ | ३३ | २७॥ | २७॥ | ३४ | १६॥ | १९॥ | ३०॥ | ३२॥ | ३३॥ | १८॥ | ३२॥ | ३३ | ३४ | ३४ | ३४ | २१ | ३३ |
| २० | १३ | २०॥ | ३४॥ | २७ | २६ | २३ | २३॥ | ३०॥ | ३१ | २९॥ | ३०॥ | ३१ | १७॥ | २० | १७॥ | ३४ | ३३ | ३०॥ | ३४ |
| ११ | ५ | २१ | १२॥ | २६ | १९ | ३४ | ३१॥ | २३॥ | ३१॥ | २९॥ | २९॥ | २२ | ८॥ | १७॥ | २० | ३३ | ३५ | ३४ | ३५ |
| २२ | १८ | २२ | ८ | १८॥ | २७ | २९ | २८ | ३० | ३२॥ | २०॥ | २१॥ | २०॥ | १५॥ | १७॥ | २०॥ | ३०॥ | ३४ | ३४ | ३६ |

## दोषलक्षणमाह, कर्तरी.

लग्नाच्चंद्राद्व्ययद्विःस्थौपापखेटौयदातदा ॥ कर्तरीवर्जनीयासावि वाहोपनयादिषु ॥ १ ॥ नहिकर्तरिजोदोषःसौम्ययोर्यदिजाय ते ॥ शुभग्रहयुतंलग्नंक्रूरयोर्नास्तिकर्तरी ॥ २ ॥

टी०–लग्न अथवा चंद्र यांपासून बारा आणि दोन या स्थानीं पापग्रह असतां कर्तरी दोष होय. तो विवाह आणि उपनयन यांस वर्जावा. कर्तरीदोषभंगलक्षण. वर सांगितले स्थानीं सौम्य ग्रह असले तर अथवा शुभग्रहयुक्त लग्न असलें तर शुभ आणि क्रूर ग्रह असतांही कर्तरी दोष नाहीं.

## वधुवरांचे राशीपासून आठवें लग्न.

वरवध्वोर्बटोश्चापिजन्मराशेश्चलग्नतः ॥
त्याज्यमष्टमलग्नंस्याद्विवाहव्रतबंधयोः ॥ १ ॥

टी०–वर, वधू व वटू यांची जन्मराश व लग्न यांपासून अष्टम लग्न विवाहास आणि उपनयनास वर्जावें.

## दुष्ट मुहूर्त कथन.

तिथ्यंशोदिनमानस्यरात्रिमानस्यचैवहि ॥
मुहूर्तःकथितस्तेषुदुर्मुहूर्तंशुभेत्यजेत् ॥ १ ॥

टी०–दिनमान व रात्रिमान यांचा १५ वा अंश दुर्मुहूर्त होय तो शुभ कार्यांत वर्ज्य करावा.

## लत्तादोष.

भौमात्र्याकृतिषट्जिनाष्टनखभंहंत्यग्रतोलत्तयाखेटोऽर्कोऽर्क मितंशशीमुनिमितंपूर्णोनसन्मालवे ॥

टी०–भौम ज्या नक्षत्रीं असेल त्यापासून तृतीय नक्षत्रीं लत्ता दोष, आणि बुध ज्या नक्षत्रीं असेल त्यापासून बाविसावे नक्षत्रीं लत्ता दोष. गुरु ज्या नक्षत्रीं असेल त्यापासून ६ वें नक्षत्र. शुक्र ज्या नक्षत्रीं त्यापासून २४ वें नक्षत्र. शनि ज्या नक्षत्रीं त्यापासून ८ वें नक्षत्र. राहु ज्या नक्षत्रीं त्यापासून २० वें नक्षत्र. रवि ज्या नक्षत्रीं त्यापासून १२ वें नक्षत्र. चंद्र पूर्ण असतां ७ वे नक्षत्रीं लत्ता दोष. हे दोष मागधदेशीं अशुभ, अन्य देशीं शुभ होत.

# यामार्द्धादिकथन.

सूर्याद्यामदलंदिवैवनिगमाद्ययश्रीषुनागत्रिषट्संख्यांकंकुलिकंदिवं द्वरविदिङ्नागर्तुवेदद्विकम् ॥ द्व्येकंतंनिशिषोडशांशमपरेतिथ्यं शमुञ्झंतितैःकालंकंटकमैनिघंटमपरेज्यज्ञास्फुजिद्व्यःक्रमात् ॥ १ ॥

टी०—दिवा रविवारापासून अर्द्ध यामार्ध कोष्टकांत अंक आहेत आणि प्रवृत्ति निवृत्तीचे अंक आहेत ते यथानुक्रमेंकरून जाणावे ते शुभ कर्मांस वर्जावे. दिवा दिनमानाचा षोडशांश रविवारापासून कुलिक कोष्टकांत अंक आहेत ते कुलिक संज्ञा होत. शुभकर्मांस वर्जावे. रात्रौ एकेक न्यून करावा. केचिन्मतें दिनमानाचा पंचदशांश वर्ज्य करावा, गुरुवारापासून कालदोष; बुधवारापासून कंटक आणि शुक्रवारापासून ऐनिघंट हे सर्व यथाक्रमें कुलिकवत् वर्जावे.

| वार | + यामार्ध घटिका ४ | | | कुलिक घ० २ | काळ घ० २ | कंटक घ० २ | ऐनिघटं घ० २ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रवृत्ति | निवृत्ति | | | | |
| रवि | ४ था | १२ | १६ | १४ वा | ८ वा | ६ वा | १० वा |
| सोम | ७ वा | २४ | २८ | १२ वा | ६ वा | ४ था | ८ वा |
| भौम | २ रा | ४ | ८ | १० वा | ४ था | २ रा | ६ वा |
| बुध | ५ वा | १६ | २० | ८ वा | २ रा | १४ वा | ४ था |
| गुरु | ८ वा | २८ | ३२ | ६ वा | १४ वा | १२ वा | २ रा |
| शुक्र | ३ रा | ८ | १२ | ४ था | १२ वा | १० वा | १४ वा |
| शनि | ६ वा | २० | २४ | २ रा | १० वा | ८ वा | १२ वा |

# ग्रहणनक्षत्र व उत्पातनक्षत्र यांचे दोष.

यस्मिन्धिष्ण्येमहोत्पातोग्रहणंवाभवेद्यदि ॥
तस्मिन्धिष्ण्येशुभंकर्मषण्मासेवर्जयेद्बुधः ॥ १ ॥

टी०—ज्या नक्षत्रीं उत्पात अथवा ग्रहण होतें तें नक्षत्र सहा महिने शुभकर्मांस वर्जावें.

# पापग्रहयुक्त आणि वेधनक्षत्रें.

श्रुत्यग्निभेऽभिजिब्राह्मेवैश्वेदक्षेबुरुद्रभे ॥ मूलादित्येचपुष्येंद्रमैत्राश्ले

+ एका दिवसाचे यामार्द्ध आठ, कुलिकादि १६ वारपरत्वें जाणावे, परंतु त्यांतून ज्या-वारीं जे वर्जावयाचे ते कोष्टकांत लिहिले आहेत.

Scanned by CamScanner

षमघांतके ॥१॥ दस्रभाग्यर्यमांत्येचहस्ताहिर्बुध्न्यभेतथा॥चित्राऽजजरणेस्वातीवारुणेचपरस्परम् ॥२॥ वासवेंद्राग्निभेतद्वद्वेधःसप्तशलाकजः॥त्याज्यःपापोद्भवोयत्नाद्व्रतबंधादिकर्मसु ॥ ३ ॥

टी०—पंच सप्त शलाकामध्यें ज्या रेषेवर जें नक्षत्र असेल त्या नक्षत्रीं पापग्रह असतां त्याचे समोरचे रेषेवरचें नक्षत्र विद्ध होय.

पंचशलाकायंत्र.




सप्तशलाकायंत्र.




## नक्षत्रचरण वेध.

सप्तपंचशलाकाभ्यांविद्धमेकार्गलेनयत् ॥ लत्तोपग्रहगंधिष्ण्यं पादमात्रंशुभेत्यजेत् ॥ १ ॥ वेधमाद्यंतयोरंघ्र्योरन्योन्यंद्वितृतीययोः ॥ क्रूरैरपित्यजेत्पापंकेचिद्धचुमहर्षयः ॥ २ ॥

टी०—विद्धनक्षत्र, एकार्गल आणि लत्ता, व उत्पातनक्षत्र यांचे चरणीं शुभ ग्रह असतां तो चरण शुभकर्मास वर्जावा. प्रथम, चतुर्थ, द्वितीय आणि तृतीय हे नक्षत्रचरण परस्परें करून विद्ध होत. हे केचिन्मतेंकरून पापग्रह विद्ध नक्षत्राचे चरण वर्जावे.

## एकार्गलदोषमार्तंडमते.

विष्कंभादि दुष्टयोगरहित दिननक्षत्रापासून अभिजित्सह गणून विषम नक्षत्रीं सूर्य असतां एकार्गल दोष होय.

## चंडायुध.

शूलगंडांत्यपातानांसाध्यहर्षणयोस्तथा ॥
अंत्यंयच्चंद्रभंतस्मिन्नेतच्चंडायुधंनसत् ॥ १ ॥

Scanned by CamScanner

टी०—शूल, गंड, व्यतीपात, साध्य, वैधृति, हर्षण या योगांचे अंतीं जें नक्षत्र असेल त्यास चंडायुध दोष ह्मणतात.

## क्रांतिसाम्यः

ऊर्ध्वरेखात्रयंचैवतिर्यग्रेखात्रयंतथा ॥ क्रांतिसाम्यंबुधैर्ज्ञेयंमध्ये मीनंतुयोजयेत् ॥ १ ॥ मेषसिंहौतुलाकुंभौगोनक्रौकर्कवृश्चिकौ ॥ कन्यामीनौधनुर्युग्मेतत्रान्योऽन्यंस्थितावुभौ ॥ रविचंद्रौतदाज्ञेयःक्रांतिसाम्यस्यसंभवः ॥ २ ॥

टी०—तीन ऊर्ध्वरेषा व तीन आडव्या रेषा काढून मध्यभागींच्या रेषेवर मीन, लग्न मांडून पुढें क्रमेंकरून मेषादि लग्नें सर्व रेषांवर मांडावीं. ज्या लग्नीं चंद्र असेल त्याच्या समोरच्या लग्नीं सूर्य असला ह्मणजे मेष, सिंह, तूळ, कुंभ, वृषभ, मकर, कर्क, वृश्चिक, कन्या, मीन, धन, व मिथुन या सहा युग्मीं समोर चंद्र सूर्य असतां क्रांतिसाम्य दोष तो वर्ज्य आहे.




## जामित्रदोष.

लग्नेंदोर्नास्तगःपापस्तत्तुल्यांशेयदिस्थितः ॥ तदाजामित्रदोषः स्यान्नहिन्यूनाधिकांशके ॥ १ ॥ क्रूरोवायदिवासौम्योलग्नाच्चंद्राच्चखेचरः ॥ एकोऽपियदिजामित्रेसमांशेचतदाभवेत् ॥ २ ॥ जामित्रंनप्रशंसंतिगर्गकश्यपदेवलाः ॥ आयषष्ठतृतीयेषुधनधान्यप्रदोरविः ॥ ३ ॥

टी०—लग्न चंद्रामध्यें सप्तमस्थानाचा पापग्रह न्यून करून तत्तुल्यांश आला असतां जामित्र दोष होय, अधिक किंवा न्यून असतां दोष नाहीं. दुसरा पक्ष;-लग्न चंद्रापासून सप्तमस्थानीं शुभग्रह अथवा पापग्रह समांश असतां जामित्र दोष होय. तो गर्ग, कश्यप, देवल, ह्या ऋषींच्यामतें जामित्र दोष विवाहास वर्जावा. जर लग्नापासून एकादश, षष्ठ, तृतीय, या स्थानीं सूर्य असला तर जामित्र दोष शुभप्रद जाणावा.

## चरत्रयदोष.

कर्कलग्नेथवामेषघटांशोयदिदीयते ॥
तुलायांमकरेचंद्रेवैधव्यंजायतेध्रुवम् ॥ १ ॥

टी०—कर्कलग्नीं व मेषलग्नीं तुळांश आणि मकर अथवा तूळ या दोन्ही राशींचा चंद्र असे योगांचे दोष वैधव्यकारक ते वर्जावे.

## तिथिपरत्वें लग्नें वर्ज्य.

प्रतिपदितूलामकरौसिंहमकरौतृतीयायाम् ॥ कन्यामिथुनेपंच
म्यांसप्तम्यांचैवधनुःकर्कौ ॥ १ ॥ नवम्यांकर्कसिंहौएकादश्यांतु
धनुर्मिनौ ॥ त्रयोदश्यांवृषभमीनौशून्यंलग्नानितिथियोगात् ॥ २ ॥

टी०—प्रतिपदेस तूळ आणि मकर. तृतीयेस सिंह मकर. पंचमीस कन्या मिथुन. सप्तमीस धन कर्क. नवमीस कर्क सिंह. एकादशीस धन मीन, त्रयोदशीस वृषभ मीन. हीं या तिथींस लग्नें शून्य होत यास्तव वर्जावीं.

## दोषनिवारण.

द्यूनंविनाकेंद्रगतोमरेज्यस्त्रिकोणगोवापिहिलक्षमेकम् ॥
निहंतिदोषांस्त्रिशतंभृगुश्चशतंबुधोवापिहिदृश्यमूर्तिः ॥ १ ॥

टी०—गुरु शुक्र अथवा बुध हे १, ४, १०, ९, ५, या स्थानीं असतां लक्ष, तीनशें, शंभर असे ग्रहत्रय क्रमेंकरून दोषनाश करितात.

## लग्नमुहूर्त.

## राश्युदय.

गजाग्निदस्रागिरिषट्कदस्राव्योमेंदुरामारसरामरामाः ॥ कुराम
रामागजचंद्ररामानागेंदुलोकाःकुगुणानलाश्च ॥ १ ॥ षट्
रामरामाखशशांकरामासप्तांगपक्षाश्चगजाग्निदस्राः ॥ २ ॥

टी०—राश्युदय ह्मणजे मेषादि द्वादशराशी तींच लग्नें होत, ज्या राशीस सूर्य येईल तें लग्न उदयकाळीं प्रथम जाणावें. त्यांचा पळसंख्येचा क्रम.

| लग्नें | मेष | वृषभ | मिथुन | कर्क | सिंह | कन्या | तूळ | वृश्चिक | धन | मकर | कुंभ | मीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पळें | २३८ | २६७ | ३१० | ३३६ | ३३१ | ३१८ | ३१८ | ३३१ | ३३६ | ३१० | २६७ | २३८ |

## लग्नांच्या घटिकांची संख्या.

मीनेमेषेऽयष्टपंचक्रमान्नाडयःपलानिच ॥ वृषेकुंभेऽब्धिसप्तद्वी पंचदिङ्मिथुनेमृगे ॥ ३ ॥ धनुःकर्केशरेषट्त्रिसिंहाल्योःशरभू त्रयम् ॥ बाणाष्टदशतूलांगेलग्ननाडयःपलानिच ॥ ४ ॥

टी०—मेषादि बारा लग्नें यांच्या घटिका पळांचा क्रम.

| लग्नें | मेष | वृषभ | मिथुन | कर्क | सिंह | कन्या | तूळ | वृश्चिक | धन | मकर | कुंभ | मीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| घटी | ३ | ४ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ४ | ३ |
| पळें | ५८ | २७ | १० | ३६ | ३१ | १८ | १८ | ३१ | ३६ | १० | २७ | ५८ |

## भुक्तपळें प्रतिदिवशीं पाहणें.

मीनाजेसप्तषट्पंचपलानिविपलानितु ॥ गोकुंभेष्टौयुगशरादि ग्विंशतिर्नृयुङ्मृगे ॥५॥ कर्कचापेभवाःसूर्याःसिंहाल्योरुद्रदिङ्मि ताः ॥ तूलांगेदिक्चषट्त्रीणिलग्नेष्वेकांशसम्मिताः ॥ ६ ॥

टी०—जें लग्न उदयकाळीं असेल तें प्रति दिवसीं किती भोगतें त्याची संख्या.

| लग्नें | मे. | वृ. | मि. | क. | सिं. | क. | तू. | वृ. | ध. | म. | कुं. | मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पळें | ७ | ८ | १० | ११ | ११ | १० | १० | ११ | ११ | १० | ८ | ७ |
| विपळें | ५६ | ५४ | २० | १२ | २ | ३६ | ३६ | २ | १२ | २० | ५४ | ५६ |

## उदयास्तलग्नकथन.

यस्मिन्राशौयदासूर्यस्तल्लग्नमुदयेभवेत् ॥
तस्मात्सप्तमराशिस्तुअस्तलग्नंतदुच्यते ॥ ७ ॥

टी०—ज्या राशीस सूर्य येतो तेंच लग्न उदयकाळीं प्रथम; त्यापासून सप्तम लग्नीं सूर्यास्त होतो तें अस्तलग्न जाणावें.

## लग्नास उत्तांश देण्याचा क्रम.

वृषंचमिथुनंकन्यातुलाधन्विझषस्तथा ॥
एतेशुभानवांशास्तुततोऽन्येकुनवांशकाः ॥ १ ॥

टी०—वृषभ, मिथुन, कन्या, तूळ, धन, मीन, हे अंश द्वादश लग्नांस शुभ होत अन्य अशुभ होत. मेषादि १२ लग्नें व अंश ७ कोष्टकांत आहेत त्यांत ज्या अंशास वर्गशुद्धि येईल त्या अंशाखालील कोष्टकांतील लग्न घ्यावें. आणि त्या अंशाच्या घटींस अयनांश देऊन भुक्तकाल आणावा.



Scanned by CamScanner

| | वृष. | मिथु. | क. | क. | तूळ. | धन. | मीन. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मेष | ०<br>३<br>२० | ०<br>६<br>४० | ००<br>१०<br>० | ०<br>१६<br>४० | ०<br>२० | ०<br>२६<br>४० | ०<br>०<br>०<br>० |
| वृषभ | १<br>१३<br>२० | १<br>१६<br>४० | १<br>२६<br>०० | १<br>२६<br>४० | ०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>०<br>० |
| मिथुन | ०<br>२३<br>२० | २<br>२६<br>४० | ०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>०<br>० | २<br>०<br>०<br>० | २<br>६<br>४० | २<br>१६<br>४० |
| कर्क | ०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>०<br>० | ३<br>०<br>०<br>० | ३<br>६<br>४० | ३<br>१०<br>० | ३<br>१६<br>४० | ३<br>२६<br>४० |
| सिंह | ४<br>३<br>२० | ४<br>६<br>४० | ४<br>१०<br>० | ४<br>१६<br>४० | ४<br>२०<br>० | ४<br>२६<br>४० | ०<br>०<br>०<br>० |
| कन्या | ५<br>१३<br>२० | ५<br>१६<br>४० | ५<br>२०<br>० | ५<br>२६<br>४० | ०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>०<br>० |
| तूळ | ६<br>२३<br>२० | ६<br>२६<br>४० | ६<br>०<br>० | ६<br>०<br>० | ६<br>०<br>० | ६<br>६<br>४० | १<br>१६<br>४० |
| वृश्चिक | ०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>०<br>० | ७<br>०<br>०<br>० | ७<br>६<br>४० | ७<br>१०<br>० | ७<br>१६<br>४० | ७<br>२६<br>४० |
| धन | ८<br>३<br>२० | ८<br>६<br>४० | ८<br>१०<br>० | ८<br>१६<br>४० | ८<br>२०<br>० | ८<br>२६<br>४० | ०<br>०<br>०<br>० |
| मकर | ९<br>१३<br>२० | ९<br>१६<br>४० | ९<br>२०<br>० | ९<br>१६<br>४० | ०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>०<br>० |
| कुंभ | १०<br>२३<br>२० | १०<br>१६<br>४० | ०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>०<br>० | १०<br>०<br>०<br>० | १०<br>६<br>४० | १०<br>१६<br>४० |
| मीन | ०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>०<br>० | ११<br>०<br>०<br>० | ११<br>६<br>४० | ११<br>१०<br>० | ११<br>१६<br>४० | ११<br>२६<br>४० |

कोष्टकांत चार अंक आहेत त्यांचीं नांवें,—राशि, अंश, कला, विकला, जाणावीं, राशींची संज्ञा शून्याचें नांव मेष आणि वृषभाचें नांव १ या प्रमाणें बारा राशी होत.

## तत्काळ स्पष्ट सूर्य आणावयाचें साधन.

गतगम्यदिनाहतद्युभुक्तःखरसभांशवियुग्युतोग्रहःस्यात्॥

टी०—पंचांगीं ग्रहांचे कोष्टकांत पौर्णिमेचा तसाच अमावास्येचा अवधिस्थ सूर्य स्पष्ट आहे परंतु पौर्णिमेचा सूर्य ज्या दिवसास न्यावयाचा ते दिवस मोजून त्या दिवसांनीं कोष्टकांतील सूर्याची गति गुणून ६० नीं भागून जे अंक येतील ते अंश घटी पळें जाणावीं परंतु पौर्णिमेचा सूर्य तो मागें आणावयाचा असल्यास पंचांगीं सूर्याचे अंश, घटी, पळें, कोष्टकांत आहेत ते जे अंक आले असतील त्यांत कमी करावे आणि पुढें न्यावयाचा असल्यास आंत मिळवावे ह्मणजे तात्कालिक सूर्य होतो.

## (उदाहरण) भुक्तदिवसांचें.

शके १७६९ कार्तिक शुद्ध ९ भौमवारीं स्पष्ट सूर्य किती आहे तो सांगा.

पळें    विप.    सूर्यांचो गति
६०    ४७
६ दिवस ९ पासून १५
मेचे अंतरानें गुणावें.
३६०    २८२ गुणाकार.
भाग ६० ) २८२ (४ अंश
२४०
३६०    ४२ बाकीप.
४    ४२ मिळवावे
३६४    ४२

अं. घ. प.
६ ४ ४२ भा. ६०) ३६४(६ ४ ४२
३६

स्पष्ट रवीचें उत्तर.

| पंचांगस्थरवि | अं. | क. | वि. |
|---|---|---|---|
| | ७ | ७ २१ | ५७ |
| वजाबाकी | ६ | ४ | ४२ |
| शेषसंख्या | ७ | १ १७ | १५ |

हा स्पष्ट सूर्य जाणावा.

## अभुक्त दिवसांचें उदाहरण.

शके १७६९ कार्तिक कृष्ण ६ चा स्पष्ट सूर्य आणावयाचा क्रम १५मेचा स्पष्ट सूर्य राशि ७ अंश ७ घ. २१ प. ५७ अभुक्त दिवस६सूर्याची गति६०,४७ हे अंक ६ नीं गुणावे तो गुणाकार ३६४।४२ यांस ६० नीं भागावें शेष उरेल ते अंक ६ घटी४ पळें ४२ हे अंक व सूर्याचे अंश घटिकापळांमध्यें मिळवावे ह्मणजे ७ राशि, १३ अंश, २६ घटी, ३९ पळें या प्रकारें होत.

# अयनांश आणावयाचा प्रकार.

शाकोवेदाब्धिवेदोनःषष्टिभक्तोऽयनांशकाः ॥
देयास्तेतुरवौस्पष्टेचरलग्नादिसिद्धये ॥ १ ॥

टी०—चालत्या शकामध्यें ४४४ चारशें चवेचाळीस कमी करावे शेष राहील त्यास ६० नीं भागावें. चर, स्थिर, द्विःस्वभाव या लग्नांचे सिद्धिकारणें ते अयनांश स्पष्ट सूर्याचे अंश घटिकेंत मिळवावे ह्मणजे सायन सूर्य होतो.

## उदाहरण.

| | | |
|---|---|---|
| शके १७६९ यांत<br>४४४ हे वजा करावे.<br>१३२५ | भा.६०)१३२५(२२अंश<br>१२०<br>१२५<br>१२०<br>५<br>६० गुणक<br>भाग ६०)३०० (५ कला<br>३०० | ७ १ १७ १५ स्पष्टरवि<br>२२ ५ अयनांश<br>मिळवावे<br>७ २३ २२ १५<br>सायन सूर्य जाणावा. |

# लग्नावरून इष्टकाळ आणावयाचा क्रम.

स्फुटसायनभागर्कभोग्यांशफलसम्मितिः ॥ सायनांशतनोश्चापिभुक्तांशफलसंयुता ॥ १ ॥ मध्यलग्नोदयैर्युक्ताषष्ट्याप्ता नाडिकास्तनोः ॥ २ ॥

टी०—सायन सूर्यापासून भोग्य आणि सायन लग्नावरून भुक्त आणण्याचे प्रकार. दोघांचा योग करून सूर्यलग्नाचे मध्यंतरींचा उदय घेऊन युक्त करा त्यास ६० नीं भागावें ह्मणजे लग्नावरून सूर्याचा भोग्यकाळ स्पष्ट हो उदाहरण. शके १७६९ कार्तिक शुक्ल ९ भौमवारीं स्पष्ट सूर्य राश्यादि ७।१। १५ अयनांशाः २२।५ हे सूर्याचे अंश घटिकेंत मिळवावे तो सायन सूर्य राश्या ७।२३।२२।१५ हा वृश्चिक राशीचा सूर्य, २३ अंश, २२ घटि, १५ पळें हा ... तिसांत उणे करावे ह्मणजे तो भोग्यांश ६।३७।४५ सूर्य वृश्चिकेस आहे ह्मणून वृश्चिक राशीचा उदय ३३१ यानें भोग्यांश गुणावे ते अंक २१९४ त्यास ... भागावें. ते अंक ७३।८ हा सूर्याचा भोग्यकाळ जाणावा.

Scanned by CamScanner

# लग्नावरून इष्टकाळ आणण्याचा प्रकार.

मकरलग्न वृषभाशीं, तें कोष्टकांत पाहून तें स्पष्टलग्न घेतलें तें राश्यादि ९।१३।२० ह्मणजे मकर राशीचें लग्न, १३ अंश, २० घटिका होय. लग्नाचे अंशघटिकेंत अपनांश २२।५ मिळवावे तें सायनलग्न १०।५।२५ कुंभराशीचें लग्न ५ अंश २५ घटी, सायन लग्न होय. लग्नाचे भुक्तांश ५।२५ कुंभराशीचा उदय २६७ यानें गुणावे ते अंक १४४६ हे ३० नीं भागावे ते अंक ४८।१२ हे अंक लग्नाचा भुक्तकाल होय.

# भोग्यभुक्तावरून इष्टकाल आणण्याचा प्रकार.

भोग्यभुक्तयोग १२१।२० सूर्यलग्न या राशीचे मध्यंतरीचे उदय २ धन ३३६ मकर ३१० यांचा योग ६४६ भोग्यभुक्तयोग १२१ यांत मिळवावे ते अंक ७६७ यांस ६० नीं भागावें तो इष्टकाल घटी १२ पळें ४७ या पळांमध्यें प्रवृत्तीचीं ५ पळें मिळवावीं तो स्पष्ट काळ १२।५२ होय.

## उदाहरण.

# सायन सूर्यावरून भोग्य आणावयाचा क्रम.

| अंश. | घटी. | पळें. | |
|---|---|---|---|
| ३० | ० | ० | यांत |
| २३ | २२ | १५ | सायनरवीचे अंशांत उणे करावे. |
| ६ | ३७ | ४५ | हा सूर्य वृश्चिकेस आहे. |
| | | ३३१ | गुणक. |

| | | |
|---|---|---|
| १९८६ | ९३१७ | १६५५ |
| २०८ | ९९२ | १२२४ |
| २१९४ | १२२४७ | भाग ६० ) १४८९५ ( घटीचा २४८ |
| | २४८ | १२० |
| | अंश | २८९ |
| | भाग ६०) १२४९५ ( २०८ | २४० |
| | १२० | ४९५ |
| | ४९५ | ४८० |
| | ४८० | १५ शेषफळें. |
| | १५ शेषघटी. | |

Scanned by CamScanner

# रवीचा भोग्यकाळ करावयाचा प्रकार.

अंश घटी
भाग ३०) २१९४ १५ (७३।८ हा सूर्य भोग्य काळ जाणावा.
२१०
---
९४
९०
---
४
४
---
६० गुणक
२४०
१५ शेष घटी
---
भाग ३०) २५५ बेरीज
२४०
---
१५ शेष.

# भुक्तलग्नावरून भुक्तकाळ आणावयाचा क्रम.

रा. अं. क.
९ १३ २० मकर लग्न.
२२ ५ अयनांश मिळवावे.
---
१० ५ २५ सायन लग्नभुक्त.
२६७ लग्नाचे उदयानें गु०
---
१३३५ १७५
१११ १५०
---
१४४६ ५०
---
६०) ६६७५ (१११ अंश
६०
---
६७
६०
---
७५
६०
---
१५

भाग. अंश भुक्तांश
३०)१४४६(४८।१२हे लग्नाचे.
१२० भुक्त काल होत.
---
२४६
२४०
---
६
६० गुणक
---
३०)३६०
३६०

## इष्टकाळ.

धन ३३६
मकर३१०मिळवावे.
६४६
१२१ भुक्तभोग्य मिळवावे.
भा.६०)७६७( १२ घ.
६०
१६७
१२०
४७
६० गुणक
भा.६०)२८२०(४७ पळें
२४०
४२०
४२०

## भुक्तभोग्ययोग.

४८ १२ भुक्त } यांची बेरीज.
७३ ८ भोग्य }
१२१ २० सूर्य व लग्न या राशीचे मध्यंतरींचे उदय २

### उत्तर इष्ट घटींचें.

घ. प.
१२ ४७
५ पांचपळें प्रवृत्ती मिळ०
१२ ५२ उत्तर इष्ट घटी.

## उदाहरण.

प्रश्न, १७६९ कार्तिक शुद्ध ९ भौमवारीं प्रातःकाळचा सूर्य ७।१।१७।१५ आहे तो सायन सूर्य किती होतो तें सांग.

इष्टघटीस गतीचा गुणाकार.

० १२ ५२ इष्टघटी.

| ग.६० | ७२० | ३१२० |
|---|---|---|
| ४७ | ५६४ | २४४४ |

७२० ३६८४ २४४४
यांनीं भाग६०) ७८२ (१३।२
६०
१८२
१८०
२
६० गुणक
भा.६०)१२०
१२०

घटिका पळांचा भागाकार.

७२० ३६८४ ६० २४४४ (४०
६२ ४ २४०
७८२ ६०)३७२४(६२। ४४
३६०
१२४
१२०
४
७ १ १७ १५ प्रातःकाळींचा रवि.
१३ २ गम्य घटी
७ १ ३० ३५ बेरीज
२२ ५ अयनांश
७ २३ ३५ १७सायन तत्काळसू.

करावे शेष राहतील ते भोग्यांश ६,२४,४३, हे उदयानें गुणावे ते अंक२१२२ हे तिसांनीं भागावे ह्मणजे भोग्यकाल होय. त्याचा मांडण्याचा क्रम.

३० यांत

२३ ३५ १७ सायनसूर्यांचे अंश वजा करावे.

६ २४ ४३ शेष भोग्यांश.

३३१ उदयानें गुणावे.

| अंश. | क. | वि. |
|---|---|---|
| १९८६ | १३२४ | ४३ |
| १३६ | ६६२ | १२९ |
| भा.३०) २१२२ ( ७० | ७९४४ | १२९ |
| २१० | २३७ | भा. ६० )१४२३३( २३७ कला; |
| २२ | भाग.६०)८१८१(१३६अंश | १२० |
| ६० गुणक | ६० | २२३ |
| भा. ३० )१३२०( ४४ | २१८ | १८० |
| १२० | १८० | ४३३ |
| १२० | ३८१ | ४२० |
| | | १३ |

उत्तर ७० पळें ४४ विपळें या प्रकारें भोग्यकाळ जाणावा.

इष्टघटी १२ प.५२ यांचीं पळें ७७२ या अंकामध्यें भोग्यकाळ कमी करावा. ते शेष अंक ७०।१६ धनराशीचा उदय ३३६ व मकर राशीचा उदय३१०या उभ-यतांचा योग ६६४ शेषअंकांत कमी करावा ते अंक ५५।१६ या अंकांत कुंभ राशीचा उदय २६७ कमी होत नाहीं ह्मणून अशुद्ध उदय जाणावा.

इष्टघटी १२ ५२

पळें गुणक ६०

७२०

५२

७७२

० ४४

७०१ १६

३३६ धनराशीचा उदय ७०१ १६

३१० मकरराशीचा उदय ६४६

५५ १६ या अंकांत कुंभींचा उदय जात नाहीं ह्मणून अशुद्ध उदय होय.

शेषांक ५५।१६ राहिले या अंकांस३०नीं गुणावें ते अंक१६।५८अशुद्ध उदयानें भागावे. जे भाग येतील ते अंक शेषांक५६ते६०नीं गुणावे ते अंक३३६०, पुनः त्याच उदयानें भागावे त्या घटी १२ शेष १५६ ते ६० नीं गुणावे ते अंक ९३६०, पुनः त्याच उदयानें भागावे तीं पळें ३५ मेषराशीपासून अशुद्धाचे पूर्वराशीपर्यंत राशी१०पूर्वींचे अंशादिक ६।१२।३५ त्याच्या१० राशी अंशाचे वर मांडाव्या. तें स्पष्ट सायन लग्न १०।६।१२।३५ अयनांश २२।५ सायन लग्नाचे अंश घटिकेमध्यें कमी करावे तें स्पष्ट लग्न ९।१४।७।३५ मकरलग्न चवदा अंश, सात घटिका, पस्तीस पळें, जाणावें.

| | | | |
|---|---|---|---|
| शेषांक १५ | १६ | ५६ | १५५ |
| १६५० | ३० गुणक | ६० गुणक | ६० गुणक |
| ८ | ६०) ४८० (८ | २६७)३३६०(१२घ. | २६७)९३६०(३५पळें. |
| २६७)१६५८)६ अंश | ४८० | २६७ | ८०१ |
| १६०२ | | ६९० | १३५० |
| ५६ | | ५३४ | १३३५ |
| | | १५६ | १५ |

| राशी | अंश | घटी | पळें |
|---|---|---|---|
| १० | ६ | १२ | ३५ |
| | २२ | ५ | अयनांश कमी करणें. |
| ९ | १४ | ७ | ३५ |

या प्रकारें मकरलग्न, चवदा अंश, सात घटी, पस्तीस पळें जाणावें.

# सूर्य आणि लग्न एकराशीस असतां इष्टघटी आणावयाचा क्रम.

यदितनुदिननाथावेकराशौतदंशांतरहतउदयःस्यात्खाग्निहृत्त्विष्टकालः॥

टी०—सूर्य आणि लग्न एक राशीस असतां या उभयतांचे अंशांचें अंतर काढावें आणि त्याच राशीच्या उदयानें गुणून ३० नीं भागावें जो भागाकार येईल तो इष्टकाळ जाणावा, आणि रात्रीचें लग्न अथवा इष्टकाल आणावयाचा असल्यास सूर्याच्या राशी ६ आंत मिळवाव्या.

Scanned by CamScanner

# लग्नास शुभाशुभ ग्रह पाहणें.

लग्नेचंद्रखलारिपौशशिसितौसर्वैद्युनेखेबुधोऽज्योऽत्येगुःसुखगोष्टमाः कुजशुभाःशुक्रस्तृतीयःशुचे ॥ लाभेसर्वखगाःशुभाअखिलगारुयष्टा रिगाः स्युःखलाश्चंद्ररुयंबुधनेश्रियेंशभद्देकेद्स्थान्मृत्यवेष्टारिगः ॥ १ ॥

टी०—लग्नीं चंद्र आणि पापग्रह व लग्नापासून षष्ठ स्थानीं शुक्र आणि चंद्र, व सप्तम स्थानीं कोणताही ग्रह आणि दशम स्थानीं बुध, द्वादशस्थानीं चंद्र, चतुर्थस्थानीं राहु, अष्टम स्थानीं मंगळ, व शुभग्रह आणि तृतीयस्थानीं शुक्र असे लग्नास ग्रह आले असल्यास अनिष्ट शोककारक अशुभ होत!

लग्नापासून एकादशस्थानीं संपूर्ण ग्रह आणि निंद्यस्थानें वर्जून अन्यस्थानीं शुभ ग्रह शुभ होत. तृतीय अष्टम स्थानीं व षष्ठ स्थानीं सूर्य आणि२।३।४स्थानीं चंद्र असल्यास शुभ लक्ष्मीकारक जाणावे, लग्नाचा स्वामी अंशाचा स्वामी अथवा द्रेष्काण स्वामी हे षष्ठ अष्टम स्थानीं असतां मृत्युदायक जाणावे.

पंचभिरिष्टैरिष्टंपुष्टमनिष्टैरनिष्टमादेश्यम् ॥
स्थानादिफलसमृद्धिश्चतुर्भिरपिकथ्यतेयवनैः ॥ १ ॥

टी०—लग्नास पांच ग्रह शुभस्थानीं असतां पुष्टिकारक आणि कमी असतां अरिष्टकारक होत आणि यवनादिमतें चार ग्रह इष्टकारक जाणावे.

# षड्वर्गशुद्धि पाहण्याचा क्रम.

गृहंहोराचद्रेष्काणोनवांशोद्वादशांशकः॥
त्रिंशांशश्चेतिषड्वर्गास्तेसौम्यग्रहजाःशुभाः ॥ १ ॥

टी०—आदौ गृह पाहणें १ होरा २ द्रेष्काण ३ नवांश ४ द्वादशांश ५ त्रिंशांश ६ हे षड्वर्ग यांत शुभ ग्रहांचा वर्ग शुभ होय.

# त्रिंशांशादिकथन.

त्रिंशद्भागात्मकंलग्नंहोरातस्यार्द्धमुच्यते ॥ लग्नात्रिभागोद्रेष्काणो नवांशोनवमांशकः ॥ द्वादशांशोद्वादशांशस्त्रिंशांशस्त्रिंशदंशकः ॥२॥

टी०—लग्नाचे अंश ३०हें गृह होय, त्याचें अर्ध १५ होरा होय तिसांचा तिसरा भाग १० असे तीन द्रेष्काण होत, तिसांचे नव भाग ह्मणजे नवमांश होत. आणि तिसांचा १२ वा भाग ह्मणजे द्वादशांश होय. तिसांचा एक अंश तो त्रिंशांश होय. या रीतीनें षड्वर्ग भाग जाणावे.

## आदौ गृह पाहणे.

यस्यग्रहस्ययोराशिस्तस्यतद्गृहमुच्यते ॥ १ ॥

टी०—ज्या ग्रहाची जी राशि तें त्याचें गृह होय.

| ग्रह | मंगळ | शुक्र | बध | चंद्र | सूर्य | बुध | शुक्र | मंगळ | गुरु | शनि | शनि | गुरु |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राशी | मेष | वृषभ | मिथुन | कर्क | सिंह | कन्या | तूळ | वृश्चिक | धन | मकर | कुंभ | मीन. |

## होराकथन.

सूर्येंद्वोर्विषमेलग्नेहोराचंद्रार्कयोःसमे ॥ १ ॥

टी०—विषमलग्नीं १५ अंशांचे आंत सूर्याचा होरा. नंतर चंद्राचा होरा जाणावा. समलग्नीं १५ अंशांचे आंत लग्न असतां चंद्राचा होरा. नंतर सूर्यांचा जाणावा. होरा चंद्राचा शुभ, सूर्याचा अशुभ होय.

| लग्नें | | मेष ० | वृष. १ | मि. २ | कर्क ३ | सिं ४ | क. ५ | तूळ ६ | वृ. ७ | धन ८ | म. ९ | कुंभ १० | मीन ११ | ००० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अंश | १५ | सू. | चं. | सू. | चं. | सू. | चं. | सू. | चं. | सू | चं. | सू. | चं. | ००० |
| अंश | ३० | चं. | सू. | चं. | सू. | चं. | सू. | चं. | सू | चं | सू. | चं. | सू. | ००० |

## द्रेष्काणकथन.

द्रेष्काणआद्योलग्नस्यद्वितीयःपंचमस्यच ॥
द्रेष्काणश्चतृतीयस्तुलग्नान्नवमराशिपः ॥ १ ॥

टी०—प्रथम द्रेष्काण ह्मणजे लग्नाचे अंश ३० त्यांत १० अंशांचा एकेक द्रेष्काण असे तीन द्रेष्काण होत. प्रथम द्रेष्काणाचा लग्नस्वामी होय, द्वितीय द्रेष्काणाचा पंचमस्थानाचा स्वामी होय तृतीय द्रेष्काणाचा नवमस्थानाचा स्वामी होय, शनि, मंगळ, सूर्य, यांचा द्रेष्काण अशुभ जाणावा.

| लग्नें | मेष | वृषभ | मिथुन | कर्क | सिंह | कन्या | तूळ | वृ. | धन | मकर | कुंभ | मीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ अं १० | मं. | शु. | बु | चं. | सू. | बु. | शु. | मं. | गु. | श. | श. | गु. |
| २ अं १० | सू. | बु. | शु | मं. | गु. | श. | श. | गु. | मं. | शु. | बु. | चं. |
| ३ अं १० | गु. | श. | श. | गु. | मं. | शु. | बु. | चं. | सू. | बु. | शु. | मं. |

Scanned by CamScanner

# द्वादशांशकथन.

लग्नस्यद्वादशांशास्तुस्वराशेरेवकीर्तिताः ॥ १ ॥

टी०–लग्नाचे अंश ३० त्यांचे भाग १२ ह्मणजे द्वादशांश त्यांचा क्रम; चालते लग्नापासून जोंपर्यंत लग्नाचे अंश असतील त्यांचे अंतींचे स्थानाचा स्वामी तो द्वादशांशपति जाणावा, त्यांत मंगळ, शनि, रवि, यांचा अंश अशुभ होय.

| | मेष | वृ. | मि. | क. | सिं. | क. | तू. | वृ. | ध. | म. | कुं. | मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ ३० | मं. | शु | बु. | चं. | सू. | बु. | शु. | मं. | गु. | श. | श. | गु. |
| ५ ० | शु. | बु. | चं. | र. | बु. | शु. | मं. | गु. | श. | श. | गु. | मं. |
| ७ ३० | बु. | चं. | र. | बु. | शु. | मं. | गु. | श. | श. | गु. | मं. | शु. |
| १० ० | चं. | र. | बु. | शु. | मं. | गु. | श. | श. | गु. | मं. | शु. | बु. |
| १२ ३० | र. | बु. | शु. | मं. | गु. | श. | श. | गु. | मं. | शु. | बु. | चं. |
| १५ ० | बु. | शु. | मं. | गु. | श. | श. | गु. | मं | शु. | बु. | चं. | र. |
| १७ ३० | शु. | मं. | गु. | श. | श. | गु. | मं. | शु | बु. | चं. | र. | बु. |
| २० ० | मं. | गु. | श. | श. | गु. | मं. | शु. | बु. | चं. | र. | बु. | शु. |
| २२ ३० | गु | शं. | श. | गु. | मं. | शु. | बु. | चं. | र. | बु. | शु. | मं. |
| २५ ० | श. | श. | गु. | मं. | शु. | बु. | चं. | र. | बु. | शु. | मं. | गु. |
| २७ ३० | श. | गु. | मं. | शु. | बु. | चं. | र. | बु. | शु. | मं. | गु. | श. |
| ३० ० | गु. | मं. | शु. | बु. | चं. | र. | बु. | शु. | मं. | गु. | श. | श. |

# विषमत्रिंशांश.

कुजार्किगुरुविच्छुक्रास्त्रिंशांशपतयःक्रमात् ॥
पंचपंचाष्टशैलेषुभागानांविषमेगृहे ॥ १ ॥

टी०—विषमलग्नीं पंचमांशपर्यंत लग्न असतां भौमापुढें पांच अंश शनि, त्यापुढें ८ अंश गुरु, त्यापुढें ७ अंश बुध, त्यापुढें ५ अंश शुक्र, याक्रमानें विषमलग्नीं त्रिंशांशपति जाणावे. यांत भौम, शनि, हे अशुभ जाणावे.

| | मेष | मिथु. | सिंह | तूळ | धन | कुंभ |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ ० | मं. | मं. | मं. | मं. | मं. | मं. |
| १० ० | श | श. | श. | श. | श. | श. |
| १८ ० | गु. | गु. | गु. | गु. | गु. | गु. |
| २५ ० | बु | बु. | बु. | बु. | बु. | बु. |
| ३० ० | शु. | शु. | शु. | शु. | शु. | शु. |

Scanned by CamScanner

# समत्रिंशांश.

शुक्रेज्ञेज्यार्किभूपुत्रास्त्रिंशांशपतयःसमे ॥
पंचांगाष्टेषुपंचानांभागानांकथिताबुधैः ॥ १ ॥

टी०—समलग्नीं ५ अंशपर्यंत लग्न असतां शुक्र त्यापुढें ७अंशबुध, त्यापुढें ८ अंश गुरु, त्यापुढें ५ अंश शनि, ५ अंशपर्यंत मंगळ, हे समलग्नीं त्रिंशाशपति जाणावे. यांत मंगळ, शनि, यांचे अशुभ जाणावे.

| | वृषभ | कर्क | कन्या | वृश्चिक | मकर | मीन |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ ० | शु. | शु. | शु. | शु. | शु. | शु. |
| १२ ० | बु. | बु. | बु. | बु. | बु. | बु. |
| २० ० | गु. | गु. | गु. | गु. | गु. | गु. |
| २५ ० | श. | श. | श. | श. | श. | श. |
| ३० ० | मं. | मं. | मं. | मं. | मं. | मं. |

# षड्वर्ग पाहण्याचा क्रम.

कार्तिक शुक्ल९ मंगळवार, पूर्वी केलें आहे तें लग्न मकर अंश १४ घ. ११प. ५१ स्वामी शनि तो गृहेश जाणावा.

| गृहेश | होरा | द्रेष्का. | नवमां. | दशमां. | त्रिंशां. |
|---|---|---|---|---|---|
| शनि | चन्द्र | शुक्र | शुक्र | बुध | गुरु. |

हे षड्वर्ग, यांत शनि अशुभ शेष ५ वर्ग शुभ जाणावे.

॥ उक्तांश ॥ ॥ मेषेषष्ठघटौवृषेत्रिदृगिनाद्वंद्वेद्रिगोर्काग्नयःकीटे
ऽष्यंगनवाद्रयोर्कभवनेंगाश्वास्त्रियांत्र्यर्कषट् ॥ जूकेर्काद्रिखगा
अलौगवगषट्चापेत्रिषट्गोद्रयोनक्रेशारुयरुणाघटेझषवृषैामीने
द्रिगोषट्शुभाः ॥

| राशी. उक्त. | मेष | वृ. | मि. | क. | सिं. | क. | तू. | वृ. | ध. | म. | कुं. | मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अंश. | ६ | ३ | ७ | ४ | ६ | ३ | १२ | ९ | ३ | ३ | १२ | ७ |
| | ७ | ३ | ९ | ६ | ७ | १२ | ७ | ७ | ६ | १२ | २ | ९ |
| | ० | १२ | १२ | ९ | ० | ६ | ९ | ६ | ९ | ० | ० | ६ |
| | ०. | ० | ३ | ७ | ० | ० | ० | ० | ७ | ० | ० | ० |

षड्वर्गंपंचवर्गंवाचतुर्वर्गमथापिवा ॥
केंश्चित्रिवर्गंसत्प्रोक्तंद्वयेकवर्गंतनुंत्यजेत् ॥ १ ॥

टी०—६,५ किंवा ४ वर्ग लग्नास आले असतां तें लग्न बलिष्ठ होय केचिन्मतेंकरून ३ वर्ग शुभ होत. आणि २, १ वर्ग आले असतां तें लग्न वर्जावें. निर्बलिष्ठ होय.

Scanned by CamScanner

## लग्नांशफलमाह.

लग्नंचतुर्दशेभागेवृषस्यमकरस्यच ॥
कन्याकर्कटमीनानामष्टमेद्वादशेऽलिनः ॥

टी०—वृषभ, मकर यांचे अंश १४; कन्या, कर्क, मीन, यांचे अंश८; आणि वृश्चिकाचे अंश १२ हे शुभ फल देतात.

एकविंशतिमेभागेमेषस्याष्टादशेहरेः ॥
संपूर्णफलदंचादौमध्येमध्यफलप्रदम् ॥ २ ॥

टी०—मेषाचे अंश २१, सिंहाचे अंश १८, असे लग्नाचे अंश असतां संपूर्ण फल देतात, मध्यें असतां मध्यम फल देतात.

कुंभस्यांशेचषड्विंशेचतुर्विंशेचतौलिनः ॥
युग्मकार्मुकयोर्लग्नंशुभंसप्तदशांशके ॥ ३ ॥

टी०—कुंभाचे अंश२६, तुळाचे अंश२४, मिथुन व धन यांचे अंश१७, हे शुभ होत.

## लग्नवर्गोत्तमलक्षण.

अंतेतुच्छफलंलग्नंयदिवर्गोत्तमंनचेत् ॥
लग्नस्यस्वनवांशोयःसवर्गोत्तमउच्यते ॥ ४ ॥

टी०—लग्नाचे अंत्यभागीं वर्गोत्तम नसेल तर तें लग्न अनिष्ट फल देतें आणि लग्न आपले स्वनवांशीं असलें ह्मणजे त्यास वर्गोत्तम ह्मणावें.

## गोधूललग्नकथन.

गोधूलंपदजादिकेशुभकरंपंचांगशुद्धौरवेरर्धास्तात्परपूर्वतोर्धघटि कंतत्रेंदुमष्टारिगं ॥ सोग्रांगंकुजमष्टमंशुरुयमाहःपातमर्कक्रमंज ह्याद्विप्रमुखेतिसंकटइदंसद्यौवनाद्येकचित् ॥ १ ॥

टी०—सूर्याचे अर्धास्तसमयापूर्वी १५ पळें व नंतर १५ पळें यास गोधूल काल ह्मणतात. हा शूद्रादिकांस विवाहाविषयीं शुभ होय, परंतु पंचांगशुद्धि असावी. आणि त्या लग्नीं अष्टम आणि षष्ठ स्थानीं चंद्र व पापग्रह आणि भौम अष्टमस्थानीं आणि गुरु, शनि हे वार आणि क्रांतिसाम्य व संक्रांतिदिन इत्यादिक दुष्ट योग नसावे ह्मणजे शुभ. आणि केचिन्मतें विप्रादिकांसही अति संकटीं ह्मणजे उपवर कन्या असतां इत्यादि समयीं गोरज लग्न शुभ होय.

Scanned by CamScanner

षड्वर्गंपंचवर्गंवाचतुर्वर्गमथापिवा ॥
केश्चित्त्रिवर्गंसत्प्रोक्तंद्वयेकवर्गंतनुंत्यजेत् ॥ १ ॥

टी०—६,५ किंवा ४ वर्ग लग्नास आले असतां तें लग्न बलिष्ठ होय केचिन्मतें-करून ३ वर्ग शुभ होत. आणि २,१ वर्ग आले असतां तें लग्न वर्जावें. निर्बलिष्ठ होय.

## लग्नांशफलमाह.

लग्नंचतुर्दशेभागेवृषस्यमकरस्यच ॥
कन्याकर्कटमीनानामष्टमेद्वादशेऽलिनः ॥

टी०—वृषभ, मकर यांचे अंश १४; कन्या, कर्क, मीन, यांचे अंश ८; आणि वृश्चिकाचे अंश १२ हे शुभ फल देतात.

एकविंशतिमेभागेमेषस्याष्टादशेहरेः ॥
संपूर्णफलदंचादौमध्येमध्यफलप्रदम् ॥ २ ॥

टी०—मेषाचे अंश २१, सिंहाचे अंश १८, असे लग्नाचे अंश असतां संपूर्ण फल देतात, मध्यें असतां मध्यम फल देतात.

कुंभस्यांशेचषड्विंशेचतुर्विंशेचतौलिनः ॥
युग्मकार्मुकयोर्लग्नंशुभंसप्तदशांशके ॥ ३ ॥

टी०—कुंभाचे अंश २६, तुळाचे अंश २४, मिथुन व धन यांचे अंश १७, हे शुभ होत.

## लग्नवर्गोत्तम लक्षण.

अंतेतुच्छफलंलग्नंयदिवर्गोत्तमंनचेत् ॥
लग्नस्यस्वनवांशोयःसवर्गोत्तमउच्यते ॥ ४ ॥

टी०—लग्नाचे अंत्यभागीं वर्गोत्तम नसेल तर तें लग्न फल देतें आणि लग्न आपले स्वनवांशीं असलें ह्मणजे त्यास वर्गोत्तम ह्मणावें.

## गोधूललग्नकथन.

गोधूलंपदजादिकेशुभकरंपंचांगशुद्धौरवेरर्धास्तात्परपूर्वतोर्धघटिकंतत्रेंदुमष्टारिगं ॥ सोग्रांगंकुजमष्टमंगुरुयमाहःपातमर्कक्रमंजह्याद्विप्रमुखेतिसंकटइदंसद्योवनाद्येकचित् ॥ १ ॥

टी०—सूर्याचे अर्धास्तसमयापूर्वी १५ पळें व नंतर १५ पळें पास गोधूल काल ह्मणतात. हा शूद्रादिकांस विवाहाविषयीं शुभ होय, परंतु पंचांगशुद्धि असावी. आणि त्या लग्नीं अष्टम आणि षष्ठ स्थानीं चंद्र व पापग्रह आणि भौम अष्टमस्थानीं आणि गुरु, शनि हे वार आणि क्रांतिसाम्य व संक्रांतिदिन इ-



Scanned by CamScanner

त्यादिक दुष्ट योग नसावे ह्मणजे शुभ. आणि केचिन्मतें विप्रादिकांसही अति संकटीं ह्मणजे उपवर कन्या असतां इत्यादि समयीं गोरज लग्न शुभ होय.

## वधूप्रवेश.

विवाहमारभ्यवधूप्रवेशोयुग्मेऽथवाषोडशवासरांतात् ॥
तदूर्ध्वमब्देयुजिपंचमांतादतः परस्तान्नियमोनचास्ति ॥ १ ॥

टी०—विवाहदिनापासून १६ दिवसपर्यंत सम दिवशीं वधूप्रवेश उक्त आणि पुढें ५ वर्षेपर्यंत विषम मासादिक उक्त. पुढें इच्छे प्रमाणें.

उक्तमासादि ॥ माघफाल्गुनवैशाखेशुक्लपक्षेशुभेदिने ॥
गुर्वादित्यविशुद्धौस्यान्नित्यंपत्नीद्विरागमः ॥ २ ॥

टी०—माघ, फाल्गुन आणि वैशाख, शुक्लपक्षीं शुभ दिवशीं गुर्वादिक अस्त वर्ज करून द्वितीय वेळेस वधूप्रवेश ( द्विरागमन ) उक्त होय.

नीहारांशुयुगुत्तरादितिगुरुब्राह्मानुराधाश्विनी शार्क्कभास्करवा
युविष्णुवरुणत्वाष्ट्रेप्रशस्तेतिथौ ॥ कुंभाजालिगतेरवौशुभकरे
प्राप्तोदयेभार्गवेजीवज्ञास्फुजितांदिनेनववधूवेश्मप्रवेशःशुभः ॥३॥

टी०—मृग, तिन्हो उत्तरा, पुनर्वसु, पुष्य, रोहिणी, अनुराधा, अश्विनी, ज्येष्ठा, हस्त, स्वाती, श्रवण, शततारका, चित्रा हीं नक्षत्रें आणि शुभतिथी, व कुंभ, मेष, वृश्चिक ह्या राशींचा सूर्य, शुक्रादिउदय आणि गुरु, बुध, चंद्र हे वार अशा शुभ दिवशीं वधूगृहप्रवेश करावा.

## नूतन पदर धारणास मुहूर्त.

हस्तादिपंचमृगपूषभदस्रभेषुविष्णुद्वयेबुधदिनेगुरुशुक्रवारे ॥ स्त्रीणां
शुभंप्रथमपल्लवधारणं स्यात्पाणिग्रहोक्तसमयेखलुपीतवस्त्रैः ॥१॥

टी०—हस्तापासून ५ आणि मृग, पुनर्वसु, अश्विनी, श्रवण, धनिष्ठा, हीं नक्षत्रें आणि बुध, गुरु, शुक्र हे वार आणि विवाहकाळीं जे ग्रह उक्त असतात ते पाहून अशा दिवशीं नूतन पीतवस्त्रेंकरून स्त्रियांस प्रथम पदर परिधान करवावें.

## गांधर्व विवाहास मुहूर्त.

शूद्रांत्येषुपुनर्भवापरिणयःप्रोक्तोविवाहोक्तभैर्नालोक्यंतिथिमासवेधख
गुर्जेज्यास्तादितत्रार्कभात ॥ त्र्यर्क्षेषुमृतिर्धनंमृतिमृतीपुत्रोमृतिः
भंगश्रीरोगन्त्यमथोधृती शक्रततत्वर्क्षेत्ययः साभिजित् ॥ १ ॥

टी०—शूद्र आणि रजकादि अंत्य जाति यांच्या स्त्रियांचा पुनर्विवाह ह्मणजे पाट लावणें यास मुहूर्त. विवाह नक्षत्रें अवश्य घ्यावीं. मास, तिथि, वार, गुरु, शुक्र यांचे अस्तोदयांचा दोष नाहीं आणि सूर्यनक्षत्रापासून अभिजित्सहित दिवस-नक्षत्रपर्यंत नक्षत्रें मोजण्याचा क्रम प्रथम ३ मरण, द्वितीय ३ धन, तृतीय३ मरण, चतुर्थ ३ मरण, पंचम ३ पुत्रलाभ, षष्ठ ३मरण, सप्तम ३ दुर्भग, अष्टम ३लक्ष्मी, नवम ३ औन्नत्य आणि सूर्यनक्षत्रापासून चवथें, अकरावें, १८ वें, २५ वें या चार स्थानांचे नक्षत्रांवर शुभचक्र उतरलें तथापि हीं वर्जावीं अन्य शुभ होत.

## अन्यमते तु.

इंद्रादितिशिवाश्लेषाआग्नेयंवारुणंतथा॥
अश्विनीवसुदैवत्यंपट्टकालेशुभंस्मृतम्॥ २ ॥

टी०—ज्येष्ठा, आर्द्रा, आश्लेषा, कृत्तिका, शततारका, धनिष्ठा, हीं नक्षत्रें पाट करण्यास शुभ होत.

## दत्तकपुत्र घेण्यास मुहूर्त.

हस्तादिपंचकभिषग्वसुपुष्यभेषुसूर्यक्षमाजगुरुभार्गववासरेषु ॥
रिक्ताविवर्जिततिथिष्वलिकुंभलग्नेसिंहेवृषेभवतिदत्तपरिग्रहोयं॥१॥

टी०—हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, अश्विनी, धनिष्ठा, पुष्य, हीं नक्षत्रें आणि रवि, मंगळ, गुरु, शुक्र हे वार उक्त होत. आणि ४ थी, ९ वी, १४ शी, या तिथि वर्ज्य करून बाकी तिथींस आणि वृश्चिक, कुंभ हीं लग्नें वर्ज्य करून सिंह, वृषभ, या लग्नीं पुत्र घेणें उक्त.

## वास्तु प्रकरण.

## ग्रामादि आनुकूल्य पाहणें.

ग्रामादेरनुकूलत्वंदिशोभूतग्रहस्यच ॥ मासधिष्ण्यादिशुद्धिंचवीक्ष्यायव्ययभांशकान्॥ १॥ गुरुशुक्रार्कचंद्रेषुस्वोच्चादिबलशालिषु॥ गुर्वर्केंदुबलंलब्ध्वागृहारंभःप्रशस्यते ॥ २ ॥

टी०—ग्राम आणि दिशा व भूतग्रह, हे अनुकूल पाहून मास व नक्षत्रादिकांची शुद्धि आणि आय व्यय व लग्न व अंशशुद्धि शुभ पाहून व गुरु, शुक्र, सूर्य, चंद्र हे ग्रह स्वोच्चादि स्थानीं बलाढ्य असतां आणि सूर्य, चंद्र, गुरु, यांचें बल घेऊन गृह बांधण्यास प्रारंभ करावा हें प्रशस्त आहे.

## वर्ज्य.

विवाहोक्तान्महादोषानृतेजामित्रशुद्धितः ॥ रिक्ताःकुजार्कवा

Scanned by CamScanner

रौचचरलग्नंचरांशकं ॥ ३ ॥ त्यक्त्वाकुजार्कयोश्चांशंपृष्ठेचाग्रे स्थितंविधुम् ॥ बुधेज्यराशिगंचार्ककुर्याद्गेहंशुभाप्तये ॥ ४ ॥

टी०—विवाहास जे महा दोष सांगितले आहेत ते जामित्र शुद्धीवांचून येथें वर्जावे आणि रिक्ता तिथि व भौम रविवार व चरलग्नें व त्यांचे अंश वर्जावे व रवि, भौम यांचा अंश आणि चंद्र पृष्ठभागीं अथवा अग्रभागीं वर्ज्य, आणि मिथुन, कन्या, धन, मीन, या राशींचा सूर्य घेऊन गृहारंभ शुभ होय.

## द्वारशुद्धि.

द्वारशुद्धिंनिरीक्ष्यादौभशुद्धिंवृषचक्रतः ॥
निष्पंचकेस्थिरेलग्नेद्व्यंगेवाऽलयमारभेत् ॥ ५ ॥

टी०—प्रथम द्वारशुद्धि, वृषचक्रापासून नक्षत्रशुद्धि अवलोकन करून निष्पंचक, स्थिर, द्विःस्वभाव असें लग्न पाहून त्यावर घर बांधण्यास आरंभ करावा.

## ग्राम अनुकूल.

स्वनामराशेर्यद्राशिर्द्विशरांकेशदिङ्मितः ॥
सग्रामःशुभदःप्रोक्तस्त्वशुभःस्यात्ततोऽन्यथा ॥ ६ ॥

टी०—आपले राशीपासून २,५,९,११,१० अशी ग्रामाची राश आली तर शुभ आणि अन्यथा अशुभ जाणावें.

एकभेसप्तमेव्योमगृहहानिस्त्रिषष्ठगे ॥
तुर्याष्टद्वादशेरोगाःशेषस्थानेभवेत्सुखम् ॥ ७ ॥

टी०—एक अथवा सप्तम राश आली तर शून्य. तिसरी अथवा सहावी आली असतां गृहाची हानि. चवथी, आठवी, बारावी, आली असतां रोगकारक. आणि शेष राशींतून कोणतीही आली असल्यास सुखप्राप्ति होय.

## जातक पाहणें.

अकचटतपयशवर्गाश्चाष्टौक्रमतःस्मृताः ॥ एकोनखेषुवर्णानांस्वरशास्त्रविशारदैः ॥८॥ अवर्गेषोडशज्ञेयाःस्वराःकादिषु पंचसु ॥ पंचपंचैववर्णाःस्युर्यशौतुचतुरक्षरौ ॥ ९ ॥

टी०—स्वरशास्त्रवेत्त्यांनीं अकारादि हकारांत, एकूण ५० अक्षरांचे अवर्ग, क वर्ग, च व०, ट व०, त व०, प व०, य आणि श वर्ग असे आठ वर्ग, सांगितले आहेत. त्यांमध्यें अ वर्गाचीं १६ अक्षरें, क वर्गा० ५, च वर्गा० ५, ट वर्गा० ५, त वर्गा० ५, प वर्गा० ५, य वर्गा० ४, आणि श वर्गाचीं ४, अक्षरें आहेत असें जाणावें.

Scanned by CamScanner

## वर्गांचे स्वामी.

ताक्ष्यमार्जारसिंहाश्वसर्पाखुगजसूकराः ॥
वर्गेशाःक्रमतोज्ञेयाःस्ववर्गात्पंचमोरिपुः ॥ १० ॥

टी०--अवर्गाचा स्वामी गरुड १, क वर्गाचा स्वामी मार्जार २, च वर्गाचा सिंह ३, ट वर्गाचा श्वान ४, त वर्गाचा सर्प ५, प वर्गाचा उंदीर ६, य वर्गाचा गज ७, श वर्गाचा डुकर ८, हे क्रमेंकरून वर्गांचे स्वामी जाणावे. आणि ज्या वर्गांतील स्वनामाक्षर येईल त्यापासून पांचवे वर्गाचा स्वामी तो त्याचा रिपु जाणावा.

## काकिणी.

स्ववर्गंद्विगुणंकृत्वापरवर्गेणयोजयेत् ॥
अष्टभिश्चहरेद्भागंयोऽधिकःसऋणीभवेत् ॥ ११ ॥

टी०--स्वनामाचा वर्ग द्विगुणित करावा, त्यांत ग्रामादिकांचा वर्ग मिळवावा आणि आठांनीं भागावा. पुनः ग्रामादिकांचा वर्ग द्विगुणित करून स्वनामाचा वर्ग आंत मिळवून पूर्ववत् भागून शेष ज्याचें अधिक उरेल तो त्याचा ऋणी जाणावा.

## चंद्राचें मुख पाहणें.

वाह्नान्मैत्रान्नगर्क्षस्थेचंद्रेयाम्योत्तराननम् ॥
पित्र्याद्वासवतस्तद्वत्प्राक्परास्यंगृहंशुभम् ॥ १२ ॥

टी०—कृत्तिकापासून सात नक्षत्रीं चंद्र असतां गृहाचें मुख दक्षिणेस, आणि अनुराधांपासून सात नक्षत्रीं चंद्र असतां गृहाचें मुख उत्तरेस, आणि मघापासून सात नक्षत्रीं चंद्र असतां गृहाचें मुख पूर्वेस, आणि धनिष्ठापासून सात नक्षत्रीं चंद्र असतां गृहाचें मुख पश्चिमेस शुभ जाणावें.

## आयादि साधन.

गृहेशकरमानेनगृहस्यायादिसाधयेत् ॥
करैश्चेन्नेष्टमायादिसाध्यमंगुलितस्तथा ॥ १३ ॥

टी०—गृहाचे आयादिक गृहस्वामीच्या हस्तमानेंकरून साधावे आणि जर ते इष्ट आयादिक हस्तमानानें साधत नाहींत तर अंगुलीमानेंकरून साधावे.

## क्षेत्रफळ.

विस्तारगुणितंदैर्घ्यंगृहक्षेत्रफलंभवेत् ॥
तत्पृथग्वसुभिर्भक्तंशेषमायोध्वजादिकः ॥ १४ ॥

Scanned by CamScanner

टी०—ध्वजायादि साधावयाचा प्रकार. रुंदीनें लांबी किंवा लांबीनें रुंदी गुणावी तें क्षेत्रफळ जाणावें आणि त्यास आठांनीं भागावें शेष उरेल तें ध्वजायादि जाणावें

## आयांचीं नांवें.

ध्वजोधूमोऽथसिंहःश्वासौरभेयःखरोगजः ॥
ध्वांक्षश्चैवक्रमणैतदायाष्टकमुदीरितम् ॥ १५ ॥

टी०—ध्वजाय १, धूमाय २, सिंहाय ३, श्वानाय४, वृषाय ५, गर्दभाय ६, गजाय ७, ध्वांक्षाय ८, हे आठ आय क्रमेंकरून सांगितले आहेत.

## वर्णपरत्वें उक्त आय.

ब्राह्मणस्यध्वजोज्ञेयोसिंहोवैक्षत्रियस्यच॥
वृषभश्चैववैश्यस्यसर्वेषांतुगजःस्मृतः ॥ १६ ॥

टी०—ब्राह्मणांस ध्वजाय, क्षत्रियांस सिंहाय, वैश्यांस वृषभाय, आणि सर्व वर्णांस गजाय उक्त होय.

## मतांतरे आयांचीं फळें.

ध्वजेकृतार्थोमरणंचधूमेसिंहेजयश्वाथशुनिप्रकोपः ॥ वृषेचराज्यंचखरेचदुःखंध्वांक्षेमृतिश्चैवगजेसुखंस्यात् ॥१७॥ पूर्वद्वारे वृषःश्रेयान्गजःप्राग्यमदिङ्मुखः ॥

टी०—ध्वजायास कृतार्थ होईल, धूमायास मरणप्राप्ति, सिंहायास जय, श्वान (कुत्र्याचे) आयास कोप, वृषायास राज्य, खर आयास दुःख, ध्वांक्ष(कावळ्याचे) आयास मरण, आणि गज आयास सुखप्राप्ति होय, आणि पूर्वाभिमुख गृहास वृषाय, आणि गजाय, हे श्रेयस्कर होत आणि दक्षिणाभिमुख गृहास गजाय उक्त.

## नक्षत्रपरत्वें व्ययसाधणें.

क्षेत्रमष्टाहतंधिष्ण्यैर्विभक्तंस्याद्गृहस्यभम् ॥
भेष्टभक्तेऽव्ययःशेषमायादल्पोऽव्ययःशुभः ॥ १८ ॥

टी०—पूर्वींचे क्षेत्रफळास आठांनीं गुणावें आणि गुणांक येईल तो२७सांनीं भागावा. शेष उरेल तें त्याघराचें नक्षत्र जाणावें, तें नक्षत्र८नीं भागावें शेष राहील तो त्या गृहाचा व्यय तो आयापेक्षां अल्प आला तर शुभ.

## गृहाच्या राशि.

अश्विन्यादित्रयेमेषोमघादित्रितयेहरिः ॥
मूलादित्रितयेधन्वीभद्वयंशेषराशिषु ॥ १९ ॥

Scanned by CamScanner

## गृहाचें द्वार.

द्वारस्थोपरियद्द्वारंद्वारस्यान्यच्चसंमुखं ॥
व्ययदंतुयदातच्चनकर्तव्यंशुभेप्सुभिः ॥ २५ ॥

टी०—द्वारावर आणि समोरासमोर हीं द्वारें व्ययदायक होत ह्मणून ज्यांस शुभ इच्छा असेल त्यांहीं वर्जावीं.

## गृहामध्यें स्थानें योजण्याचा प्रकार.

स्नानागारंदिशिप्राच्यामाग्नेय्यांपचनालयं ॥ याम्यायांशय नागारंनैर्ऋत्यांशस्त्रमंदिरं ॥२६॥ प्रतीच्यांभोजनागारंवाय व्यांपशुमंदिरं॥भांडकोशंचोत्तरस्यांईशान्यांदेवमंदिरम् ॥२७॥

टी०—पूर्वेस स्नानाचें घर१, आग्नेय कोनास पाक मंदिर२, दक्षिणेस शयन-स्थान ३, नैर्ऋत्येस शस्त्रमंदिर ४,पश्चिमेस भोजनस्थान५, वायव्येस पशुमंदिर ६, उत्तरेस भांडारगृह७,ईशान्येस देवांचें मंदिर८,याप्रकारें स्थानांची योजना करावी.

## अल्पदोष.

अल्पदोषंगुणश्रेष्ठंदोषायनभवेद्गृहम् ॥
आयव्ययौप्रयत्नेन विरुद्धंभंचवर्जयेत् ॥ २८ ॥

टी०—गृहास अल्पदोष आले आणि बहुगुणेंकरून श्रेष्ठ आलें तर त्यास दोष नाहींत. मात्र आयव्यय अथवा नक्षत्र विरुद्ध आलें तर वर्जावें.

## वास्तुचक्रांचीं नावें.

आरंभेवृषभंचक्रंस्तंभेज्ञेयंतुकूर्मवत् ॥
प्रवेशेकालशंचक्रंवास्तुचक्रंबुधैः शुभम् ॥ २९ ॥

टी०—गृहारंभास वृषभ वास्तु, आणि स्तंभस्थापनास कूर्म वास्तु, गृहप्रवेशास कलश हीं वास्तुचक्रें पहावीं.

## गृहारंभास मास.

पौषफाल्गुनवैशाखमार्गश्रावणकार्तिकाः ॥
मासाःस्युर्गृहनिर्माणेपुत्रारोग्यधनप्रदाः३० ॥

टी०—पौष, फाल्गुन, वैशाख, मार्गशीर्ष,श्रावण, आणि कार्तिक ह्या महिन्यांत गृहारंभ, शिलान्यास व स्तंभप्रतिष्ठा हीं केलीं असतां आरोग्य, आयुष्यवृद्धी, धनप्राप्ती, व पुत्रप्राप्ती, हीं होत.

Scanned by CamScanner

## गृहारंभास मासपरत्वें फळ.

शोकंधान्यंपंचतानिःपशुत्वंस्वाप्तिनैःस्वंसंगरंभृत्यनाशम् ॥
सच्छ्रीप्राप्तिंवन्हिभीतिंचलक्ष्मींकुर्युश्चैत्राद्यागृहारंभकाले ॥ ३१ ॥

टी०—चैत्रमासीं शोकप्राप्ति १ वैशाखांत धान्यप्राप्ति २ ज्येष्ठांत मृत्यु ३ आषाढांत निःपशुत्व ४ श्रावणांत द्रव्यप्राप्ति ५ भाद्रपदांत दरिद्र ६ आश्विनांत कलह ७ कार्तिकांत चाकराचा नाश ८ मार्गशीर्षांत धनप्राप्ति ९ पौषांत लक्ष्मीप्राप्ति १० माघांत अग्निभय ११ फाल्गुनांत लक्ष्मी १२ या प्रकारें गृहारंभ मासांचीं फळें जाणावीं.

## गृहाचें मुख दिशापरत्वें करावयाचें.

कर्कनक्रहरिकुंभगतेर्केपूर्वपश्चिममुखानिगृहाणि ॥
तौलिमेषवृषवृश्चिकयातेदक्षिणोत्तरमुखानिवदंति ॥ ३२ ॥

टी०—कर्क, मकर, सिंह, कुंभ, या राशींस सूर्य असतां गृहाचें मुख पूर्वेस अथवा पश्चिमेस; तूळ, मेष, वृषभ, वृश्चिक, या राशींचा सूर्य असतां गृहाचें मुख दक्षिणेस अथवा उत्तरेस करावें, या प्रकारें रत्नमालाग्रंथीं सांगितलें आहे.

## गृहारंभासनक्षत्रादिउक्त.

त्र्युत्तराधृगरोहिण्यांपुष्यमैत्रकरत्रये ॥ धनिष्ठाद्वितयेपौष्णे गृहारंभःप्रशस्यते ॥ ३३ ॥ आदित्यभौमवर्ज्यंतुसर्ववाराःशुभावहाः ॥ चंद्रादित्यबलंलब्ध्वालग्नेशुभनिरीक्षिते ॥ ३४ ॥ स्तंभोच्छ्रायस्तुकर्तव्यअन्यंतुपरिवर्जयेत् ॥ प्रासादेष्वेवमेवस्यात्कूपवापीषुचैवहि ॥ ३५ ॥

टी०—तीन उत्तरा, मृग, रोहिणी, पुष्य, अनुराधा, हस्त, चित्रा, स्वाती, धनिष्ठा, शततारका, रेवती, हीं नक्षत्रें उक्त. आणि रवि, भौम हे दोन वार वर्ज्य करून बाकीचे सर्व वार शुभ आहेत आणि ज्या स्थिर लग्नीं शुभ ग्रहांची दृष्टि असेल त्या लग्नीं स्तंभारोपण, देवळें, कूप, वापी, तटाक, हीं कृत्यें करावीं, अन्य कर्में वर्ज्यावीं.

## वृषचक्र.

त्रिवेदाब्धित्रिवेदाब्धिद्वित्रिभेष्वर्कतःशशी ॥ कुर्याल्लक्ष्मीसमुद्वासंस्थैर्यंलक्ष्मींदरिद्रताम् । धनंहानिंक्रमान्मृत्युमारंभेवृषचक्रकं ॥ ३६ ॥

टी०—गृह बांधण्यास आरंभ वृषचक्र पाहून करावा ह्मणजे सूर्यनक्षत्रापासून ३,४,४,३,४,४,२,३, याक्रमानें दिवसनक्षत्रापर्यंत मोजावीं त्यांत प्रथम ३ नक्षत्रें लक्ष्मीदायक, पुढचीं ४ नक्षत्रें उद्वास, पु० ४ नक्षत्रें स्थिरता, पु० ३ न० लक्ष्मीदायक,

पु० ४ न. दरिद्रता, पु० ४ न०धनप्राप्ति, पु० २ न० हानि,आणि पु०३न० मृत्यु-दायक अशीं नक्षत्रफळें पाहून ज्या दिवसनक्षत्रास शुभ फळ येईल त्या दिवशीं प्रारंभ करावा.

## शिलान्यास.

दक्षिणपूर्वेकोणेकृत्वापूजाशिलांन्यसेत्प्रथमाम् ॥
शेषाःप्रदक्षिणेनस्तंभाश्चैवंप्रतिष्ठाप्याः ॥ ३७ ॥

टी०—आग्नेय कोणीं प्रथम पूजन करून शिला पुरावी. शेष शिला प्रदक्षिण पुराव्या स्तंभही शिलांप्रमाणेंच स्थापावे.

## नक्षत्रें शिलान्यासास.

शिलान्यासःप्रकर्तव्योगृहाणांश्रवणेमृगे॥
पौष्णेहस्तेचरोहिण्यांपुष्याश्विन्युत्तरात्रये॥ ३८ ॥

टी०—गृहाच्या शिलान्यासास श्रवण, मृग, रेवती, हस्त, रोहिणी, पुष्य, अश्विनी, ३ उत्तरा, हीं नक्षत्रें उक्त होत.

## शेषाचें मुख.

कन्यासिंहेतुलायांभुजगपतिमुखंशंभुकोणेग्निखातंवायव्येस्या
त्तदास्यंस्वलिधनमकरेईशखातंवदंति॥कुंभेमीनेचमेषेनिर्ऋति
दिशिमुखंखातवायव्यकोणेचाग्नेकोणेमुखंवैवृषमिथुनगतेकर्क
टेरक्षखातम् ॥ ३९ ॥

टी०—कन्या, सिंह, तूळ, पालग्नीं शेषाचें मुख ईशान्य कोणीं असतें तर आग्नेयकोणीं खनन करावें. वृश्चिक, धन, मकर, ह्या लग्नीं शेषाचें मुख वायव्येस असतें तेव्हां ईशान्येस खनन करावें. कुंभ, मीन, मेष, ह्यालग्नीं नैर्ऋतीस मुख असतें तेव्हां वायव्येस खनन करावें. वृषभ, मिथुन, कर्क, ह्या लग्नीं आग्नेयेस मुख असतें तेव्हां नैर्ऋतीस खनन करावें.

## दुष्टयोग व वार.

वज्रव्याघातशूलाश्चव्यतीपातश्चगंडकः॥
विष्कंभपरिघौवर्ज्यौवारौमंगलभास्करौ ॥ ४० ॥

टी०—वज्र, व्याघात, शूल, व्यतीपात, गंड, विष्कंभ, परिघ, हे योग आणि भौम व रवि हे वार असे वर्जावे.

## कूर्मचक्र.

तिथिस्तुपंचगुणिताकृत्तिकाद्यृक्षसंयुता ॥ तथाद्वादशमिश्राच नवभागेनभाजिता ॥ ४१ ॥ ॥ फळ ॥ जलेवेदामुनिश्चं द्रस्थलेपंचद्वयंवसुः॥त्रिषट्कनवचाकाशेत्रिविधंकूर्मलक्षणं ॥४२॥ जलेलाभस्तथाप्रोक्तः स्थलेहानिस्तथैवच ॥ आकाशेमरणंप्रोक्तमिदंकूर्मस्यचक्रकं ॥ ४३ ॥

टी०–ज्या तिथीस गृहारंभ करावयाचा ती तिथी ५ नीं गुणावी आणि कृत्तिकापासून दिवसनक्षत्रापर्यंत जीं नक्षत्रें येतील तीं आंत मिळवावीं आणि १२ अंक त्यांत मिळवावे नंतर नवांनीं भागावें शेष ४, ७, १ राहिले असतां कूर्म जलस्थानीं आहे त्याचें फळ लाभ, आणि ५, २, ८ शेष उरले तर कूर्म स्थळाचेठायीं आहे त्याचें फळ हानि, आणि ३, ६, ९ उरले तर कूर्म आकाशाचेठायीं आहे त्याचें फळ मरण अशीं त्रिविध कूर्मफळें जाणावीं.

## घटित काष्ठकाम उभें करण्यास मुहूर्त.

स्तंभचक्र ॥ सूर्याधिष्ठितभद्वयंप्रथमतोमध्येतथाविंशतिस्तंभाग्रेरससंख्ययामुनिवरैरुक्तोमुहूर्तःशुभः ॥ ॥ फळ ॥ स्तंभाग्रेमरणंभवेद्गृहपतेर्मूलेधनार्थक्षयोमध्येचैवतुसर्वसौख्यमतुलंप्राप्नोतिकर्तासदा ॥ ४४ ॥

टी०–सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत घ्यावयाचा क्रम. त्यांत प्रथम दोन नक्षत्रें स्तंभमूळ, त्याचें फळ धनक्षय आणि पुढचीं २० नक्षत्रें स्तंभमध्य त्याचें फळ श्री, लक्ष्मी, कीर्ति, आणि त्या विसांच्या पुढचीं ६ नक्षत्रें स्तंभाग्र त्याचें फळ मरण असें आहे त्यास ज्या विभागाचें शुभ फळ त्या नक्षत्रीं स्तंभारोपण करावें.

## आढ्यास मुहूर्त.

मूलेमोभेत्रिऋक्षंगृहपतिमरणंपंचगर्भेसुखंस्यान्मध्येदेयाष्टऋक्षं धनसुतसुखदंपुच्छदेशेष्टहानिः॥ पश्चाद्देयांत्रिऋक्षंगृहपतिसुखदं भाग्यपुत्रार्थदेयंसूर्यर्क्षाच्चंद्रऋक्षंप्रतिदिनगणयेन्मोभचक्रंविलोक्य ॥ ४५ ॥

टी०--आढें घालणें तें चक्र पाहून घालावें ह्मणजे सूर्यनक्षत्रापासून ३, ५, ८, ९,३ याप्रमाणें दिवसनक्षत्रापर्यंत मोजावें त्यांत पहिलीं तीन नक्षत्रें मूळ भाग त्याचें

फळ स्वामिनाश, दुसरीं ५ न० गर्भभाग त्याचें फळ सुखप्राप्ति, तिसरीं ८ न० मध्य भाग त्याचें फळ धन, सुत व सौख्य यांची प्राप्ति, चवथीं ८ न० पुच्छभाग त्याचें फळ इष्टहानि, आणि पांचवीं तीन नक्षत्रें अग्रभाग त्याचें फळ सुख, भाग्य व पुत्र यांची प्राप्ति अशीं फळें आहेत तरी या क्रमानें शुभफलात्मक नक्षत्रें ज्या दिवशीं असतील त्या दिवशीं आढें घालावें.

## द्वारचक्र.

अर्काच्चत्वारिऋक्षाणिऊर्ध्वेचैवप्रदापयेत् ॥ द्वौद्वौकोणेषुदद्याद्वैशाखायांचचतुश्चतुः ॥ ४६ ॥ अधश्चत्वारिदेयानिमध्येत्रीणिप्रदापयेत् ॥ ऊर्ध्वेतुलभतेराज्यमुद्वासंकोणकेपुच ॥ ४७ ॥ शाखायांलभतेलक्ष्मींमध्येराज्यप्रदंतथा ॥ अधःस्थेमरणंप्रोक्तंद्वारचक्रंप्रकीर्तितम् ॥ ४८ ॥

टी०—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत मोजून चतुष्कोण द्वारचक्रावर क्रमें-करून नक्षत्रांची योजना करावी तो प्रथमचीं ४नक्षत्रें ऊर्ध्व भागीं त्याचें फळ राज्यप्राप्ति, पुढचीं ८ नक्षत्रें द्वारकोण ४ दर कोणावर २ प्रमाणें त्यांचें फळ उद्वास, पुढें ८ नक्षत्रें द्वाराच्या बाजू दोन दर बाजूस ४ चार प्रमाणें त्यांचें फळ लक्ष्मी-प्राप्ति, पुढचीं४ नक्षत्रें द्वाराच्या अधोभागीं (उंबरठ्यावर)त्यांचें फळ मरण, आणि शेवटचीं तीन नक्षत्रें द्वाराच्या मध्यभागीं त्यांचें फळ राज्यप्राप्ति, याप्रमाणें फळें आहेत तर शुभफलात्मक नक्षत्रें पाहून द्वार लावावें.

## शांतीस अग्निचक्र.

सैकातिथिर्वारयुताकृताप्ताशेषेगुणेभ्रेभुविवह्निवासः ॥
सौख्यायहोमेशशियुग्मशेषेप्राणार्थनाशौदिविभूतलेच ॥ ४९ ॥

टी०—ज्या तिथीस शांति करणें त्या तिथींत १ मिळवावा आणित्यांत जो वार असेल ते अंक त्यांत मिळवावे त्यास ४ नीं भागावें शेष उरेल त्याचें फळ ३ अथवा शून्य आलें असतां अग्नि मृत्यु लोकीं आहे त्याचें फळ सौख्यप्राप्ति शांतीस उक्त होय. शेष १ उरला असतां प्राणनाश, २ शेष उरले असतां अर्थनाश या दोहों अंकांची फलश्रुति ही शांतीस उक्त नाहीं.

## ग्रहमुखांत आहुतीपात पाहणें.

तरणिविद्बुगुभास्करिचंद्रमाकुजसुरेज्यविधुंतुदकेतवः ॥
रविभतोदिनभंगणयेत्क्रमात्प्रतिखगंत्रितयंत्रितयंन्यसेत् ॥५०॥

टी०—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों मोजून क्रमानें दर ग्रहावर तीन तीन नक्षत्रें स्थापावीं, त्यांचीं फळें प्रथम ३ नक्षत्र सूर्य फळ अशुभ, द्वितीय भा० ३न०

Scanned by CamScanner

बुध फळ शुभ, तृतीय भा० ३ न० शुक्र फळ शुभ, चतुर्थ भाग ३ नक्षत्रें शनि फळ अशुभ, पंचम भाग ३ नक्षत्रें चंद्र फळ शुभ, षष्ठ भा० ३ न० मंगळ फळ अशुभ, सप्तम भा० ३ न० गुरु फळ शुभ, अष्टम भा० ३ न० राहु फळ अशुभ, आणि नवम भाग न० ३ केतु त्याचें फळ अशुभ, अशीं फळें जाणून शुभ ग्रहाची शुभ आहुती द्यावी.

## गृहप्रवेशाचा क्रम.

अथप्रवेशेनवमंदिरस्ययात्रानिवृत्तावथभूपतीनाम् ॥
सौम्यायनेपूर्वदिनेविधेयंवास्त्वर्चनंभूतबलिश्चसम्यक् ॥ ५१ ॥

टी०—नवे गृहांत प्रवेश करणें, यात्रेहून घरीं येणें, राजदर्शनास जाणें, यांचे पूर्व दिवशीं वास्तुपूजा करून भूतबळि द्यावा आणि उदगयनही असावें.

चित्रानुराधामृगपौष्णपुष्यस्वातीश्रविष्ठाश्रवणंचमूलम् ॥ वारे ष्वसूर्यक्षितिजेष्वरिक्तातिथौप्रशस्तोभवनप्रवेशः ॥ ५२ ॥

टी०—चित्रा, अनुराधा, मृग, रेवती, पुष्य, स्वाती, धनिष्ठा, श्रवण, मूळ, या नक्षत्रीं आणि रवि, भौम हे वार वर्ज्य करून शेष वारीं आणि रिक्ता तिथी वर्ज्यकरून बाकी तिथींस गृहप्रवेश करावा.

## कलशचक्र.

प्रवेशःकलशेर्कर्क्षात्पंचनागाष्टषट्क्रमात् ॥
अशुभंचशुभंज्ञेयमशुभंचशुभंतथा ॥ ५३ ॥

टी०—गृहप्रवेशाविषयीं सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों मोजून फळें जाणावीं त्यांचा क्रम प्रथम ५ नक्षत्रें अशुभ, आणि पुढें आठ नक्षत्रें शुभ, पुढें ८ नक्षत्रें अशुभ, पुढें ६ नक्षत्रें शुभ याप्रकारें कलशचक्र होय.

## वामार्क लक्षण.

रंध्रात्पुत्राद्धनादायात्पंचस्वर्केस्थितेक्रमात् ॥
पूर्वाशादिमुखंगेहंविशेद्वामोभवेदतः ॥ ५४ ॥

टी०—घरांत प्रवेश करण्याचे समयीं सूर्य वामार्क असावा. तो पहावयाचा क्रम. प्रवेशलग्नीं अष्टम स्थानापासून पंचमस्थानीं सूर्य आणि घराचें मुख पूर्वेस. तसेंच घराचें मुख दक्षिणेस असलें तर त्यास ५ स्थानापासून पंचम स्थानापर्यंत २ आणि घराचें मुख पश्चिमेस असल्यास२ स्थानापासून पंचम स्थानापर्यंत ३, अथवा घराचें मुख उत्तरेस असतां सूर्य ११ स्थानापासून ५ स्थानापर्यंत आला तर प्रवेशास वामार्क होतो तो उक्त जाणावा.

Scanned by CamScanner

## ग्रह शुभाशुभ लग्नीं पाहणें.

त्रिकोणकेंद्रगैःशुभैस्त्रिषष्ठलाभसंस्थितैः ॥
असद्ग्रहैःस्थिरोदयेगृहंविशेद्वलेविधौ ॥ ५५ ॥

टी०—गृहप्रवेशास त्रिकोण व केंद्रस्थानीं शुभग्रह असें स्थिर लग्न पाहून आणि तिसरे सहावे आणि लाभस्थानीं पापग्रह असले तर शुभ जाणावें.

## गृहारंभाची लग्नशुद्धि.

त्रिषडायगतैःपापैरष्टांत्येतरगैःशुभैः ॥
चंद्रेलग्नेऽरिरंध्रांत्यवर्जितेस्याच्छुभंगृहम् ॥ ५६ ॥

टी०—३, ६, ११ स्थानीं पापग्रह शुभ, आणि ८, १२ स्थानाहून इतर स्थानीं शुभ ग्रह असतां शुभ जाणावें. परंतु चंद्र ७, १२, ८ म लग्नीं नसावा.

## अशुभयोगाचें लग्न.

धनकेंद्रत्रिकोणस्थःक्षीणचंद्रोनशोभनः॥
शत्रोर्नवांशगःखेटःखास्तसंस्थोपिनोशुभः ॥ ५७ ॥

टी०--लग्नाचे ठायीं २, १, ४, ७, १०, ५, ९ या स्थानीं कृष्णपक्षींचा चंद्र अशुभ आणि शत्रूच्या नवांशीं कोणीही ग्रह १०।७ स्थानीं नसावेत.

## आयुष्यप्रमाण.

लग्नेजीवःसुखेशुक्रोबुधःकर्मण्यरौरविः ॥
रविजःसहजेनूनंशतायुःस्यात्तदागृहम् ॥ ५८ ॥

टी०-लग्नीं गुरु, सुहृत्स्थानीं शुक्र, १०वा बुध, ६ वा रवि, ३रा शनि, असे शुभलग्नीं घरास आरंभ केला असतां १०० वर्षें आयुष्य जाणावें.

## अधिक आयुष्यप्रमाण.

भृगुर्लग्नेबुधोव्योम्निलाभेऽर्कःकेंद्रगोगुरुः ॥
यस्यारंभेचतस्यायुर्वत्सराणांशतद्वयम् ॥ ५९ ॥

टी०--शुक्र आणि बुध१०म स्थानीं, आणि रवि११शस्थानीं१,४,७,१०वा (केंद्र) स्थानीं गुरु असे ग्रह घराच्या आरंभाचे लग्नीं आले तर आयुष्य२०० वर्षें जाणावें.

## गृहायुष्यप्रमाण.

जीवोबुधोभृगुर्व्योम्निलाभगोभानुभूमिजौ ॥
प्रारंभेयस्यतस्यायुःसमाशीतिःसहश्रिया ॥ ६० ॥

Scanned by CamScanner

टी०—बृहस्पति अथवा बुध, शुक्र १० म स्थानीं; रवि, भौम ११ श स्थानीं; असे ग्रह गृहारंभास असले तर८० वर्षे घराचें आयुष्यप्रमाण. लक्ष्मीसहित नांदेल.

स्वोच्चवर्तिनिभृगौविलग्नगेदेवमंत्रिणिरसातलेऽथवा ॥ स्वोच्च गेरविसुतेऽथवाऽऽयगेस्यात्स्थितिश्चसुचिरंसहश्रिया ॥६१॥

टी०—शुक्रलग्नीं, गुरु ४ स्थानीं, शनि ११ स्थानीं, असे स्वगृहींच्या लग्नावर घरास आरंभ केला ह्मणजे तें गृह चिरकाळ लक्ष्मीयुक्त असेल.

स्वर्क्षगेहिमगौलाभेसुरेज्येकेंद्रसंस्थिते ॥
धनधान्यसुतारोग्ययुक्तंधामचिरंभवेत् ॥ ६२ ॥

टी०—कर्कीचा चंद्र एकादशस्थानीं आणि गुरु केंद्रस्थानीं असा योग लग्नीं असेल तर तें गृह धन, धान्य, सुत, आणि आरोग्य यांहीं युक्त चिरकाल असेल.

## अन्यमतें पृथ्वीशोधण्याचा प्रकार.

कुंडार्थंपृथ्वीपरिशोधहेतवेप्रष्टुर्मुखाद्यःप्रथमंस्फुटीभवेत् ॥ वर्गादिवर्णःकिलतद्दिशिस्मृतंशल्यंमुनींद्रैर्हपयास्तुमध्यतः॥६३॥

स्मृत्वेष्टदेवतांप्रष्टुर्वचनस्याद्यमक्षरम् ॥ गृहीत्वातुततःशल्याशल्यंसम्यग्विचार्यते ॥ ६४ ॥

टी०—यज्ञकुंडाकरितांच नवें घर बांधण्याकरितां प्रथम जागा शोधावी तिचा प्रकार, पृच्छकानें इष्ट देवतेचें स्मरण करून ब्राह्मणास प्रश्न करावा, ब्राह्मणानें त्या प्रश्नाचें प्रथमाक्षर अ, क, च, ट, त, प, य, श, या आठ वर्गांतून ज्या कोणत्या वर्गाचें असेल त्याप्रमाणें क्रमेंकरून पूर्वादि अष्ट दिशांकडे शल्य आहे असें जाणून आणि ह प य हीं प्रश्नाचीं आद्य अक्षरें असलीं ह्मणजे मध्यभागीं शल्य आहे असें जाणून खालीं लिहिल्याप्रमाणें फळ सांगावें.

## प्रश्नाक्षरफळें.

पूर्व ॥ पृच्छायांयदिअःप्राच्यांनरशल्यंतदाभवेत् ॥ सार्द्धहस्त प्रमाणेनतच्चमानुषमृत्युकृत् ॥ ६५ ॥ ॥ आग्नेय ॥ आग्नेय्यांदिशिकःप्रश्नेखरशल्यंकरद्वये ॥ राजदंडोभवेत्तत्रभयंनैवनिवर्तते ॥ ६६ ॥ ॥ दक्षिण ॥ ॥ याम्यायांदिशिचःप्रश्नेतदास्यात्कटिसंस्थितम्॥नरशल्यंगृहेतस्यमरणंचिररोगतः॥६७॥
॥ नैर्ऋत्य ॥ ॥ नैर्ऋत्यांयदिटःप्रश्नेसार्द्धहस्तादधःस्थले ॥

शुनोस्थिजायतेतत्रबालानांजायतेमृतिः ॥ ६८ ॥ ॥पश्चिम॥
तःप्रश्नेपश्चिमायांतुशिशोःशल्यंप्रजायते ॥ सार्द्धहस्तेगृहस्वा
मीनतिष्ठतिसदागृहे ॥ ६९ ॥ ॥वायव्य ॥ वायव्यांदिशि
पःप्रश्नेतुषांगाराश्चतुष्करे ॥ कुर्वंतिमित्रनाशंचदुःस्वप्नदर्शनंस
दा ॥ ७० ॥ ॥ उत्तर ॥ ॥ उदीच्यांदिशियःप्रश्नेविप्रशल्यंक
रादधः ॥ तच्छीघ्रंनिर्धनत्वायकुबेरसदृशस्यहि॥७१॥ईशान्य॥
ईशान्यांयदिशःप्रश्नेगोशल्यंसार्द्धहस्ततः ॥ तद्गोधनस्यनाशा
यजायतेगृहमेधिनः॥७२॥ ॥मध्य॥ ॥हपयामध्यकोष्ठेचवक्षो
मात्रंभवेदधः ॥ नृकपालमथोभस्मलोहंतत्कुलनाशकृत् ॥ ७३ ॥

टी०–पृच्छकाचे मुखांतून आदि अक्षर अ, वर्गाचें आलें तर पूर्वेचे कोष्टकांत दीड हात ओंड खणलें असतां नराचीं हाडें सांपडतील, तीं न काढल्यास मृत्युकारक होत ॥ १ ॥ क, वर्गांतील अक्षर असल्यास आग्नेयकोणीं २ हात ओंडीवर खराच्या अस्थि सांपडतील त्या न काढल्यास राजदंडापासून भय होईल आणि त्याची निवृत्ति होणार नाहीं ॥ २ ॥ च, वर्गांतील अक्षर आलें असल्यास दक्षिणेस कंबरेबरावर ओंड खणावें ह्मणजे नराच्या अस्थि सांपडतील त्या न काढिल्यास बहुतकाळ रोगग्रस्त होऊन शेवटीं मृत्यु प्राप्त होईल ॥३ ॥ ट, वर्गांतील अक्षर आ० नैर्ऋ० १ हातावर कुत्र्याच्या अस्थि सांपडतील त्या न काढिल्यास मुलेंवांचणार नाहींत ॥ ४ ॥ त, वर्गांतील अक्षर आ० पश्चिमेस मुलाचीं हाडें सांपडतील तीं न काढल्यास घरांत वास्तव्य होणार नाहीं॥५॥ प, वर्गांतील अक्षर असल्यास वायव्य कोणास ४ हातांवर तुस व कोळसे सांपडतील ते न काढल्यास मित्रनाश व दुःस्वप्न होईल ॥६॥ य,वर्गांतील अक्षर असल्यास उत्तरेस एक हात खोल ब्राह्मणाच्या अस्थि सांपडतील त्या न काढिल्यास जरी कुबेरसदृश धनवान् असला तरी दरिद्री होईल ॥ ७ ॥ श, वर्गांतील अक्षर असल्यास ईशान्य कोणीं दीड हातावर गाईच्या अस्थि सांपडतील, त्या न काढल्यास गोधनाचा नाश होईल ॥८॥ ह, प, य, हीं अक्षरें असल्यास मध्यभागीं छातीभर ओंडीवर नराचें कपाळ, भस्म, व लोह सांपडेल तें न काढल्यास कुळाचा नाश होईल ॥ ९ ॥ याप्रकारें ज्या वर्गांतील नांव येईल त्या दिशेस पहावें आणि वर्गाचें आदि अक्षर पृच्छकाचे मुखांतून या वर्णांशिवाय आल्यास त्याचें फळ कांहीं येऊं नये.

## यात्राप्रकरण शुक्र.

संमुख ॥ ॥ एकग्रामेपुरेवापिदुर्भिक्षेराष्ट्रविप्लवे ॥
विवाहेतीर्थयात्रायांप्रतिशुक्रोनविद्यते ॥ १ ॥

टी०—एका गांवांत अथवा एकाच शहरांत, दुर्भिक्षकाळीं व राजाचें धरणें येतें त्या समयीं, विवाहसमयीं व तीर्थयात्रेस संमुख शुक्र असला तरी दोष नाहीं.

पौष्णादावश्विपादांतंयावत्तिष्ठतिचंद्रमाः ॥
तावच्छुक्रोभवेदंधःसंमुखंगमनंशुभम् ॥ २ ॥

टी०—रेवती, अश्विनी, भरणी, कृत्तिका या नक्षत्रांचे प्रथम चरणीं चंद्र असला म्हणजे शुक्र अंध असतो, तो संमुख घेतला तरी गमनास दोष नाहीं

# शुभाशुभ फळ.

दक्षिणेदुःखदःशुक्रःसंमुखोहंतिमंगलं ॥
वामेपृष्ठेशुभोनित्यंरोधयेदस्तगःशुभः ॥ ३ ॥

टी०—बाहेर जातांना शुक्र दक्षिणेस असला तर दुःखदायक, संमुख असल्यास कार्य-हानि आणि डावीकडे अथवा पृष्ठभागीं असला तर गमन शुभ होय. पूर्वेस अस्त असल्यास पश्चिमेस शुभ आणि पश्चिमेस अस्त असल्यास पूर्वदिशेस शुभ जाणावा.

# घातचंद्र.

प्रयाणकालेयुद्धेचकृषौवाणिज्यसंग्रहे ॥
वादेचैवगृहारंभेघातचंद्रंविवर्जयेत् ॥ ४ ॥

टी०—यात्रेस जाण्यास, युद्धास, कृषि करण्यास, व्यापारास, धान्यादिसंग्रहास, वाद सांगण्यास व घराचे आरंभास घात चंद्र वर्जावा.

# घातप्रकरण.

घाततिथिर्घातवारोघातनक्षत्रमेवच ॥
यात्रायांवर्जयेत्प्राज्ञैरन्यकर्मसुशोभनम् ॥ ५ ॥

टी०—गमन काळीं घाततिथि व घातवार व घातनक्षत्रें अशीं वर्जावीं हीं अन्य कर्मांस शुभ आहेत.

मेषेरविर्मघाप्रोक्ताषष्ठीप्रथमचंद्रमाः ॥ वृषभेपंचमोहस्तश्चतुर्थीशनिरेवच ॥६॥ मिथुनेनवमःस्वातीअष्टमीचंद्रवासरः ॥ कर्केद्विरनुराधाचबुधःषष्ठीप्रकीर्तिता ॥ ७ ॥ सिंहेषष्ठचंद्रमाश्चदशमीशनिमूलके ॥ कन्यायांदशमश्चंद्रःश्रवणःशनिरष्टमी ॥ ८ ॥ तूलेगु

रुद्रादशीस्याच्छतंतृतीयचंद्रमाः ॥ वृश्चिकेरेवतीसप्तदशभीभार्ग वस्तथा ॥ ९ ॥ धनेचतुर्थोभरणीद्वितीयाभार्गवस्तथा ॥ मकरे ष्टमोरोहिणीद्वादशीभौमवासरः ॥ १० ॥ कुंभएकादशश्चार्द्राच तुर्थीगुरुवासरः ॥ मीनेचद्वादशःसार्पद्वितीयाभार्गवस्तथा ॥ ११ ॥

| राशि | मेष | वृषभ | मिथुन | कर्क | सिंह | कन्या | तूळ | वृश्चि | धन | मकर | कुंभ | मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चंद्र | १ | ५ | ९ | २ | ६ | १० | ३ | ७ | ४ | ८ | ११ | १२ |
| वार | रवि | शनि | सोम | बुध | शनि | शनि | गुरु | शुक्र | शु | भौम | गुरु | शु. |
| नक्षत्र | मघा | हस्त | स्वा. | अनु. | मूळ | श्रवण | शत. | रेवती | भ. | रोहि. | आर्द्रा | आ. |
| तिथि | ६ | ४ | ८ | ६ | १० | ८ | १२ | १० | २ | १२ | ४ | २ |

याप्रकारें मेषादि द्वादश राशिपरत्वें घातचतुष्टय वर्जून प्रयाण करावें.

## राशिपरत्वें कालचंद्र.

मेषेवेदावृषेऽष्टौचमिथुनेचतृतीयकः ॥ दशकर्केरविःसिंहेक न्यायांनवमस्तथा ॥१२॥ षट्तुलेवृश्चिकेखेंदुर्धनेरुद्राःप्रकी र्तिताः ॥ मकरेऋषयःप्रोक्ताः कुंभेबाणाउदाहृताः ॥१३॥ मीनेत्वंघ्रिः कालचंद्राःशौनकश्चेदमब्रवीत् ॥ १४ ॥

टी०—मेषराशीस ४ था चंद्र, वृषभास ८ वा, मिथुनास ३ रा, कर्कास १० वा, सिंहास १२वा, कन्येस ९वा, तुळास ६वा, वृश्चिकास १०वा, धनास ११वा, मकरास ७वा, कुंभास ५वा, मीनास ४ था चंद्र, या प्रकारें राशिपरत्वें कालचंद्र शौनकमतें आहे तो सर्व कर्मांस वर्ज्य करावा.

## तिथिपरत्वें लग्नें वर्जावयाचीं तीं.

नंदायामलिहर्योस्तुतुलामकरयोस्तथा ॥ भद्रायांमीनधनुषोःका लस्तिष्ठतिसर्वदा ॥ १५ ॥ जयायांस्त्रीमिथुनयोरिक्तायांमेषक र्कयोः ॥ पूर्णायांकुंभवृषयोर्मनुष्यमरणंध्रुवम् ॥ १६ ॥

टी०—नंदातिथींस वृश्चिक,सिंह,तूळ,मकर, आणि भद्रातिथींस मीन व धन लग्नें आणि जया तिथींस कन्या व मिथुन लग्नें,आणि रिक्तातिथींस मेष व कर्क लग्नें आणि पूर्णा तिथींस कुंभ व वृषभ याप्रमाणें ह्या तिथींस या लग्नीं काळ उभा असतो ह्मणून यांचा त्याग करावा.

## प्रयाणास उक्त नक्षत्रें.

हस्तेंदुमैत्रश्रवणाश्विनितिष्यपौष्णश्रविष्ठाचपुनर्वसुश्च ॥ प्रोक्ता

निधिष्ण्यानिनवप्रयाणेत्यक्त्वात्रिपंचादिमसप्ततारा: ॥ १७ ॥

टी०—हस्त, मृगशीर्ष, अनुराधा, श्रवण, अश्विनी, पुष्य, रेवती, धनिष्ठा, पुनर्वसु, हीं नक्षत्रें प्रयाणास उक्त आहेत परंतु ३,५,१,७, ह्या तारा गमनास वर्जाव्या.

## प्रयाणास मध्यम नक्षत्रें.

रोहिणीउत्तराचित्रामूलमार्द्रातथैवच ॥

षाढोत्तराभाद्रविश्वेप्रयाणेमध्यमा:स्मृता: ॥ १८ ॥

टी०—रोहिणी, उत्तरा, चित्रा, मूळ, आर्द्रा, पूर्वाषाढा, उत्तराभाद्रपदा, उत्तराषाढा, हीं नक्षत्रें प्रस्थानास मध्यम होत.

## प्रयाणास वर्ज्य नक्षत्रें.

पूर्वात्रयंमघाज्येष्ठाभरणीजन्मकृत्तिका ॥ सार्पस्वातीविशाखा चगमनेपरिवर्जयेत् ॥ १९ ॥ एकविंशतयोग्नेस्तुभरण्या:सप्त नाडिका: ॥ एकादशमघायाश्चत्रिपूर्वाणांचषोडश ॥ २० ॥ विशाखासार्पचित्राणांरौद्रस्वात्योश्चतुर्दश ॥ आद्यास्तुघटिका स्त्याज्या:शेषांगेगमनंशुभं ॥ २१ ॥

टी०—तिन्हीं पूर्वा, मघा, ज्येष्ठा, भरणी, जन्मनक्षत्र, कृत्तिका, आश्लेषा, स्वाती आणि विशाखा, हीं नक्षत्रें प्रयाणास वर्ज्य करावीं. परंतु संकटसमयास तिन्ही पूर्वा यांच्या १६ घटिका, मघांच्या ११ घटिका, ज्येष्ठा संपूर्ण, भरणीच्या ७ घटिका, कृत्तिकांच्या २१ घटिका, जन्मनक्षत्र संपूर्ण, आश्लेषा, विशाखा, चित्रा, स्वाती, आर्द्रा, ह्या ५ नक्षत्रांच्या १४ घटिका या प्रमाणें आद्य घटिका वर्ज्य करून प्रयाण करावें.

## प्रयाणास शुभाशुभ वार.

अर्केक्लेशमनर्थंकंचगमनेसोमेचबंधुप्रियंचांगारेऽनलतस्कर ज्वरभयंप्राप्नोतिचार्थंबुधे ॥ क्षेमारोग्यसुखंकरोतिचगुरौलाभ श्चशुक्रेशुभोमंदेबंधनहानिरोगमरणान्युक्तानिगर्गादिभि: ॥२२॥

टी०—रविवारीं गमन केलें असतां मार्गीं महा क्लेश व अनर्थ प्राप्त होतात; सोमवारीं बंधु आणि प्रियदर्शन; मंगळवारीं अग्नि, चोर आणि ज्वरभयप्राप्ति; बुधवारीं द्रव्यप्राप्ति; गुरुवारीं क्षेम, आरोग्य, सुखप्राप्ति; शुक्रवारीं लाभ व शुभफळप्राप्ति; शनिवारीं बंधन, हानि, रोग, मरण, असें प्राप्त होतें. याप्रमाणें गर्गादि ऋषींनीं सांगितलें आहे.

Scanned by CamScanner

# होराकथन व शकुन.

वारात्षष्ठस्यषष्ठस्यहोरासार्द्धद्विनाडिका॥ अर्कशुक्रौबुधश्चंद्रोमंदो जीवधरासुतौ ॥ १ ॥ गुरुर्विवाहेगमनेचशुक्रोबोधेसौम्यःसर्वकार्येषुचंद्रः ॥ कौजेयुद्धंराजसेवारवौचमंदेवित्तंचेतिहोराःक्रमाद्वै ॥ २ ॥ यस्यग्रहस्यवारेपिकर्मकिंचित्प्रकीर्तितम् ॥ तस्यग्रहस्य होरायांसर्वकर्मविधीयते ॥ ३ ॥

टी०—ज्या वाराचा त्या वारीं प्रथम२॥घटिका होरा त्यापासून सहावे वाराचा दुसरा होरा, या क्रमानें दिवसाचे बारा होरे जाणावे. रविवारीं प्रथम २॥ घटिका रवीचा होरा राजसेवेस उक्त, द्वितीय२॥ शुक्राचा तो गमनास, तृतीय२॥ बुधाचा ज्ञानप्राप्तीस, चतुर्थ २॥ चंद्राचा तो सर्व कार्यांस, पांचवा २॥ शनीचा द्रव्यसंग्रहास, सहावा २॥ गुरूचा विवाहास, सातवा २॥ मंगळाचा युद्धांत जाण्यास उक्त, असा याप्रमाणें क्रम आणि ज्या ज्या ग्रहाचा जो वार त्याचीं कृत्यें पूर्वी जीं कथिलीं तीं त्या त्या वाराचे होऱ्यावर करावीं.

# सूर्याचा होरा.

सूर्यस्यहोरेरजकीसुवस्त्रंकुमारिकाविप्रचतुष्टयंच ॥
काकत्रयंद्वौनकुलौतथैवचाषस्तथैकोवृषभस्तुगौश्च ॥ ४ ॥

टी०—रवीचे होऱ्यावर गमन केलें तर पुढें शकुन होतील ते सांगतों. परटीण, वस्त्रें, कुमारिका, चार ब्राह्मण, तीन कावळे, दोन मुंगुस, एक चाष, एक बैल, आणि गाय यांतून कांहींतरी शकुन भेटतील.

# चंद्राचा होरा.

चंद्रस्यहोरेद्विजयुग्मकाकभेरीमृदंगानकुलःखरोष्ट्रौ ॥
हयश्चगोमेषशुनस्तथैवपुष्पाणिनारीद्वयमेवमार्गे ॥ ५ ॥

टी०—चंद्राचे होऱ्यावर गमन केलें तर मार्गाचेठायीं दोन ब्राह्मण, काक, नगारे, मृदंग, मुंगुस, गाढव, उंट, घोडा, गाय, मेंढा, कुत्रें, पुष्पें, व दोन स्त्रिया यांतून कांहींतरी भेटावीं.

# मंगळाचा होरा.

मार्जारयुद्धंकलहः कुटुंबेरजस्वलास्त्रीभवनस्यदाहः ॥
नपुंसकः श्वत्रितयंद्विजश्चनग्नोविमुक्तोधरणीसुतस्य ॥ ६ ॥

Scanned by CamScanner

टी०—मंगळाचे होऱ्यावर गेलें असतां मांजरांचें युद्ध, किंवा स्त्रीपुरुषांचा कलह, किंवा रजस्वला स्त्री, किंवा जळतें घर, किंवा नपुंसक, किंवा ३ कुत्रीं, अथवा नग्न ब्राह्मण भेटेल.

## बुधाचा होरा.

बुधस्यहोरेशकुनश्चसर्वःस्त्रीपुत्रयुक्ताकलशस्तुपूर्णः ॥
सुचातकश्चाषगजौकुमारःपुष्पाणिनारीखलुदर्पणश्च ॥७॥

टी.–बुधाचे होऱ्यापर सर्व शकुन,पुत्रयुक्त स्त्री,कलश पाण्यानें भरलेला,चातकपक्षी व चाषपक्षी,गज, मुलगा,पुष्पें, किंवा स्त्री अथवा आरसा यांतून कांहीं एक भेटेल.

## गुरूचा होरा.

गुरोर्द्विजातिर्गणिकाचधेनुःस्त्रीबालयुक्तासजलोघटस्तु ॥
ऊर्णाचकाकोनकुलोबकश्चहंसस्यराजाबहवस्तुवैश्याः ॥८॥

टी०—गुरूचे होऱ्यावर ब्राह्मण, कळवांतीण, गाय, मुलासहित स्त्री,भरलेली घागर, शाल, काक, मुंगुस, बगळा, हंसांचा राजा, किंवा बहुत वाणी यांतून कांहीं भेटेल.

## शुक्राचा होरा.

शुक्रस्यहोरेगणिकाद्विजेंद्रःकाकत्रिकंचाथनपुंसकोवा ॥
मद्यंहिमांसंगणकश्चधेनुर्धान्यंचशूद्रत्रितयंचवैश्यः ॥ ९ ॥

टी०–शुक्राच्या होऱ्यावर प्रथम ब्राह्मण, कळवांतीण, तीन काक, नपुंसक, मद्य, मांस, गणक, ( जोशी ) गाय, धान्य, वाणी, तीन शूद्र, यांतून कोणी भेटेल.

## शनीचा होरा.

पतंगसूनोर्यवनश्चनग्नोरजस्वलास्त्रीमृतकंतथैव ॥
पिशाचगृध्रोविधवाचवन्हिर्नपुंसकश्चाथयुवाप्रचंडः ॥ १० ॥

टी०—शनीच्या होऱ्यावर नग्न मुसलमान, रजस्वला स्त्री, प्रेत, पिशाच, गृध्रपक्षी, विधवा स्त्री, अग्नि, नपुंसक, तरुण बळकट असा पुरुष, यांतून कोणीतरी शकुन भेटेल, या प्रकारें शकुन जाणावे.

## उत्तम प्रश्न न झाला तर.

मनूचें वाक्य ॥ ॥ गमनंप्रतिराजंस्तुसंमुखादर्शनेनच ॥
प्रशस्तांश्चैवसंभाषेत्सर्वानेतांश्चकीर्तयेत् ॥ १ ॥

Scanned by CamScanner

टी०—राजाम्रत सांगतो, हे राजा, गमनकाळीं पूर्वीं शकुन सांगितले ते किंवा उत्तम भाषण यांचें श्रवण, दर्शन, न झालें तर त्यांचें मनांत स्मरण करून गमन करावें शुभ होय.

## वारपरत्वें वस्त्रधारण.

रवौनीलंबुधेपीतंकृष्णवर्णंशनैश्चरे ॥
श्वेतंगुरौभृगौभौमेरक्तंसोमेतुचित्रकं ॥ १ ॥

टी०—रविवारीं निळें, बुधवारीं पिंवळें, शनिवारीं काळें, गुरुवारीं व शुक्रवारीं पांढरें, मंगळवारीं तांबडें, सोमवारीं चित्र, याप्रमाणें वस्त्र धारण करून गमन करावें.

## नक्षत्र तिथि वारपरत्वें दिक्शूल वर्ज्य.

### पूर्व दिशा.

मूलश्रवणशाक्रेषुप्रतिपन्नवमीषुच ॥
शनौसोमेबुधेचैवपूर्वस्यांगमनंत्यजेत ॥ १ ॥

टी०—मूळ, श्रवण, ज्येष्ठा, नक्षत्र आणि प्रतिपदा, नवमी, आणि शनि, सोम, बुधवार यांवर पूर्व दिशेस गमन करूं नये.

### दक्षिण दिशा.

पूर्वाभाद्रपदाश्विन्योःपंचमीचत्रयोदशी ॥
गुरुर्धनिष्ठाद्रांचैवयाम्येसप्तविवर्जयेत् ॥ २ ॥

टी०—पूर्वाभाद्रपदा, अश्विनी, आणि तिथि पंचमी, त्रयोदशी, गुरुवार, धनिष्ठा, आर्द्रा, हीं ७ दक्षिण दिशेस गमनास वर्जावीं.

### पश्चिम दिशा.

रोहिण्यांचतथापुष्येषष्ठीचैवचतुर्दशी ॥
भौमार्कगुरुवारेषुनगच्छेत्पश्चिमादिशम् ॥ ३ ॥

टी०—रोहिणी, आणि पुष्य, षष्ठी, चतुर्दशी, मंगळ, रवि, गुरु, हे वार यांजवर पश्चिम दिशेस गमन वर्जावें.

### उत्तर दिशा.

करेचोत्तरफाल्गुन्यांद्वितीयादशमीतथा ॥
बुधेरवौभौमवारेनगच्छेदुत्तरांदिशम् ॥ ४ ॥

टी०—हस्त आणि उत्तराफाल्गुनी हीं नक्षत्रें आणि द्वितीया, दशमी, ह्या तिथि व रवि, भौम, हे वार यांवर उत्तर दिशेस गमन वर्जावें.

## विदिक्शूल.

ईशान्यांज्ञेशनौशूलआग्नेय्यांगुरुसोमयोः ॥
वायव्यांभूमिपुत्रेतुनैर्ऋत्यांशुक्रसूर्ययोः ॥ ५ ॥

टी०—वारपरत्वें शूल विदिशांस असतो तर ज्या वारीं ज्या विदिशेस शूल असेल तिकडे त्या वारीं गमन वर्जावें तें असें. बुध आणि शनि या वारीं ईशान्य दिशेस, गुरु आणि सोम या वारीं आग्नेयेस, मंगळवारीं वायव्येस, शुक्र आणि रवि या वारीं नैर्ऋत्येस शूल असतो.

## शूलदोषनिवारणार्थ पदार्थभक्षण.

सूर्यवारेघृतंपीत्वागच्छेत्सोमेपयस्तथा ॥ गुडमंगारवारेतुबुध
वारेतिलानपि ॥ १ ॥ गुरुवारेदधिज्ञेयंशुक्रवारेयवानपि ॥
माषान्भुक्त्वाशनेर्वारेशूलदोषोपशांतये ॥ २ ॥

टी०—रविवारीं घृतप्राशन, व सोमवारीं पयःप्राशन, मंगळवारीं गूळ, आणि बुधवारीं तीळ भक्षण, गुरुवारीं दधिप्राशन, शुक्रवारीं जवभक्षण, शनिवारीं उडदांचें अन्न भक्षण करावें, असें वारपरत्वें भक्षण करून गमन करावें.

## कुंभ व मीन चंद्रावर वर्ज्य कर्मे.

शय्यावितानंप्रेताग्निक्रियाकाष्ठतृणार्जनम् ॥
याम्यदिग्गमनंकुर्यान्नचंद्रेकुंभमीनगे ॥ १ ॥

टी०—पलंग विणणें, व प्रेताग्निकर्म व काष्ठ व तृण यांचा संग्रह आणि दक्षिणेस गमन हीं सकळ कर्में कुंभ व मीन या राशींच्या चंद्रावर वर्ज्य करावीं.

## संमुख चंद्र.

करणभगणदोषंवारसंक्रांतिदोषंकुतिथिकुलिकदोषंयामयामार्द्धदोषं॥
कुजशनिरविदोषंराहुकेत्वादिदोषंहरतिसकलदोषंचंद्रमासंमुखस्थः॥१॥

टी०—करण, नक्षत्र, वार, संक्रांति, कुतिथि, कुलिक, यामार्द्ध, मंगळ, शनि, रवि, राहु, केतु,इत्यादि दोष संमुख चंद्र घेऊन गमन केलें असतां जातात.

## दिशापरत्वें संमुख चंद्र.

मेषेचसिंहेधनपूर्वभागेवृषेचकन्यामकरेचयाम्ये ॥ तुलेचकुंभे

मिथुनेप्रतीच्यांकर्कालिमीनेविधुरुत्तरस्याम् ॥१॥ फळ ॥ संमुखोऽर्थ स्यलाभायदक्षिणेसुखसंपदां ॥ पृष्ठतःप्राणनाशायवामेचंद्रेधनक्षयः॥२॥

टी०—मेष, सिंह, धन, या राशींचा चंद्र पूर्वेस. वृषभ, कन्या, मकर, या राशींचा चंद्र दक्षिणेस. तूळ, कुंभ, मिथुन, या राशींचा चंद्र पश्चिमेस. कर्क, वृश्चिक, मीन, या राशींचा चंद्र उत्तरेस असतो. फळः–दिशापरत्वें चंद्र संमुख घेऊन गमन करावें, अर्थलाभ होईल. आणि उजवेकडे घेतला तर धनसंपदा प्राप्ति, पृष्ठभागीं घेतला तर प्राणनाश होय, आणि वामभागीं घेऊन गमन केलें असतां धनक्षय असें जाणावें.

## काळवेळा पाहणें.

पूर्वाण्हेचोत्तरांगच्छेत्प्राच्यांमध्यान्हकेतथा ॥
दक्षिणामपराण्हेतुपश्चिमेअर्धरात्रके ॥ १ ॥

टी०—दिवसाचे प्रथम प्रहरीं उत्तरेस. द्वितीय प्रहरीं ( मध्यान्हीं ) पूर्वेस. तृतीय प्रहरीं ( अपराण्हीं ) दक्षिणेस. आणि अर्धरात्रीं पश्चिमेस गमन करावें.

## दिशापरत्वें योगिनी व त्यांचीं फळें पाहणें.

प्रतिपन्नवमीपूर्वेद्वितीयादशमोत्तरे ॥ तृतीयैकादशीवन्हौचतुर्द्वादशिनैर्ऋते ॥ १ ॥ पंचत्रयोदशीयाम्येषष्ठीभूतश्चपश्चिमे ॥ सप्तमीपूर्णावायव्येअमावास्याष्टमीशिवे ॥२॥ फळें ॥ ॥ पृष्ठेच शुभदाप्रोक्तावामेचैवविशेषतः ॥ योगिनोसाभवेन्नित्यंप्रयाणे शुभदानृणाम् ॥ ३ ॥

टी०—प्रतिपदा व नवमी ह्या तिथींस योगिनी पूर्वेस. द्वितीया, दशमीस उत्तरेस. तृतीया, एकादशी आग्नेयेस. चतुर्थी, द्वादशी नैर्ऋत्येस. पंचमी, त्रयोदशी दक्षिणेस. षष्ठी चतुर्दशी पश्चिमेस. सप्तमी, पौर्णिमा वायव्येस. आणि अमावास्या, अष्टमी ईशान्येस. याप्रमाणें योगिनी जाणाव्या. यांचें फळ, योगिनी पृष्ठभागीं किंवा वामभागीं घेऊन नित्य गमन करावें शुभ होय.

## अथ कालपाश.

उत्तरस्यांरवेर्वारेवायौचंद्रदिनेभवेत् ॥ भौमवारेप्रतीच्यांतुनैर्ऋत्यांबुधवासरे ॥ १ ॥ यमाशायांगुरोर्वारेवन्हेर्दिशिभृगोर्दिने ॥ प्राच्यांदिशिशनेर्वारेकालःप्रोक्तोमनीषिभिः ॥ २ ॥

टी०—रविवारीं काल उत्तरेस, सोमवारीं वायव्येस, मंगळवारीं पश्चिमेस, बुध-

Scanned by CamScanner

वारीं नैर्ऋत्येस, गुरुवारीं दक्षिणेस, शुक्रवारीं आग्नेयेस, शनिवारीं पूर्वेस, याप्रमाणें काल,दिशा व वारपरत्वें असतो असें पंडितांनीं सांगितलें, हा काळ राहूपरी वर्जावा.

## काळराहु.

रविगुरुदिनपूर्वेसोमशुक्रेचयाम्येवरुणदिशितुभौमेउत्तरेसौरिसौम्ये ॥ अभिमुखउतदक्षेकालराहुर्दिशायांहरतिसकलकार्यंवामपृष्ठेर्थसिद्धिः ॥ १ ॥

टी०—रवि आणि गुरु या वारीं काळराहु पूर्वेस असतो. सोम, शुक्रवारीं दक्षिणेस. भौमवारीं पश्चिमेस. शनि आणि बुधवारीं उत्तरेस काळराहु असतो. तो संमुख अथवा उजवा असतां गमन केल्यास कार्याची हानि करितो, व डावीकडे व पाठीमागें असतां गमन केल्यास कार्यसिद्धि करितो.

## क्षुधितराहु.

शक्रवायुयमेशांबुवन्हिग्लौरक्षसांदिशि ॥ यामार्द्धेक्षुधितोराहुर्भ्रमत्येवंक्रमात्सदा ॥ १ ॥ नतिथिर्नचनक्षत्रंनयोगोनचचंद्रमाः ॥ सिध्यंतिसर्वकार्याणियात्रायांदक्षिणेरवौ ॥ २ ॥

टी०—प्रथम यामार्धीं क्षुधित राहु पूर्वेस असतो द्वितीययामार्द्धीं वायव्येस तृतीयया० दक्षिणेस चतुर्थ यामा० ईशान्येस पंचमया० पश्चिमेस षष्ठ या० आग्नेयेस सप्तमया० उत्तरेस अष्टमया० नैर्ऋत्येस. या प्रमाणें प्रत्यहीं भ्रमण करितो परंतु दक्षिण भागीं रवि घेऊन गमन केलें असतां तिथि नक्षत्रादिदोष जातात.

## काळ कोठें आहे तो पाहणें.

कालःपलंघातकलोहपातदावानलःखड्गकचोलकांतिकाः॥नखाश्चतुर्विंशतिषट्तथादिग्रुद्राधृतिर्वेदगुणाःक्रमेण ॥१॥ तिथ्यायुतंवैवसुभाजितंचशेषंचकालंमुनयोवदंति ॥ २ ॥ ॥फळ॥ कालंचपृष्ठेपलसंमुखेचघातंचलोहंवडवाचपृष्ठे ॥ खड्गंचचाग्रे कवचंचवामेकांतिश्चयोज्यादिशिदक्षिणस्यां ॥ ३ ॥

टी०—काळांचीं नांवें:– १ काल [२०], २ पल [२४], ३ घातक [६], ४ लोहपात [१०], ५ वडवानळ [११], ६ खड्ग [१८], ७ कवच [४], ८ कांति [३] अशीं आठ नांवें. त्यांचे खालीं अंक मांडिले आहेत ते त्या तिथीस गमन करावयाचें असेल ती तीथ एकेक अंकांत मिळवून आठांनीं भागून शेष जे अंक उरतील त्या दिशेस तो काळ आहे अशा क्रमानें पूर्वादि अष्ट दिशांस पहावें. पृष्ठभागीं काळ शुभ, संमुख पल शुभ, पृष्ठभागीं घातक, लोहपात



Scanned by CamScanner

आणि वडवानळ, हे तिन्ही शुभ, अग्रभागीं खड्गशुभ, वामभागीं कवचशुभ, आणि दक्षिणभागीं कांति शुभ. अशीं दिशापरत्वें शुभ घेऊन त्या दिशेस युद्धांत अथवा यात्रादि कार्यास गमन करावें कार्यसिद्धि होईल.

## पंथाराहुचक्र.

स्युर्धर्मेदस्रपुष्योरगवसुजलपद्वीशमैत्राण्यथार्थेयाम्याजांघ्रींद्र
कर्णादितिपितृपवनोडून्यथोभानिकामे ॥ वन्ह्यार्द्राबुध्न्यचि
त्रानिर्ऋतिविधिभगाख्यानिमोक्षेऽथरोहिण्यर्यम्णाब्जेंदुविश्वां
तिमभदिनकरर्क्षाणिपंथादिराहौ ॥ १ ॥

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| धर्म | अश्विनी | पुष्य | आश्लेषा | विशाखा | अनुराधा | धनिष्ठा | शततारका |
| अर्थ | भरणी | पुनर्वसु | मघा | स्वाती | ज्येष्ठा | श्रवण | पूर्वाभाद्रप |
| काम | कृत्तिका | आर्द्रा | पूर्वा | चित्रा | मूळ | अभिजित् | उत्तराभाद्र |
| मोक्ष | रोहिणी | मृग | उत्तरा | हस्त | पूर्वाषाढा | उत्तराषा. | रेवती |

टी०—नक्षत्रें २८ त्यांचे भाग ४ त्यांचीं नांवें. प्रथम भाग धर्ममार्गाचीं नक्षत्रें ७ द्वितीय अर्थ मार्गाचीं नक्षत्रें ७ तृतीय काममार्गाचीं नक्षत्रें ७ चतुर्थ मोक्षमार्गाचीं नक्षत्रें७ या प्रमाणें चहूं मार्गाचीं नक्षत्रें जाणावीं. त्यांत एके मार्गाचे नक्षत्रीं सूर्य असतां चंद्र चहूं मार्गाचे नक्षत्रीं फिरेल त्याचीं फळें सांगतों.

## धर्ममार्गाचीं फळें.

धर्ममार्गेगतेसूर्येअर्थांशेचंद्रमायदि ॥
तदाशत्रुभयंतस्यज्ञेयंतुविबुधैःशुभं ॥ १ ॥

टी०—धर्ममार्ग नक्षत्रीं सूर्य असतां व अर्थमार्गनक्षत्रीं चंद्र आला असतां गमन केलें तर मार्गाचे ठायीं शत्रुभय होईल. अशुभ फळ जाणावें.

धर्ममार्गगतेसूर्येचंद्रेतत्रैवसंस्थिते ॥
संहारश्चभवेत्तत्रभंगोहानिःप्रजायते ॥ २ ॥

टी०—धर्ममार्ग नक्षत्रीं सूर्य व चंद्र असतां गमन केलें तर संहार आणि भंग व हानि असें प्राप्त होईल.

धर्ममार्गेगतेसूर्येकामांशेचंद्रमायदि ॥
विग्रहोदारुणश्चैवचोराकुलसमुद्भवम् ॥ ३ ॥

टी०—धर्ममार्ग नक्षत्रीं सूर्य आणि काममार्गनक्षत्रीं चंद्र असे असले तर त्याचें फळ बहुत वैर आणि चोराचें भय हीं प्राप्त होतील.

Scanned by CamScanner

धर्ममार्गेगतेसूर्येचंद्रेमोक्षगतेयदि ॥
गृहलाभोभवेत्तस्यविज्ञेयोनात्रसंशयः ॥ ४ ॥

टी०—धर्ममार्गी सूर्य आणि चंद्र मोक्षमार्गी असे असले तर गृहलाभ आणि मार्गी सुख प्राप्त होईल.

## अर्थमार्गाचीं फळें.

अर्थमार्गेगतेसूर्येचंद्रेधर्मस्थितेयदि ॥
गजलाभोभवेत्तस्यतत्रश्रीःसर्वतोमुखी ॥ १ ॥

टी०—अर्थमार्गी सूर्य आणि चंद्र धर्ममार्ग नक्षत्रीं असे असले तर गज-लाभ आणि लक्ष्मीप्राप्ति व सर्वदा सुखी होईल.

अर्थमार्गेगतेसूर्येचंद्रेतत्रैवसंस्थिते ॥
प्रथमंजायतेकार्यंतत्रभंगोभविष्यति ॥ २ ॥

टी०—अर्थमार्गी सूर्य आणि चंद्र आले तर प्रथम कार्य होईल नंतर भंग पावेल.

अर्थमार्गेगतेसूर्येचंद्रेकामांशसंस्थिते ॥
सर्वसिद्धिर्भवेत्तस्यजानीयान्नात्रसंशयः ॥ ३ ॥

टी०—अर्थमार्गी सूर्य आणि काममार्गी चंद्र आला तर सर्व कार्य सिद्ध होईल, यांत संशय नाहीं.

अर्थमार्गेगतेसूर्येचंद्रेमोक्षस्थितेयदि ॥
भूमिलाभोभवेत्तस्यहर्षयुक्तःसुखीभवेत् ॥ ४ ॥

टी०—अर्थमार्गी सूर्य आणि मोक्षमार्गी चंद्र असे असले ह्मणजे भूमिलाभ व हर्षयुक्त व मार्गाचें ठायीं सुख पावेल.

## काममार्गाचीं फळें.

काममार्गेगतेसूर्येचंद्रेधर्मेचसंस्थिते ॥
गजाश्वाश्वविलभ्यंतेराजसन्मानसंभवात् ॥ १ ॥

टी०—काममार्गी सूर्य आणि धर्ममार्गी चंद्र आला तर हत्ती, घोडे यांचा लाभ आणि राजाकडे सन्मान प्राप्त होईल.

काममार्गेगतेसूर्येचंद्रेचैवार्थसंस्थिते ॥
सकलंजायतेतस्यविघ्नभंगंविनिर्दिशेत् ॥ २ ॥

Scanned by CamScanner

टी०—काममार्गीं सूर्य आणि अर्थमार्गीं चंद्र आला तर सकल विघ्नें नाश पावतील आणि सर्व कार्यसिद्धि होईल.

काममार्गेगतेसूर्येचंद्रेतत्रैवसंस्थिते ॥
विग्रहंदारुणंचैवकार्यनाशंविनिर्दिशेत् ॥ ३ ॥

टी०—काममार्गीं सूर्य आणि चंद्र आले तर वैर फार आणि कार्यनाश होईल.

काममार्गेगतेसूर्येचंद्रेमोक्षगतेपिवा ॥
राज्ञोलाभोभवेत्तस्यस्वर्णलाभंविनिर्दिशेत् ॥ ४ ॥

टी०—काममार्गीं सूर्य व मोक्षमार्गीं चंद्र आला तर राजापासून लाभ व सुवर्णलाभ होईल.

## मोक्षमार्गाचीं फळें.

मोक्षमार्गेगतेसूर्येचंद्रेधर्मस्थितेयदि ॥
हेमलाभोभवेत्तस्यसर्वकार्यंप्रसिद्ध्यति ॥ १ ॥

टी०—मोक्षमार्गीं सूर्य व धर्ममार्गीं चंद्र असले तर हेम लाभ व सर्वसिद्धि होईल.

मोक्षमार्गेगतेसूर्येअर्थांशेचंद्रमायदि ॥
विफलंतस्यकार्यंचचोरराजरिपोर्भयम् ॥ २ ॥

टी०—मोक्षमार्गीं सूर्य व अर्थमार्गीं चंद्र आहे तर राजा व रिपु यांपासून भय होईल.

मोक्षमार्गेगतेसूर्येचंद्रेकामस्थितेयदि ॥
सर्वसिद्धिमवाप्नोतिकार्येचजयमेवच ॥ ३ ॥

टी०—मोक्षमार्गीं सूर्य व काममार्गीं चंद्र असला तर सर्व कार्यसिद्धि व कार्यांत जय प्राप्त होईल.

मोक्षमार्गेगतेसूर्येचंद्रेतत्रैवसंस्थिते ॥
विग्रहंदारुणंचैवविघ्नस्तत्रभविष्यति ॥ ४ ॥

टी.—मोक्षमार्गीं सूर्य व चंद्र आहेत तर वैर आणि नानाप्रकारें विघ्नें प्राप्त होतील.

## पंथाराहूवर कर्में करावयाचीं.

यात्रायुद्धेविवाहेचप्रवेशेनगरादिषु ॥
व्यापारेषुचसर्वेषुपंथाराहुःप्रशस्यते ॥ १ ॥

टी०—यात्रेस आणि युद्धांत व विवाहास व नगरादिकांस तसेंच सर्व व्यापारांत प्रवेश करणें यांस पंथाराहु प्रशस्त होय.

## गर्गादिकांचा मुहूर्त.

उषःप्रशस्यतेगर्गःशकुनंचबृहस्पतिः ॥
अंगिरामनउत्साहंविप्रवाक्यंजनार्दनः ॥ १ ॥

टी०—मागील ५ घटिका रात्र शेष उरली ह्मणजे उषःकाल होतो तो गर्गमुनीचे मतें शुभ. आणि बृहस्पतीच्या मतें उत्तम शकुन शुभ. अंगिराच्या मतें मनोत्साहकाळीं शुभ आणि जनार्दनमतें विप्रवाक्यें शुभ होय.

## शुभाशुभ वाहनें.

आत्मनोजन्मनक्षत्राद्दिननक्षत्रमेवच ॥ एकीकृत्वाहरेन्नागंनं दशेषेचवाहनं॥१॥रासभोऽश्वोगजोमेषोजंबुकःसिंहसंज्ञकः ॥ काकश्चैवमयूरश्चहंसइत्येववाहनम् ॥ २ ॥ ॥ फळ ॥ रासभेअर्थनाशश्चधनलाभश्चवाजिनि ॥लक्ष्मीप्राप्तिर्गजाख्ये हिमेषेचमरणंध्रुवं ॥३ ॥ जंबुकेस्वल्पलाभश्चसर्वसिद्धिश्चसिंहके ॥ काकेचनिष्फलंकार्यंमयुरेचसुखंबहु ॥४॥हंसेतुसर्वसिद्धिःस्याद्वाहनानांफलंस्मृतम् ॥ ५ ॥

टी०—आपले जन्म नक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावतों मोजून नवानीं भागावें. शेष उरेल तें वाहन जाणावें. शेष १ उरेल तर वाहन गाढव. त्याचें फळ अर्थनाश. २ उर० वा० घोडा फळ धन लाभ. ३ उरले तर वा०हत्ती फ० लक्ष्मीप्राप्ति. ४ उरले तर वा० मेंढा फ० मरण. ५ उरलें तर वा० कोल्हा फ० स्वल्पलाभ. ६ उरले तर वा० सिंह फ० कार्यसिद्धि. ७ उरले तर वा० कावळा फ० निष्फळ. ८ उरले तर वा० मयूर फळ सुखप्राप्ति. ९ उरले तर वा० हंस फळ सिद्धि. याप्रमाणें वाहनें व फळें जाणावीं.

## त्र्यंकमुहूर्त व त्याचें फळ.

तिथयःपक्षगुणिताःसप्ताभिर्भाजिताश्चताः ॥ वाराःस्युर्वन्हिगुणितावसुभिश्चैवभाजिताः॥चतुर्गुण्यानिभान्यंगभाजितानियथाक्रमम् ॥ १ ॥ ॥ पीडास्यात्प्रथमेशून्येमध्यशून्येमहद्भयम् ॥ अंत्यशून्येतुमरणंत्र्यंकेचविजयोभवेत् ॥ २ ॥

टी०—ज्या तिथीस गमन करावयाचें ती तिथि दुप्पट करून सातांनीं भागावी आणि जो वार असेल तो तिप्पट करून आठांनीं भागावा आणि नक्षत्र असेल तें चौपट करून सहानीं भागावें, शेषांक येतील त्यांचीं फळें:-प्रथम तिथीचे भागास शून्य आलें तर पोडा, द्वितीय वाराचे भागास शून्य आलें तर मोठें भय, तिसरे नक्षत्र भागास शून्य आलें तर मरण, आणि तिन्ही ठिकाणीं अंक आले ह्मणजे त्र्यंक, त्याणें विजय प्राप्त होय.

## भ्रमणाडळ मुहूर्त.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रंसप्तभिर्भागमाहरेत् ॥ त्रिषट्भ्रमणंचैवद्वि सप्तमहदाडळम् ॥ १ ॥ प्रथमंपंचचत्वारिआडळोनास्तिनि श्चितम् ॥ आडळेताडनंप्रोक्तंभ्रमणेकार्यनाशनम् ॥ २ ॥

टी०—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों गणावें आणि सातांनीं भागावें, शेष ३ अथवा ६ उरले तर त्या दिवशीं भ्रमण आहे, कार्यनाश जाणावा. २ अथवा ७ उरले तर आडळ आहे तें गमनास वर्ज्य, ताडण करण्यास उक्त, १, ५ अथवा ४ उरले तर आडळ नाहीं गमनास उक्त जाणावें.

## हैवर मुहूर्त.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रंपक्षादितिथिवारयुक् ॥
नवभिस्तुहरेद्भागंसप्तशेषंतुहैवरम् ॥ १ ॥

टी०—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों मोजावें त्यांत पक्ष, तिथी, वार मिळवून ९ वानीं भागावें शेष ७ अंक उरले तर हैवर मुहूर्त आहे तो गमनास शुभ होय.

## घबाड मुहूर्त.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रंत्रिगुणंतिथिमिश्रितम् ॥
नवभिस्तुहरेद्भागंत्रिशेषेस्याद्घबाडकम् ॥ १ ॥

टी०—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापावेतों गणून त्रिगुणित करून चालती तिथि आंत मिळवून ९ नीं भागावें ३ शेष उरले तर घबाड मुहूर्त जाणावा तो प्रयाणास उक्त.

## वारपरत्वें स्वरशकुन.

गुरौशनौरवौभौमेशुभोवैदक्षिणःस्वरः ॥ अन्यवारेषुवामस्तुस्व रश्चैवशुभःस्मृतः ॥१॥ निर्गमेवामतःश्रेष्ठःप्रवेशेदक्षिणःशुभः ॥ यःस्वरःसचनासाग्रेयोगिनांमतमीदृशम् ॥ २ ॥

टी०—गुरु, शनि, रवि, भौम, या चोहोंवारीं आपले नासिकेचा दक्षिण स्वर वहात असतां गृहांत प्रवेश करावा. आणि चंद्र, बुध, शुक्र या तिहीं वारीं वामस्वर वहात असतां निर्गमास श्रेष्ठ असें योग्यांचें मत आहे असें जाणावें.

## वारपरत्वें छायाशकुन.

अष्टौपादाबुधेस्युर्नवधरणिसुतेसप्तजीवेपदानिज्ञेयंचैकादशार्के शनिशशिभृगुषुप्रोक्तमर्थंचतुष्कम्॥ तस्मिन्कालेमुहूर्तेसकलगुणयुतेकार्यसिद्धिःशुभोक्तानास्मिन्पंचांगशुद्धिर्नखलुशशिबलं भाषितंगर्गमुख्यैः ॥ १ ॥

टी०—आठ पावलें आपली छाया आली ह्मणजे बुधवारीं गमन करावें. नऊ पावलें आली ह्मणजे मंगळवारीं, सात पावलें गुरुवारीं, रवि, शनि, सोम, शुक्र, या चोहोंवारीं ११ पावलें आपली छाया आली ह्मणजे गमन करावें. हा मुहूर्त सकलगुणयुक्त सर्वकार्यसिद्धिकर्ता आहे असें गर्गादि मुनींनीं सांगितलें आहे.

## काकशब्द शकुन.

काकस्यवचनंश्रुत्वापादच्छायांतुकारयेत् ॥ त्रयोदशयुतांकृत्वाषड्भिर्वैभागमाहरेत् ॥१॥ फळ ॥ ॥ लाभःखेदस्तथासौख्यंभोजनंचधनागमः ॥ अशुभंचक्रमेणैवगर्गस्यवचनंतथा ॥२॥

टी०—काकशब्द ऐकून आपली छाया पावलेंकरून मोजून त्यांत १३ मिळवावे आणि ६ नीं भागावें शेष राहील त्याचें फळ. १ उरेल तर लाभ, २ उरतील तर खेद, ३ उरले तर सौख्य, ४ उरले तर भोजन, ५ उरले तर धनलाभ, शून्य आलें तर अशुभ जाणावें याप्रमाणें गर्गवचन प्रमाण आहे.

## पिंगलाशब्दशकुन.

उल्हासःकिल्बिलेचैवचिल्पिल्याभोजनंतथा ॥
बंधनंखिटिखिट्टीस्यात्कुर्कुर्शब्देमहद्भयम् ॥ १ ॥

टी०—किल्बिल शब्द झाला तर उल्हास होय. आणि चिल्पिल शब्द झाला असतां भोजन प्राप्त होय. खिटखिट शब्द झाला तर बंधन होय. आणि कुर्कुर शब्द झाला तर महा भय असें जाणावें.

## शिंकापरत्वें पादछाया शकुन.

क्षुतैःशिंकारवंश्रुत्वापादच्छायांचकारयेत् ॥ त्रयोदशयुतांकृत्वा

टी०—गुरु, शनि, रवि, भौम, या चोहोंवारीं आपले नासिकेचा दक्षिण स्वर वहात असतां गृहांत प्रवेश करावा. आणि चंद्र, बुध, शुक्र या तिहीं वारीं वामस्वर वहात असतां निर्गमास श्रेष्ठ असें योग्यांचें मत आहे असें जाणावें.

## वारपरत्वें छायाशकुन.

अष्टौपादाबुधेस्युर्नवधरणिसुतेसप्तजीवेपदानिज्ञेयंचैकादशार्के शनिशशिभृगुषुप्रोक्तमर्थंचतुष्कम् ॥ तस्मिन्कालेमुहूर्तेसकलगु णयुतेकार्यसिद्धिःशुभोक्तानास्मिन्पंचांगशुद्धिर्नखलुशशिबलं भाषितंगर्गमुख्यैः ॥ १ ॥

टी०—आठ पावलें आपली छाया आली ह्मणजे बुधवारीं गमन करावें. नऊ पावलें आली ह्मणजे मंगळवारीं, सात पावलें गुरुवारीं, रवि, शनि, सोम, शुक्र, या चोहोंवारीं ११ पावलें आपली छाया आली ह्मणजे गमन करावें. हा मुहूर्त सकल-गुणयुक्त सर्वकार्यसिद्धिकर्ता आहे असें गर्गादि मुनींनीं सांगितलें आहे.

## काकशब्द शकुन.

काकस्यवचनंश्रुत्वापादच्छायांतुकारयेत् ॥ त्रयोदशयुतांकृ त्वाषड्भिर्वैभागमाहरेत् ॥१॥ फळ ॥ ॥ लाभःखेदस्तथासौ ख्यंभोजनंचधनागमः ॥ अशुभंचक्रमेणैवगर्गस्यवचनंतथा ॥२॥

टी०—काकशब्द ऐकून आपली छाया पादेंकरून मोजून त्यांत १३ मिळवावे आणि ६ नीं भागावें शेष राहील त्याचें फळ. १ उरेल तर लाभ;२उरतील तर खेद, ३ उरले तर सौख्य, ४ उरले तर भोजन, ५ उरले तर धनलाभ, शून्य आलें तर अशुभ जाणावें याप्रमाणें गर्गवचन प्रमाण आहे.

## पिंगलाशब्दशकुन.

उल्हासःकिल्बिलेचैवचिलिपल्याभोजनंतथा ॥
बंधनंखिटिखिट्टीस्यात्कुर्कुशब्देमहद्भयम् ॥ १ ॥

टी०—किल्बिल शब्द झाला तर उल्हास होय. आणि चिल्पिल शब्द झाला असतां भोजन प्राप्त होय. खिटखिट शब्द झाला तर बंधन होय. आणि कुर्कुर शब्द झाला तर महा भय असें जाणावें.

## शिंकापरत्वें पादछाया शकुन.

श्रुत्वैशिंकारवंश्रुत्वापादच्छायांचकारयेत् ॥ त्रयोदशयुतांकृत्वा

चाष्टभिर्भागमाहरेत् ॥ १ ॥ फळ ॥ लाभःसिद्धिर्हानिशोकौभ यंश्रीर्दुःखनिष्फले ॥ क्रमेणैवंफलंज्ञेयंगर्गेणचयथोदितं ॥ २ ॥

टी०—शिंका शब्द ऐकून आपली छाया पादेंकरून मोजून त्यांत १३ मिळवून ८ नीं भागावें शेष राहील त्याचें फळ, १ उरेल तर लाभ, २ उरले तर सिद्धि, ३ उरले तर हानि, ४ उरले तर शोक, ५ उरले तर भय, ६ उरले तर लक्ष्मी, ७ उरले तर दुःख, शून्य असल्यास निष्फल असें गर्गमुनि सांगतात.

## शिंकाशकुन.

छिकाप्रश्नंप्रवक्ष्यामिपूर्वस्यामशुभंफलं ॥ आग्नेय्यांशोकदुःखं स्यादरिष्टंदक्षिणेतथा॥१॥नैर्ऋत्यांचशुभंप्रोक्तंपश्चिमेमिष्टभ क्षणम् ॥ वायव्येधनलाभस्तुउत्तरेकलहस्तथा ॥२॥ईशान्यां चशुभंज्ञेयमात्मछिंकामहद्भयं ॥ ऊर्ध्वेचैवशुभंज्ञेयंमध्येचैवमह द्भयं ॥ ३ ॥ आसनेशयनेचैवदानेचैवतुभोजने ॥ वामांगेपृष्ठ तश्चैवषट्छिंकाश्चशुभावहाः ॥ ४ ॥

टी०—दिशापरत्वें पूर्वेची शिंका अशुभ, आग्नेयेची शोक व दुःखकारक, दक्षिणेची अरिष्टकारिणी, नैर्ऋत्येची शुभ, पश्चिमेची मिष्टान्न भक्षण देणारी, वायव्येची धनदायक, उत्तरेची कलहकारिणी, ईशान्येची शुभकारक, आत्मशिंकेचें मोठें भय, ऊर्ध्व झाली तर शुभ, मध्यें झाली तर मोठें भय, आसनावर व शयनस्थानावर व दान देतां किंवा भोजन करतां अथवा वामभागीं किंवा पृष्ठभागीं ह्या सहा स्थानांची शुभ होय.

## पल्लीशब्दशकुन.

वित्तंब्रह्मणिकार्यसिद्धिमतुलांशक्रेहुताशेभयंयाम्येमित्रवधःक्षय श्चनिर्ऋतेर्लाभःसमुद्रालये ॥ वायव्यांवरमिष्टमन्नमशनंसौम्येऽर्थ लाभस्तथाईशानेगृहगोधिकार्यमतुलंसर्वत्रभूमौभयं ॥ १ ॥

टी०—पल्ली शब्दाचें दिशापरत्वें फळ, ऊर्ध्व दिशेस द्रव्यप्राप्ति, पूर्वेस कार्यसिद्धि, आग्नेयीस भय, दक्षिणेस मित्रवध, नैर्ऋत्येस क्षय, पश्चिमेस लाभ, वायव्येस मिष्टान्नभोजन, उत्तरेस लाभ, ईशान्येस कार्यसीद्धि, भूमीवर शब्द झाल्यास भय, याप्रमाणें फळ जाणावें.

## पल्लीपतन व सरटारोहण फल.

राज्यंतुशिरसिज्ञेयंललाटेबंधुदर्शनं ॥ भ्रूमध्येराजसन्मानमुत्तरो

Scanned by CamScanner

ष्ठेधनक्षयं ॥ १ ॥ अधरोष्ठेधनैश्वर्यंनासांतेऽव्याधिपीडनं ॥ आयुष्यंदक्षिणेकर्णेबहुलाभस्तुवामके ॥ २ ॥ अक्ष्णोस्तुबंधनंज्ञेयंभ्रुजेभूपतितुल्यता ॥ राजक्षोभंतथावामेकंठेशत्रुविनाशनं ॥ ३ ॥ स्तनद्वयेचदुर्भाग्यमुदरेमंडनंशुभं ॥ प्रज्ञानाशःपृष्ठदेशेजानुजंघेशुभावहं ॥ ४ ॥ करद्वयेवस्त्रलाभःस्कंधयोर्विजयीभवेत् ॥ नाभौबहुधनंप्रोक्तमूर्वोश्चैवहयादिकं ॥ ५ ॥ दक्षिणेमणिबंधेचमनस्तापंधनक्षयं ॥ मणिबंधेतथावामेकीर्तिवृद्धिधनप्रदं ॥ ६ ॥ नखेधान्यलाभंचवक्त्रेमिष्टान्नभोजनं ॥ गुल्फयोर्बंधनंज्ञेयंकेशांतेमरणंध्रुवं ॥ ७ ॥ अध्वातुदक्षिणेपादेवामेबंधुविनाशनं ॥ स्त्रीनाशःस्यात्पादमध्येपादांतेमरणंभवेत् ॥ ८ ॥ पल्ल्याःप्रपतनेज्ञेयंसरठस्याधिरोहणे ॥ यात्रोद्युक्तमनुष्यस्यैतच्छुभाशुभसूचकं ॥ ९ ॥ तिलमाषादिदानंचस्नात्वादेयंद्विजन्मने ॥ पिनाकिनंनमस्कृत्यजपेन्मंत्रंषडक्षरं ॥ १० ॥ शतंसहस्रमथवासर्वदोषनिबर्हणं ॥ शिवालयेप्रदद्याद्वैदीपंदोषोपशांतये ॥ ११ ॥

टी०—मनुष्य गमनास उद्युक्त होत्साता अंगावर पल्लीपतन अथवा सरटारोहण झालें तर शुभाशुभ सूचक स्थानपरत्वें फळें सांगतों.

## शरीरस्थानपरत्वें शुभाशुभ फळें.

| | | |
|---|---|---|
| १ शीर्ष, राज्यप्राप्ति. | ११ वामबाहु, राजक्षोभ. | २२ उजवामणिबंध, धनक्षय. |
| २ कपाळ, बंधुदर्शन. | १२ कंठ, शत्रुभय. | २३ डावामणिबंध, कीर्तिधनप्रद. |
| ३ भिंवया, राजसन्मान. | १३ स्तन, दुर्भाग्य. | |
| ४ वरील ओंठ, धनक्षय. | १४ उदर, शुभमंडण. | २४ नखें, धान्यलाभ. |
| ५ खालचा ओंठ, धनैश्वर्य प्राप्त. | १५ पृष्ठी, बुद्धिनाश. | २५ मुख, मिष्टान्नभोजन. |
| | १६ ढोंपर, शुभ. | २६ गुल्फ, बंधन. |
| ६ नासिकांतीं व्याधिपीडा | १७ पोटऱ्या, शुभ. | २७ केश, मरण. |
| ७ उजवाकान, आयुष्य. | १८ दोन्हीहात, वस्त्रलाभ. | २८दक्षिणपाद, मार्गचालणें |
| ८ डावाकान, बहुतलाभ. | १९ स्कंध ( खांदा ) विजय | २९ वामपाद, बंधु नाश. |
| ९ नेत्र, बंधन. | २० नाभी, बहुधन. | ३० पायांचामध्य, स्त्रीनाश. |
| १० भ्रूद्व० राजाप्रमाणें. | २१ मांड्या, घोडावाहन. | ३१ पादाचा अंत, मरण. |

पाल अंगावर पडली असतां सचैल स्नान करून तीळ व उडिद यांचीं दानें ब्राह्म-

णास द्यावीं, आणि सांबास नमस्कार करून शिवमंत्राचा जप ११०० करावा, आणि शिवालयांत दीप लावावा म्हणजे दोष जातो.

## अंगस्फुरणाविषयीं मनुमत्स्यसंवाद.

मनुरुवाच॥ ॥ब्रूहिमेत्वंनिमित्तानिअशुभानिशुभानिच॥स
र्वधर्मभृतांश्रेष्ठत्वंहिसर्वंविबुद्ध्यसे॥१॥ अंगानांस्पंदनंचैवशु
भाशुभविचेष्टितं ॥ तन्मेविस्तरतोब्रूहियेनस्यात्तद्विधंभुवि ॥ २ ॥

टी०—मनु मत्स्याप्रत प्रश्न करितो. हे धर्मश्रेष्ठा! अंगस्फुरणाविषयीं निमित्तें शुभसूचक व अशुभसूचक कोणतीं आहेत तीं विस्तारेंकरून सांग. अशीं कीं लोकामध्यें तसा अनुभव यावा, कारण तूं सर्वज्ञ आहेस.

मत्स्यउवाच ॥ ॥ अंगस्यदक्षिणेभागेप्रशस्तंस्फुरणंभवेत् ॥
अप्रशस्तंतथापृष्ठेहृदयेचतथैवच ॥ ३ ॥ पृथ्वीलाभोभवेन्मूर्ध्नि
ललाटेरविनंदन ॥ स्थानंविवृद्धिमायातिभ्रूनसोःप्रियसंगमः
॥ ४ ॥ भृत्यलब्धिश्चाक्षिदेशेदृगुपांतेधनागमः॥उत्कंठोपगमे
मध्येदृष्टंराज्यंविचक्षणैः ॥ ५ ॥ दृग्बंधनेसंगरेचजयःशीघ्रमवा
प्नुयात्॥योषिल्लाभोपांगदेशेश्रवणांतेप्रियश्रुतिः॥६॥नासिका
यांप्रीतिसौख्यंप्रियाप्तिरधरोष्ठयोः॥कंठेतुभोगलाभःस्याद्भोग
वृद्धिरथांसयोः ॥७॥ सुहृत्स्नेहश्चबाहुभ्यांहस्तेचैवधनागमः॥
पृष्ठेपराजयोत्सेधोजयोवक्षःस्थलेभवेत् ॥ ८ ॥ कुक्षिभ्यां
प्रीतिरुद्दिष्टास्त्रियाःप्रजननंभगे ॥ स्थानभ्रंशोनाभिदेशेआंत्रेचै
वधनागमः ॥ ९ ॥ जानुसंधौपरैःसंधिर्बलवद्भिर्भवेन्नृप ॥ दशै
कदेशनाशोयंजंघाभ्यांरविनंदन ॥ १० ॥ उत्तमस्थानमाप्नो
तिपद्भ्यांप्रस्फुरणेनृप ॥ अलाभंचाध्वगमनंभवेत्पादतलेनृप॥११॥

टी०—मत्स्य सांगतो हे सूर्यपुत्रा! अंगस्फुरण दक्षिण भागीं शुभ, वामभागीं तसेंच पृष्ठभागीं आणि हृदयभागीं अशुभ जाणावें, याप्रमाणें मूर्द्धादिस्थानीं फळें खालीं लिहिल्याप्रमाणें जाणावीं.

### स्थानें व फळें.

१ मस्तकस्फुरण, पृथ्वीलाभ.
२ ललाट, स्थानाची वृद्धि.
३ भिंवयांचा मध्य, प्रियाची भेट.
१४ दोन्ही बाहु, सुहृत् स्नेही भेटतील.
१५ दोन्ही हात, धनप्राप्ति.
१६ पृष्ठ(पाठ)दुसऱ्यापासून जय होईल.

४ नेत्राजवळ, चाकर मिळतील.
५ पापण्यास्फुरण, धनप्राप्ति.
६ कंठमध्य, राज्यप्राप्ति.
७ दृग्बंधन, युद्धांत जाणें होईल. जय.
८ अपांगदेश, स्त्रीलाभ.
९ कर्ण, प्रीतीचीं भाषणें ऐकूं येतील.
१० नासिका,प्रीतिआणिसौख्यप्राप्तिहो०
११ अधरोष्ठ, प्रियकर वस्तु प्राप्त होईल.
१२ कंठ, ऐश्वर्यप्राप्ति.
१३ खांदे, भोगवृद्धि प्राप्त होईल.
१७ ऊर, जयप्राप्ति.
१८ कुक्षि, प्रीति.
१९ शिश्न, स्त्रिया प्राप्त.
२० नाभि, स्थानभ्रंश.
२१ आंतडीं, धनप्राप्ति.
२२ {डोंपेसंधी / उपसंधी} बलवानशत्रूशीं संधिहोईल,
२३ पोंटऱ्या, एके देशाचा स्वामी होईल.
२४ पाय, उत्तमस्थानीं मान्यता होईल.
२५ तळवे पायांचे, गमन होय.

याप्रमाणें स्थानांचीं फळें जाणावीं.

## स्त्रियांचें अंगस्फुरण.

लांछनंपीठकेचैवज्ञेयःस्फुरणवत्तथा ॥ विपर्ययेणविहितःसर्वस्त्री णांविपर्ययः ॥ १ ॥ दक्षिणेविप्रशस्तेंगप्रशस्तंस्याद्विशेषतः ॥

टी०—स्त्रियांचें अंगस्फुरण, भिवयांमध्यें गोंधळें काढितात तें स्थान शुभ. तशींच हीं सर्व मागें स्फुरणस्थानें सांगितलीं तींच स्थानें स्त्रियांस विपरीत धरून सांगावीं स्त्रियांचें वामांग शुभ आहे.

अंगस्फुरणेऽद्भुतंरिष्टंसकलंविनाशयतिसद्यः ॥
द्विजसंतर्पणमथवाकांचनदानंद्विजायभूमिपते ॥ २ ॥

टी०—हे राजा! अनिष्ट फळांचे निवारणार्थ ब्राह्मणसंतर्पण व सुवर्णदान करावें ह्मणजे दोष परिहार होतात.

## नेत्रस्फुरण.

नेत्रस्योर्ध्वंहरतिसकलंमानसंदुःखजालंनेत्रोपांतेदिशतिचधनं नासिकांतेचमृत्युं ॥ नेत्रस्याधःस्फुरणमसकृत्संगरेभंगहेतुर्वामे चैतत्फलमविफलंदक्षिणेवैपरीत्यम् ॥ १ ॥

टी०—नेत्रांचीं ऊर्ध्व प्रांतादिस्थानें स्फुरण होतात त्यांचीं फळें सांगतों. नेत्रांच्या वरील पापण्या स्फुरण झाल्या तर मनाचें दुःख जाईल आणि धनप्राप्ति होईल. नासिके जवळची स्फुरण झाली तर मृत्यु. अधर प्रांत स्फुरण झाला तर युद्धांत अपजय हीं सर्व फळें वाम नेत्रांचीं घ्यावीं दक्षिणनेत्राचीं विफळ. आणि स्त्रियांचीं दक्षिण नेत्राचीं घ्यावीं. वाम नेत्राचीं विफळ जाणावीं.

Scanned by CamScanner

# त्रिशूळ यंत्र.

रोगेकुजर्क्षतश्चांद्रंगमनेऽग्न्यर्क्षतस्तथा ॥ अन्यस्मिन्छुभकार्ये तुसूर्यर्क्षाद्गणयेत्सुधीः॥१॥युद्धेतुचंद्रनक्षत्रादविभंगणयेत्तथा॥ त्रिशूलयंत्रतोज्ञेयंफलमेतच्छुभाशुभम् ॥ २ ॥

टी०—रोग्याचे प्रश्नास त्रिशूळ मध्यार्थी, मंगळ ज्या नक्षत्रीं असेल तें घ्यावें आणि चंद्र ज्या स्थानीं यंत्रांत येईल तें फळ घ्यावें ह्या क्रमानें पुढील क्रम जाणावा. युद्धांत जाणें तर दिननक्षत्रापासून सूर्यनक्षत्रापावेतों आणि गमन करणें तर कृत्तिकापासून दिवसनक्षत्रापावेतों, आणि अन्य कर्मांस सूर्यनक्षत्रापासून दिननक्षत्रापावेतों असा क्रम जाणावा.



त्रिशूलाग्रेभवेन्मृत्युर्मध्यमंबाहिरष्टकम् ॥
लाभंक्षेमंजयारोग्यमंतर्गर्भेषुसंमतम् ॥ ३ ॥

टी०—त्रिशूल अग्रभागीं दिननक्षत्र आलें तर मृत्यु, आणि बाहेरील अष्टकांत आलें तर मध्यम, मध्याष्टकांत आलें तर लाभ, क्षेम जय व आरोग्य हें सर्वसंमत जाणावें.

## गमनास लग्नें.

चरलग्नेप्रयातव्यंद्विःस्वभावेतथानरैः ॥
लग्नेस्थिरेनगंतव्यंयात्रायांक्षेममीप्सुभिः ॥ १ ॥

टी०—चर म्हणजे मेष, कर्क, तुळ, मकर हीं ४ लग्नें आणि द्विःस्वभाव म्हणजे

## तृतीय स्थानाचें फळ.

स्थानेतृतीयेगुरुभार्गवौचसोमस्यसूनुश्चनिशापतिश्च ॥
करोतिकार्यंसफलंचसर्वंपक्षद्वयेनापिदिनत्रयेण ॥ ५ ॥

टी०—तृतीयस्थानीं गुरु, शुक्र, बुध, अथवा चंद्र असला तर पक्षद्वयांत किंवा तीन दिवसांत कार्य सफळ होईल.

## चतुर्थ स्थानाचें फळ.

क्रूराश्चतुर्थेगमनेयदातुनस्युश्चशेषाःशुभदाहिकार्ये ॥
तत्रापिदैवेनभवेच्चसिद्धिर्मासत्रयेणापिदशाहमध्ये ॥ ६ ॥

टी०—क्रूर ग्रह वर सांगितले आहेत त्यांतून कोणताही ग्रह चतुर्थस्थानीं वर्जून शेष ग्रह राहिले ते असतां शुभ परंतु दैवयोगें करून ३ मासांत किंवा १० दिवसांत कार्यसिद्धि होईल.

## पंचमस्थानाचें फळ.

गुरुर्भृगुश्चंद्रबुधौयदास्याच्छुभेचलग्नेचसुतेचयुक्ताः ॥
कुर्वंतिकार्यस्यचसिद्धिमिष्टांमासद्वयेनापिवदंतिसत्यम् ॥ ७॥

टी०—गुरु, शुक्र, चंद्र, अथवा बुध ह्या चोहों ग्रहांतून कोणताही ग्रह पंचमस्थानीं असतां शुभ होय. दोहों मासांनीं इष्ट कार्य सिद्धि होईल.

## षष्ठस्थानाचें फळ.

जीवश्चशुक्रश्चबुधश्चषष्ठेकरोतियात्रांसफलांविलग्नात् ॥
पक्षद्वयेनापिवदंतिसत्यंसौम्यर्क्षसंस्थोसबलश्चचंद्रः ॥ ८ ॥

टी०—गुरु, शुक्र, किंवा बुध यांतून एक ग्रह षष्ठस्थानीं असला तर यात्रा सफळ, आणि मृगनक्षत्रींचा चंद्र त्या स्थानीं सबळ असतां एक मासांत कार्य-सिद्धि जाणावी.

## सप्तमस्थानाचें फळ.

चेत्सप्तमस्थागुरुसोमसौम्याःकुर्वंतियात्राविजयंनृपाणां ॥
सर्वेनृपास्तस्यभवंतिवश्यामासद्वयेनापिचपंचभिर्दिनैः ॥ ९ ॥

टी०—सप्तमस्थानीं गुरु, सोम, अथवा बुध, असतां यात्रा विजय होय, सर्व राजे दोन मासांत अथवा पांच दिवसांत वश्य होतील.

## अष्टमस्थानाचें फळ.

क्रूराश्चसर्वेयदिलग्नकालेमृत्युस्थितामृत्युकराभवंति ॥
सौम्योगुरुर्वाभृगुनंदनश्चदीर्घायुषंमृत्युकरश्चचंद्रः ॥ १० ॥

टी०—क्रूर ह्मणजे शनि, रवि, भौम, राहु, केतु, यांतून १ ग्रह अष्टम स्थानीं असतां मृत्युकारक आणि हे नसतां सौम्य ग्रह असले तर आयुष्याची वृद्धि; परंतु चंद्र मात्र या स्थानीं नसावा तो मृत्युकारक होय.

## नवमस्थानाचें फळ.

धर्मस्थितायदिभवंतिहिपापखेटाःप्रयाणकालेचतथैवचंद्रमाः ॥
तदाजयंवैसबलेचचंद्रेमासत्रयेणापिदिनैश्चतुर्भिः ॥ ११ ॥

टी०—नवमस्थानीं पापग्रह व चंद्र असतां उक्त, परंतु चंद्रबळ असावें ह्मणजे ३ मासांत किंवा ४ दिवसांत कार्यसिद्धि होईल.

धर्मस्थितौवायदिजीवशुक्रौसोमस्यसूनुर्यदिलग्नकाले ॥
लग्नेचरेवायदिवास्थिरेवाकार्यस्यसिद्धिश्चभवेच्चलाभः ॥ १२ ॥

टी०—नवमस्थानीं गुरु, शुक्र, असतां अथवा सोम, बुध हे चरलग्नस्थित अथवा स्थिरलग्नीं असतां कार्यसिद्धि होईल.

## कर्मस्थानाचें फळ.

कर्मस्थिताःपापखगास्तुसौम्याःकुर्वंतिकार्यंशनिवर्जिताश्च ॥
लग्नेचरेवायदिवास्थिरेवामासत्रयेणापिचचैकमासतः ॥ १३ ॥

टी०—दशमस्थानीं चरलग्नीं अथवा स्थिर लग्नीं शनीखेरीज पाप ग्रह अथवा सौम्य ग्रह असतां एक मासांत अथवा ३ मासांनीं कार्यसिद्धि होईल.

## लाभस्थानाचें फळ.

लाभस्थितौगुरुबुधौभृगुनंदनौवाक्रूराश्चसर्वेशशिनेवयुक्ताः ॥
सद्यःफलाप्तिश्चभवेद्धियात्रापक्षैकमध्येदिवसत्रयेच ॥ १४ ॥

टी०—एकादशस्थानीं रवि आदिकरून पापग्रह चंद्रसहित अथवा गुरु आदिकरून सौम्य ग्रह असतां ३ दिवसांत अथवा पक्षामध्यें कार्यसिद्धि होईल.

## व्ययस्थानाचें फळ.

सर्वेशुभाद्वादशसंस्थिताश्चयात्राभवेत्तत्रविचित्रलाभः ॥
पापाश्चसर्वेव्ययदाभवंतियात्राफलंगर्गमुनिप्रणीतम् ॥ १५ ॥

